

# शब्द रुची

मे २०१७

मूल्य १० रुपये

पृष्ठे ५२












पहिल्या छायाचित्रात दीप प्रज्वलित करताना डावीकडून प्रतापभाई पटेल, डॉ. सुलभा वर्दे, संगीता पटेल, मुकुंद पटेल आणि अशोक हाडे. दुसऱ्या छायाचित्रात कै. शोभाबेन प्रतापभाई पटेल 'आदर्श नागरीक पुरस्कार' द्वितीय वर्ष प्रदान करताना डॉ. लतिका भानुशाली, प्रतापभाई पटेल, डॉ. सुलभा वर्दे, मुकुंद पटेल, संगीता पटेल, तिसऱ्या छायाचित्रात ठाणे महानगरपालिका शाळा क्र. १ आणि केणी विद्यालय-भांडुप या शाळांच्या शिक्षिका-विद्यार्थी. चौथ्या छायाचित्रात लोकसत्ता ठाणे आवृत्तीचे विशेष प्रतिनिधी प्रशांत मोरे यांना डिजिटल विश्वकोशाचे खंड १० शाळांसाठी सुपुर्द करताना संगीता पटेल.



२३ एप्रिल २०१७ रोजी
पुस्तक दिनानिमित्त
माझे मित्र आणि
लेखक-संपादक अरुण शेवते
यांनी घरी बोलावून
माझा ४० वर्षांच्या पुस्तक
सेवेबद्दल सत्कार केला.





किशोर सानप



डॉ. अजय देशपांडे

श्रीपाद भालचंद जोशी लिखित मथितार्थ आणि इत्यादी या दोन कवितासंग्रहांचे प्रकाशन नागपूर येथे झाले. त्यावेळी डावीकडून किशोर सानप, डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. अजय देशपांडे आणि श्रीपाद भालचंद्र जोशी

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

मे २०१७, वर्ष पाचवे
अंक पहिला, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**स्मरणवेळा**



- 'मटा', 'मौज', 'माणूस' आणि तळवलकर /६
  **दिनकर गांगल**
- पत्रकारांचा बाप / १५
  **प्रवीण बर्दापूरकर**



- एका पर्वाचा अस्त / १८
  **अमरेन्द्र धनेश्वर**
- अलौकिकाचा ध्यास रुजवणाऱ्या किशोरीताई /२१
  **केशव परांजपे**



- समीक्षक समाजशास्त्रज्ञ : प्रा. द.ना. धनागरे / २४
  **डॉ. विजय मारुलकर**

**कविता आणि मी** / २९
**अनिल सावळे**

**चित्रगौरव**
- कासव / **संतोष पाठारे** / ३०
- व्हेन्टीलेटर / **गणेश मतकरी** / ३२
- 'दशक्रिया'च्या निमित्ताने / **डॉ. प्रसाद भिडे** / ३५

**विशेष**
- बॉम्बे आर्ट सोसायटी–शतकोत्तरी रौप्यमहोत्सवी प्रदर्शन /३६
  **महेंद्र दामले**

**रंगस्वर**
- बॉब डिलन / ३८
  **राहुल बनसोडे**

- अमेरिका : अध्यक्षीय निवडणुकीचं मरणोत्तर विच्छेदन / ४१
  **डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
- ग्रंथपान – **मेहता पब्लिशिंग हाऊस** / ४६
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ४७

## संपादकीय...

अत्यंत रोखठोक लिहिणारा आणि बोलणारा मंटो हा त्याच्या काळातला उर्दूतला सर्वात बदनाम लेखक. तो म्हणायचा, '' समाजाची वस्त्रं मी काय फेडणार? जो आधीच नग्न आहे, त्याची वस्त्रं मी कसा उतरवणार? ज्या काळात आपण जगतोय त्याचे जर तुम्ही जाणकार असाल तर माझ्या कथा वाचा आणि माझ्या कथा जर तुम्हाला सोसवत नसतील तर समजा की हा समाज, हे युग सहनशक्तीच्या किती पलीकडचं आहे.''

आंघोळ करणं, खाणं-पिणं या गोष्टी दैनंदिन जगण्यातल्या जितक्या सहज गोष्टी होत्या तितकंच लेखन ही गोष्ट त्याच्या स्वाभाविक जगण्याचा भाग होती. लेखनाकरता वेगळी जागा-वेगळा एकांत ही कधीही त्याची गरज नव्हती पण नेहमीच्या परिचित गोष्टींपेक्षा वेगळं पकडणं हा मात्र त्याचा ध्यास होता. मनात येत-जात राहणारे, थबकणारे, गरगरणारे विचार त्याला गोळा करत राहायचे होते नि ते सोपे नव्हते. त्यातून आलेली घालमेल आणि दमछाक त्याच्या जगण्याशी-असण्याशी जोडली गेली होती. त्याला चिंता ही होती की त्याच्याबरोबर त्याचे विचारदेखील मरून जातील. तो म्हणे, ''कुणीतरी मला वचन द्यावं की माझे सगळे विचार एका बाटलीत भरून ठेवले जातील. असं घडलं तर मी केव्हाही मरायला तयार आहे.'' किती तथ्य होतं त्याच्या उद्गारांत...!

मरणानंतर माणसाचा उदो-उदो करण्याच्या समाजाच्या दांभिक प्रवृत्तीवर त्याने अचूक भाष्य केले आहे. उर्दूतील एका मोठ्या कवीच्या निधनानंतर मंटोने एक लेख लिहिला त्यावर एका वाचकाने संपादकाला पत्र लिहिलं, ''प्रत्येक सभ्य समाजात असा रिवाज आहे की शत्रूच्या मृत्यूनंतरही त्याच्याबद्दल चांगले बोलले जाते.''

यावर मंटोचं उत्तर असं होतं, ''जिथे अशी प्रथा आहे की मरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचं चरित्र-व्यक्तिमत्त्व लाँड्रीत पाठवलं जावं आणि तिथून ते धुवून-स्वच्छ होऊन आलं की मग त्याला देवत्वाच्या खुंटीवर टांगलं जावं, अशा समाजाचा आणि जगाचा मी निषेध करतो.''

त्याच्या मृत्यूनंतर लेखक कृष्णचंदर यांनी लिहिलेला त्यांच्या मित्राबरोबरचा संवाद वाचनात आला. कृष्णचंदर त्यांच्या मित्राला म्हणत होते, ''तो एक सामान्य लेखक होता. तो नेता, अभिनेता किंवा मोठा व्यापारी नव्हता. त्याच्याकरता कोण रडणार? कोण आपला कामधंदा बंद ठेवणार? म्हणून तर रेडिओ सुरू आहे. त्याची हजारो पुस्तकं विकणारा उर्दू बाजार सुरू आहे. ४२ वर्षांचा मंटो जगातून निघून गेला आणि सारं काही सुरू आहे.''

दोघांमधला हा टांग्यातला संवाद! पुढल्याच क्षणी टांगेवाल्याने टांगा थांबवला नि विचारलं, ''काय? मंटो गेला? मग कृपया तुम्ही दुसरा टांगा करा. हा टांगा आता पुढे नाही जाणार.'' यापेक्षा मोठी श्रद्धांजली काय असू शकते?

मंटो टांगेवाल्यांच्या, गरिबांच्या, फोरास रोडवरच्या वेश्यांच्या गोष्टी लिहिणारा लेखक होता. त्याच्या शब्दांत... 'अफसानानिगार'! म्हणजे 'गोष्टी सांगणारा, रचणारा. त्याच्या गोष्टींमध्ये अशी माणसं होती, जी समाजाने उपेक्षित ठेवली होती.


कुणाला काय आवडेल हा विचार करून त्याने लेखन केले नाही. सत्तेचा रोष ओढवून न घेण्याची सावध वाट त्याने निवडली नाही. कोणत्या प्रकारचे साहित्य लिहिले तर आपण महान लेखक ठरू? समीक्षकांना खूष ठेवण्यासाठी कोणते ट्रेंड्स जवळ करायचे? कुणालाही न दुखवता लेखक म्हणून कसे मिरवायचे? कोणत्या कळपात सामील होऊन सुरक्षित राहायचे? हे प्रश्न त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे नव्हते. त्यांच्या उत्तरांच्या वाट्यालाही न जाता तो स्वत:च्या अटींवर जगला. लोक ज्यापासून स्वत:ला दूर ठेवू इच्छितात अशा सत्याला तो लेखनातून भिडला. त्याने समाजाचे अस्सल चित्र रंगवायचा प्रयत्न केला. ते सुंदर नसेलही, आवडण्याजोगेही नसेल पण ते बनावट नव्हते.

फार खरं पचवायची ताकद समाजात नसते म्हणून मंटोला त्याच्या लिखाणाकरता कोर्टांचे खटले झेलावे लागले. उदा. 'काली सलवार', 'धुआँ', 'बू', 'ठंडा गोश्त' अशा त्याच्या कथा) ''मी गोष्ट लिहीत नाही. गोष्टच मला लिहिते'' असे म्हणणारा मंटो आयुष्यभर त्याला सापडलेल्या गोष्टींशी प्रामाणिक राहिला. किंबहुना म्हणूनच 'सआदत हसन' गेला तरी 'मंटो' जिवंत आहे.

चित्रकला, संगीत, साहित्य, विज्ञान अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत स्वत:चे सारे पणाला लावून काम करणारी माणसे वेगवेगळ्या काळात होऊन गेली. त्यापैकी अनेकांना त्यांच्या जिवंतपणी आपल्या कामाची खूप मोठी किंमत चुकवावी लागली. हलाखी, निर्भत्सना, अपमान, हेटाळणी, निंदा, आरोप, शिक्षा अशा अनेक दिव्यांमधून त्यांना जावे लागले. जिवंतपणी जगाने त्यांना जाळले पण त्यांच्या सत्त्वाचे, विचारांचे त्यांनी पेरलेल्या नव्या गोष्टींचे निखारे विझवणे सोपे नव्हते.

एकेकट्याने लढायला इतकी आंतरिक ताकद कोठून येते हा प्रश्नच आहे. याचं उत्तर असं देता येईल की स्वत: शोधलेल्या जगण्याच्या दिशेवर असलेल्या आपल्या अदम्य विश्वासातून ही ताकद येत असणार. आजच्या काळात आपल्या जगण्यावर असा विश्वास असणारी माणसे दिसणे दुरापास्त झाले आहे. व्यवस्थेला विकली गेलेली, दुबळी झालेली, सवंग लोकप्रियतेला हपापलेली, प्रलोभनांना बळी पडणारी, आपापल्या गरजांपायी अगतिक झालेली माणसे अवतीभवती वाढत चाललीत. बहुसंख्य माणसे किड्यामुंग्यासारखी मरून जातात. एखाद्याच मंटोमध्ये मृत्यूपूर्वीच आपला समाधीलेख आपणच लिहून ठेवण्याची ताकद असते. तो आपल्या कबरीवर लावायचा दगड स्वत: शोधून त्यावर कोरतो, ''इथे सआदत हसन मंटो दफन आहे. त्याच्या काळजात गोष्ट लिहिण्याच्या कलेची सगळी रहस्य आणि कोडी दफन आहेत. आताही तो मातीखाली विचार करतोय... तो मोठा रचनाकार आहे की 'खुदा' मोठा रचनाकार आहे?''

– डॉ. वीणा सानेकर
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar1966@gmail.com




**ग्रेट दिव्यांग**

**उषा धर्माधिकारी**

**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ८० रुपये**

हात नसतील तर हातांचे काम पाय करतात.
पाय नसतील तर पायांचे काम हात करतात.
दृष्टी नसली तर स्पर्शानेच सारे काम होते.
श्रवण वाचा नसेल तर,
सर्व शरीरच श्रवण वाचेचे माध्यम बनते.
मग तुम्ही सांगा कुठे कुणाचे अडते?
बुद्धी, जिद्द आणि समाजाने साथ दिली
तर पुनर्वसन चांगले होते.
समाजाच्या मुख्य प्रवाहात मिसळून जाता येते,
कळत-नकळत, समाजाचा एक घटक म्हणून
जगता येते.

– उषा धर्माधिकारी



# 'मटा', 'मौज', 'माणूस' आणि तळवलकर

दिनकर गांगल

संपादक गोविंद तळवलकर यांच्या निधनाने एक काळ संपल्याची भावना झाली. तो काळ गेल्या शतकाचा. तळवलकर यांचा मृत्यू झाला तेव्हा ते ब्याण्णव वर्षांचे होते. म्हणजे त्यांनी जवळ जवळ सारे गेले शतक जाणतेपणाने पाहिले. शिवाय, त्यांची जिज्ञासा ते पत्रकार/संपादक असल्याने सतत जागी होती. त्यांनी त्यांचे वाचन, त्यांचा अभ्यास सतत वाढवत नेला. त्यांची दृष्टी सूक्ष्म होती.

मी तळवलकर यांचा सहाय्यक म्हणून 'मटा'च्या पुरवणी विभागात वीस वर्षे काम केले. तो त्यांच्या संपादक म्हणून घडण्याचा काळ होता. त्यांचा माझ्यावर खूपच विश्वास होता. ते संपादक झाल्यानंतर तीन वर्षांतच पहिला युरोप दौरा करून आले तेव्हा त्यांनी जर्मनीतून एक अॅश ट्रे आणला होता. मला त्यांनी तो केबिनमध्ये देत असताना बजावले, की बाहेर कोणास दाखवू-सांगू नका, कारण मी फक्त तुमच्यासाठी काही वस्तू आणली आहे. बाहेर, वृत्तसंपादक गोखले यांचे व त्यांचे नाते फार, म्हणजे फारच जिव्हाळ्याचे होते. मी १९८९ साली'मटा'तून मोकळा झालो तेव्हा मात्र तळवलकरांचे व माझे संबंध बरेच औपचारिक झाले होते कारण ते संपादक म्हणून खूपच मोठे झाले होते व माझी बैठकदेखील मला 'मटा'ने देऊ केलेल्या खुर्चीपेक्षा विस्तारली होती.

माझी आणि तळवलकरांची त्यानंतर एकदाच भेट झाली. मीच त्यांना भेटण्यास गेलो होतो. त्यांनी नाशिकला बांधलेला बंगला विकला होता व त्यांचा पुण्यात जागा घेण्याचा बेत चालला होता. माझ्या एका स्नेह्यांना त्याचा सुगावा लागला. त्यांचा सिंहगड रोडवर बंगला होता. तो त्यांना विकायचा होता. ते म्हणाले, ''विचारा तळवलकरांना.'' माझ्या व तळवलकरांच्या त्या बोलण्यात त्यांची व्यवहारी वृत्ती व त्यांचा खवचटपणा, दोन्हींचा प्रत्यय आला. मी त्यांना म्हटले, ''तुमच्याजवळ खूप पैसे आहेत तर छान मोठा बंगला घ्या.'' ते म्हणाले, ''म्हातारपणात फक्त पैशांचा आधार असतो. जयवंत दळवी बघा. धनवान होते, गुणवान होते! मात्र डायलिसिसने बेजार झाल्यावर दादरची जागा विकून त्यांना बोरिवलीला राहण्यास जावे लागले. पुलंचा लोकसंपर्क केवढा मोठा! पण त्यांना त्यांचा एकही चाहता सकाळचा चहा रोज आणून देत नसे. ती व्यवस्था त्यांना समोरच्या हॉस्पिटलमधून करावी लागली.''

मला त्यानंतर, गेल्या वीस-पंचवीस वर्षांत, त्यांचे लेखन नजरेस पडे व कोणा स्नेह्याकडून हकिगत समजे, तेवढाच माझा त्यांच्याशी माझ्या बाजूने एकतर्फी संपर्क.

तळवलकर यांच्या मृत्यूनंतर, त्यांच्यासंबंधी सहकाऱ्यांनी, लोकांनी वेगवेगळ्या माध्यमांतून छान छान लिहिले आहे. तीन मोठ्या शोकसभा झाल्या. तेथे वक्ते उत्कटपणे बोलले. त्यामधून त्यांच्याबद्दल वाचकांत आदराची, प्रेमाची किती भावना होती ते दिसून आले, त्याबरोबर त्यांचे प्रगल्भ, विचारी, व्यासंगी व शैलीदार संपादक म्हणून आणि तितकेच रसिक, संवेदनशील व्यक्ती म्हणून दर्शन झाले. जवळ-जवळ साठ वर्षांची कारकीर्द होती त्यांची. त्यापैकी निम्मी वर्षे त्यांनी संपादक म्हणून महाराष्ट्राच्या सुशिक्षित, सुसंस्कृत जनतेला संमोहित केले. त्यांच्या कारकिर्दीचे साधारण तीन भाग दिसतात. त्यांनी पहिल्या वीस वर्षांत लेखनावरील व संपादक म्हणून हुकूमत प्राप्त केली. ते दुसऱ्या सोळा-अठरा वर्षांच्या टप्प्यात 'मेंटॉर संपादक' म्हणून हसतखेळत, आनंदात, रसिकतेने मौजमजा करत जगले व त्यांनी उभरत्या पिढीला ज्येष्ठत्वाचा हात दिला. ज्यांना त्यांच्या सहवासाचा त्या काळात लाभ झाला त्यामध्ये कुमार केतकर-गिरीश कुबेर यांच्यापासून नीतिन वैद्य-प्रवीण बर्दापूरकरपर्यंतचे अनेक सध्याचे अग्रणी व प्रौढ पत्रकार येतात. त्यानंतर तिसरा टप्पा येतो तो त्यांनी अमेरिकेत राहून केलेल्या व्यासंगी लेखनाचा. त्यामधून त्यांनी मराठी साहित्यात अनमोल अशा वैचारिक साहित्याची भर घातली. ही तिन्ही रूपे वेगवेगळी आहेत, पण त्यात एक समान धागा आहे तो त्यांच्या वाचनध्यासाचा. ते डोंबिवलीला बालपणीदेखील एका ग्रंथालयाचे चिटणीस होते व तेच वाचक म्हणून त्या लायब्ररीचा लाभ उठवत, अशा आठवणी त्यांनी लिहिल्या आहेत.

तळवलकर व 'मटा'चे वृत्तसंपादक दि.वि. गोखले एकत्र मला प्रथम भेटले ते मुंबईत सीएसटी समोरच्या 'एंपायर' (आता मॅक्डोनाल्ड) या रेस्टॉरंटमध्ये. मी त्यावेळी 'ब्रिटिश डेप्युटी हायकमिशन'च्या इन्फर्मेशन विभागात काम करत होतो. ती नोकरी कायम नव्हती, पण पगार बरा होता. त्याच सुमारास 'मटा'मध्ये




नोकरीच्या जागा तयार होत होत्या. गोखले वृत्तसंपादक असल्याने नोकरभरतीची जबाबदारी त्यांची होती परंतु 'टाइम्स'मध्ये भरती केलेल्या उमेदवारास वर्ष-सहा महिन्यांचे ट्रेनिंग घ्यावेच लागे. मी 'सकाळ'-'केसरी'तील सहा वर्षांचा अनुभवी पत्रकार होतो. शिवाय, 'ब्रिटिश डेप्युटी हायकमिशन'च्या इन्फॉर्मेशन सर्व्हिसमधील दीड वर्षांची नोकरी चालू होती, ती सहसंपादक या पदावर! गोखले यांनी त्यांच्या दुपारच्या चहाच्या वेळी 'एंपायर'मध्ये मला, मी 'मटा'त नोकरीसाठी अर्ज करावा हे पटवून देण्यासाठी बोलावले होते. तळवलकर त्यावेळी सहसंपादक होते आणि द्वा.भ. कर्णिक हे मुख्य संपादक.

मी 'मटा'च्या ट्रेनिंग डिपार्टमेंटला एक-दोन महिन्यांतच जॉईन झालो. माझे नंतरचे सहा-आठ महिने तेथे विविधभाषी प्रशिक्षणार्थी पत्रकारांबरोबर हुंदडण्यातच गेले आणि एके दिवशी, मला ''तुम्ही 'मटा'च्या संपादकीय विभागात हजर व्हा'' अशी सूचना ट्रेनिंग डिपार्टमेंटमधून देण्यात आली. मी द्वा.भ. कर्णिक यांच्या केबिनमध्ये जाऊन उभा राहिलो. मी माझे नाव सांगितले. कर्णिक माझ्याशी पहिले वाक्य बोलले ते, ''तुम्ही त्या अर्धी चड्डीवाल्यांपैकी नाही ना?'' असे होते.

'मटा' सुरू होऊन सहा वर्षे झाली होती. 'मटा'मध्ये त्यावेळी दोन गट होते. कर्णिकांचा रॉयवाद्यांचा/उदारमतवाद्यांचा आणि दुसरा, गोखले यांचा संघवाद्यांचा. मी गोखल्यांमार्फत आल्यामुळे कर्णिकांच्या मनात ती शंका उद्भवली असावी. तळवलकर हे आरंभी रॉयवादी वर्तुळात असत आणि कर्णिक जरी कट्टर रॉयवादी असले तरी तळवलकरांचे आणि कर्णिकांचे जमत अजिबात नसे. त्यामुळे बहुधा तळवलकर हे गोखले यांना घट्ट धरून असत. कर्णिक यांनी मला माझा उत्साह पाहून 'नवाकाळ' या दैनिकावर वृत्तलेख लिहिण्यास सुचवले. त्याला निमित्त होते, 'नवाकाळ'च्या खाडिलकरांनी रोटरी छपाई मशीन घेतल्याचे! रोटरी छपाई मशीन ही तंत्रक्रांती होती आणि कर्णिकांना, एका मराठी मध्यमवर्गीय मालक-संपादकाने ते विकत घेतले, ती भांडवली गुंतवणूक केली याचे अप्रूप वाटले होते! कर्णिक यांची पत्रकार म्हणून दृष्टी अशी व्यापक आणि शोधक होती. ते सर्व सहकाऱ्यांना विविध तऱ्हांनी प्रोत्साहन द्यायचे, वेगवेगळ्या ठिकाणी प्रवासाला पाठवायचे, त्यांना लिहिते ठेवायचे. 'मटा'चे त्या काळातील अंक काढले तर विविध सदरांनी, ललित लेखनांनी भरलेले असे ते अंक दिसतील. त्यांनीच माधव गडकरी, शंकर सारडा यांना प्रोत्साहन देऊन, त्यांच्याकडून मोठमोठी संपादकीय कामे करवून घेतली.

'मटा'चे मूळ रूप म्हणजे सुशिक्षित मध्यमवर्गीय वाचकांसाठी वर्तमानपत्र अशी प्रतिमा. ती कर्णिक, गडकरी आणि सारडा यांच्या प्रयत्नांतून साकार झाली होती. तेव्हा पत्रकारितेत एक फंडा होता तो स्वातंत्र्य चळवळीतून आलेल्या वर्तमानपत्रांचा. म्हणजे संपादकाने वाचकाला शिकवून तयार करायचे असा. दुसरा यशस्वी फंडा नानासाहेब परुळेकरांनी 'सकाळ'मधून आणला होता. त्यात वर्तमानपत्राचे जनसामान्यांसाठी रूप अभिप्रेत होते. त्यांच्या व्यथावेदना व भावजगत यांना तेथे तोंड फोडले जाई. 'सकाळ'मध्ये व्यावसायिक पत्रकारितेची आधुनिक जाणीवही होती. 'छोट्या जाहिराती लोक बातम्यांप्रमाणे वाचतात' ही क्रांतिकारी घोषणा 'सकाळ'चीं! कर्णिकांच्या 'मटा'ने वर्तमानपत्रांत सुसंस्कृततेचा, उच्च अभिरूचीचा बाज आणला. गोखले यांनी गटबाजीचा भेदभाव न ठेवता कर्णिकांना उमदेपणाने सहकार्य केले. त्यांनी स्वत:देखील क्रीडा व युद्ध यांबद्दलच्या बातम्यांना व लेखांना मराठी वर्तमानपत्रांमध्ये प्रथमच प्रमुख स्थान दिले. ती त्यांची कामगिरी ऐतिहासिक महत्त्वाची आहे. तळवलकर हे कर्णिकांच्या त्या पाच-सहा वर्षांच्या काळात दुर्लक्षित होते. ते एका कोपऱ्यात बसत. ते स्वभावानेही घुमे होते. पुढे, ते परदेशी वकिलातींमध्ये जाऊ लागले, मुंबईच्या 'कॉस्मॉपॉलिटन वर्ल्ड'मध्ये मिसळू लागले तेव्हा आम्हाला अचंबा वाटे, की तळवलकर तेथे बोलतात कसे? त्यांना 'मटा'त येणाऱ्या अपरिचित माणसांशीही बोलता येत नसे. त्यांचे काम रोज 'धावते जग'मध्ये एक स्फुट लिहिणे एवढेच होते. दुसरे सहसंपादक मा.पं. शिखरे हेही अबोल होते, पण ते कर्णिकांच्या गटाचे. ते लिहायचे मोजके, पण त्यांची सुडौल भाषा म्हणजे मजा होती! ते व उपसंपादक रा.य. ओलतीकर यांची नावे त्यांच्या, वर्तमानपत्राच्या धबडग्यातील ललित भाषाशैलीसाठी घेतली जात.

कर्णिक मी 'मटा'त आल्यानंतर, सहा महिन्यांतच निवृत्त झाले आणि तळवलकर संपादक बनले. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी त्यांचे नाव 'टाइम्स' कंपनीचे मालक जैन यांना सुचवले असे त्यावेळी सर्रास बोलले जाई. मी पहिली एक-दोन वर्षे 'मटा'च्या स्पोर्ट्ससहित सर्व विभागांत काम केले आणि अंतिमत: पुरवणी विभागात स्थिरावलो. मी पुरवणी विभागाचा प्रमुख असल्याप्रमाणे त्यानंतर जवळ जवळ एकोणीस वर्षे कार्यरत होतो. तळवलकरांनीच मला ते स्थान अनभिषिक्तपणे दिले होते. तळवलकरांची यशवंतराव चव्हाणनिष्ठा किती प्रसृत होती त्याचे एक गंमतीदार उदाहरण सांगून पुढे जातो. आम्हाला पुरवणीच्या लेखांसाठी फोटो आणण्याकरता 'टाइम्स'च्या संदर्भ विभागात वरच्या मजल्यावर जावे लागे. तेथे जुलेखा नावाची सहकारी कामाला होती. मी एकदा एका लेखासाठी 'प्राणी संग्रहालयां'चे फोटो पाहत होतो. मला वाघाचा फोटो हवा तसा मिळत नव्हता. जुलेखा दुरून उद्गारली, ''तुम्हाला वाघाचा फोटो चव्हाणांबरोबर हवा असेल ना!'' संदर्भ विभागातील सर्वच मंडळी हसू लागली. 'टाइम्स'मधील स्टाफ वगळाच, पण इतर भाषांमधील सहकारीदेखील तळवलकरांच्या यशवंतरावांबद्दल

'सॉफ्ट' असण्यासंबंधी चेष्टेखोर उल्लेख करत.

त्या काळात वर्तमानपत्रांच्या संपादकीय विभागात नोकरश्रेणी फारशा कठोर नव्हत्या. उपसंपादक-प्रमुख उपसंपादक, वार्ताहर-प्रमुख वार्ताहर, वृत्तसंपादक, सहसंपादक, संपादक एवढाच स्टाफचा पसारा असे. गोखले यांनी स्पोर्ट्सचा विभाग स्वतंत्र करून, त्यासाठी दैनिकाचे शेवटचे पान राखीव ठेवून, तेथे प्रमुख म्हणून वि.वि. करमरकर यांची नेमणूक केली. करमरकर हे पुढे, क्रीडासमीक्षक म्हणून मोठे नाव झाले. गोखले यांनी भारतावर चिनी आक्रमण १९६२ साली झाले तेव्हा 'मटा'च्या पहिल्या पानावर युद्धविषयक स्तंभलेखन सुरू केले. त्यात विलक्षण स्फुरण असे. तो मराठी दैनिकांतील युद्धविषयक नियमित लेखनाचा आरंभ ठरला. गोखले यांनी युद्धविषयक पुस्तके लिहिली. त्यांना त्यामधून मोठी लोकप्रियता लाभली. रिपोर्टिंग डेस्कवर चंद्रकांत ताम्हणे व विशेषत: दिनू रणदिवे हे दोन खंदे प्रमुख वार्ताहर होते.

'मटा' १९६० साली जूनमध्ये सुरू झाला. त्याच्या पहिल्या काही अंकांतच ना.सी. फडके, पु.भा. भावे यांच्यासारख्या त्या काळच्या श्रेष्ठ व लोकप्रिय लेखकांचे लेखन प्रसिद्ध होऊ लागले व त्यामुळे वाचकांना 'पेपर'ची जातकुळी कळून आली. 'रविवारच्या पुरवणी'चा जम काही आठवड्यांतच बसला, तो मुख्यत: शंकर सारडा याच्या कल्पक संयोजनामुळे. पण त्याचा भर साहित्यावर असे. त्यामुळे मराठी साहित्य व जगभरचे, मुख्यत: इंग्रजी वाङ्मय लोकांसमोर योग्य परिप्रेक्ष्यात येऊ लागले. त्याने एका लेखात खानोलकरांच्या लेखनास शेक्सपीयरच्या शोकात्मिकांच्या तोडीस नेऊन बसवले. त्यावर वाद-प्रतिवाद झडले, परंतु त्यामुळे मराठी साहित्यातील खानोलकरी लेखनाची सखोलता वादातीत ठरून गेली. सारडाने गंगाधर पाटील यांची गहन असणारी पण प्रतिष्ठेची समीक्षा मराठी वर्तमानपत्रांत छापण्याचे धाडस केले! सुशिक्षितांना त्यामधून नवी दृष्टी लाभू लागली. त्याबरोबर सारडाच्या संयोजनातून मराठी भावविश्वही अचूक पकडले गेले. नरेंद्र बल्लाळची साथ सारडाला असे. 'लग्नानंतरचे पहिले वर्ष' ही वाचकांसाठी स्पर्धात्मक मालिका आठवते. तिला प्रचंड प्रतिसाद लाभला. सर्वसाधारण मराठी मध्यमवर्गीय स्त्री 'मटा'मधून बोलू लागली! तिला तो तिचा पेपर वाटू लागला. मटा'च्या रोजच्या अंकांतही सत्याधारित ललित लेखनाला बराच वाव दिला जाई. कर्णिक-शिखरे-गडकरी स्टाफवरील इच्छुक सहकाऱ्यांना त्यासाठी प्रवृत्त करत. त्याखेरीज बाहेरच्या लेखकांचेही स्तंभ नियमित असत. विजय तेंडुलकर यांची 'कोवळी उन्हे' हे त्यांपैकीच गाजत गेलेले सदर. चिं.त्र्यं.खानोलकर, शं.ना.नवरे यांनीही तसे स्तंभ लिहिले. 'मटा' मराठीत अवतरल्यानंतर मराठीतील साप्ताहिकांचे, त्या आधीच्या दोन दशकांतील गाजलेले दिवस संपले असे बोलले जाई. मग साप्ताहिकांत बाण राहिला तो 'श्री'सारख्या सनसनाटी साप्ताहिकाचा.

आम्ही पुण्याचे पत्रकार 'मटा'चे नवनवे प्रयोग औत्सुक्याने पाहत होतो. महाराष्ट्रातील प्रत्येक तरुण पत्रकाराची मनीषा 'मटा'त नोकरी मिळावी अशी असे! मी 'मटा'त आलो तेव्हा सारडा 'निमन फाउंडेशन'ची पाठ्यवृत्ती घेऊन वर्षभरासाठी अमेरिकेत गेला होता. त्याने परतल्यावर नोकरी सोडली. गडकरी न्यूज डेस्कवर काही दिवस होते. परंतु तेही कर्णिकांपाठोपाठ चालले गेले. ते गोव्यात 'गोमंतक'चे संपादक झाले. त्यांचे तळवलकर-गोखले यांच्या राज्यात काही चालणे अवघड होते परंतु सारडाने 'मटा'ला वाङ्मयीन अभिरुचीचे वळण जसे लावले, तसे गडकरी यांनी महाराष्ट्राच्या जिल्हा राजकारणाचा वेध घेऊन, विकेंद्रित लोकशाहीच्या नव्या प्रयोगाचे यशापयश वाचकांसमोर मांडले. त्यामधून जिल्हा पुढारी व त्यांचे राजकारणातील डावपेच/चमचेगिरी हे शहरी वाचकाला कळू लागले. अरुण साधूच्या 'सिंहासन' कादंबरीचा 'बॅकड्रॉप' गडकरी यांच्या त्या लेखनाने तयार झाला असे म्हणता येईल. गडकरी यांचा झपाटा व उत्साह तळवलकरांच्या नेमस्त प्रकृतीला मानवणारा नव्हता. सुधाकर अनवलीकर याचे पुण्याहून लेखन रसीले असे. तो त्याच्या बातम्या-लेखांतून महाराष्ट्राच्या विचारी जगातील सामर्थ्य व त्यामधील दंभ अचूक पकडत होता. पुणे ही महाराष्ट्राची शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी होती. कर्णिकांनी त्या शहराचे महत्त्व रेखून तेथे अनवलीकर या धडाडीच्या रसिक वार्ताहराची नेमणूक केली होती. अनवलीकरचे तीन महिन्यांपूर्वीच निधन झाले.

तळवलकर 'मटा'चे संपादक या पार्श्वभूमीवर झाले होते. तळवलकरांची संपादक म्हणून सुरुवात चाचपडतच झाली. ते पहिली काही वर्षे डोंबिवलीहून कामावर येत. स्वाभाविकच, त्यांचे डोंबिवली प्रेम त्यांच्या लेखनातून व्यक्त होई. त्यांचे पु.भा. भावे, ग.दि. माडगुळकर यांच्याबद्दल आस्थेवाईक लेखन आरंभी प्रसिद्ध झाल्याचे आठवते परंतु त्यांनी त्यांचे व्यक्तिगत स्नेहबंध काही काळातच जेवढ्यास तेवढे केले. ते संपादकीय कामामध्ये व्यक्त होऊ देत नसत. थोडी पुढची गोष्ट. पुण्याच्या मधुकाका कुळकर्णी यांचे श्रीविद्या प्रकाशन ऐन बहरात होते. लक्ष्मणशास्त्री जोशी हे जणू त्यांच्या घरचेच असत. मधुकाकांचा एकदा 'मटा'त डायरेक्ट लाइनवर फोन आला, की लक्ष्मणशास्त्रींनी लिहिलेला 'श्रीविद्या'च्या अमुक पुस्तकाचा अभिप्राय छापायचा आहे. मी म्हटले, तळवलकरांना विचारतो. तर तळवलकर स्वत: फोन घेण्यास केबिनबाहेर आले. रागीट आवाजात मधुकाकांना म्हणाले, 'संपादक मी आहे की तर्कतीर्थ की तुम्ही? पुस्तक पाठवा. आम्ही ठरवू 'रिव्ह्यू' कोणाचा छापायचा ते.' त्यांच्या वागण्याबोलण्यात तर्कतीर्थांपर्यंतच्या स्नेहीवर्तुळाबद्दल असा तडकफडकपणा येत गेला. एकदा पु.भा.भावे डोंबिवलीहून दुपारी १२ च्या सुमारास ऑफिसात येऊन थडकले. तळवलकर केबिनमध्ये काही लिहीत होते. मी त्यांना भावे आल्याचे सांगताच त्यांच्या कपाळावर आठी उमटली. म्हणाले, ''बसायला सांगा.'' भावे तासभर केबिनबाहेर बसून होते! इतकी त्यांची त्यांच्या लेखनावरील भक्ती वाढू लागली होती.

तळवलकरांचा नूर ते चर्चगेटला कंपनीच्या जागेत राहायला आल्यावर बदलला होता. तो त्यांच्या अग्रलेखांतूनही (विषयांची

निवड व लेखनशैली या दोन्ही अंगांनी) व्यक्त होतो असे आम्ही म्हणायचो. त्यांचे 'एशियाटिक'मध्ये, 'एनसीपीए'मध्ये जाणे-येणे वाढले. त्यांच्या भेटी परदेशी, विशेषत: ब्रिटिश व अमेरिकन वकिलातींना वारंवार होत. काळ जागतिक शीतयुद्धाचा होता. त्यामुळे अमेरिका व इंग्लंड हे देश (आणि रशियाही) त्यांच्या वकिलातींमार्फत स्थानिक दैनिके, त्यांच्या साप्ताहिक आवृत्ती यांच्यावर प्रभाव टाकण्यासाठी वाटा वाकड्या करत- वृत्तपत्रांच्या संपादकांना इंग्लंड-अमेरिकेतील प्रकाशने वाचण्यास नियमित सप्रेम पाठवत. तो त्यांच्या प्रचाराचा भाग असे. (मी 'ब्रिटिश इन्फर्मेशन सर्व्हिस'मध्ये तशीच कामे तर करत होतो!) तळवलकरांना विदेशी वृत्तपत्रे वाचण्याची चटक लागली ती अशी. ते संपादक झाल्यानंतरच्या पहिल्या तीन-चार वर्षांत जर्मनी व इंग्लंड यांचा दौरा तशाच सौजन्याने करून आले. 'एनसीपीए'मध्ये कुमुद मेहता असत. नंतर पुल तेथे अध्यक्ष झाले. ते पुण्याहून येत, दिवस-दोन दिवस गेस्ट हाऊसमध्ये राहत. कुमुद मेहता तळवलकरांना सिनेमांना बोलावून घेत. त्यामधून शीतयुद्धातील दक्षिण अमेरिका, आफ्रिका या खंडांतील राजकारणाचे पदर उलगडले जात. 'एशियाटिक'मध्ये विद्वत्जनांचा अड्डा असे - नाना जोशी, विश्वास पाटील, दुर्गा भागवत वगैरे. त्यातच ज.द. जोगळेकर हे कट्टर हिंदुत्ववादी विचारांचे गृहस्थ होते. तळवलकरांची त्यांच्याबरोबरही सलगी गोखल्यांच्या स्नेहामुळे झाली. तळवलकरांचा तो बदललेला पवित्रा 'मटा'मधील लिखाणातून व्यक्त होऊ लागला. त्यांची अशोक शहाणे यांच्याशी मैत्री एशियाटिक'मध्येच जुळली आणि त्यामधून शहाणे यांचा पहिला लेख मटा'च्या पुरवणीत अवतरला. तो शहाणे यांच्या त्या आधीच्या गाजलेल्या 'क्ष किरण'च्या तीक्ष्णतेचा नसला तरी जुन्या रूढ मराठी साहित्याचे तितकेच वाभाडे काढणारा होता. तळवलकरांच्या चेहऱ्यावर कोणाची तरी खुमखुमी जिरली की हास्याची, त्यांच्या सर्व फोटोंत दिसणारी एकाच प्रकारची लकेर झळके. पत्रकाराला असे खमंग लेखन प्रिय असतेच. शिवाय, तळवलकर व्यक्ती म्हणून वस्तुनिष्ठ वा अलिप्त जरा अधिकच होते. अशोक शहाणे यांनी त्यांच्या फटकाऱ्यांमधून भावे-माडगुळकरांनाही वगळले नव्हते असे आठवते. तळवलकर त्यांच्या घट्ट मित्रांना दुखावण्याइतके धाडसी व अलिप्त झाले होते! त्यानंतर अशोक शहाणे यांनी 'मटा'साठी खूप सारे लेखन केले. शहाणेदेखील 'सुधारले' होते. तेही प्रस्थापितांना मानू लागले आणि त्यांनी त्यांच्या 'प्रास प्रकाशना'च्या 'प्रिय बाई' या पुस्तकासाठी चक्क पुलंची शिफारस घेतली! तळवलकर अशा विविध प्रभावांनी घडत गेले.

तळवलकर यांच्या संपादक म्हणून कारकिर्दीत दोन महत्त्वाचे समाजबदल घडून आले. पहिल्या बदलात देशाने राजकारणाची धुरा बदलली. दुसऱ्या, १९८५-८६ नंतर घडून आलेल्या बदलात तंत्रवैज्ञानिक क्रांतीने मनुष्यजीवनाचाच कब्जा घेतला.

स्वातंत्र्य मिळून वीस वर्षे होऊन गेली होती, महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन दहा वर्षे लोटली होती. साक्षरतेचा प्रसार झाला होता. लोकांना समृद्धीची चाहूल लागली होती असे म्हणता येणार नाही, तथापि त्यांच्याकडे पैसा खुळखुळू लागला होता. काळच पालटत होता. पंडित नेहरूंचे राजकारण मागे पडले होते. इंदिरा गांधी पुढे आल्या होत्या. त्यांच्या धाडसी राजकीय निर्णयांमुळे (बँकांचे राष्ट्रीयीकरण, तनखेबंदी, गरिबी हटावच्या घोषणा) तळच्या समाजाला नवे बळ प्राप्त होत होते. सामाजिक उलथापालथ वाढली होती. मध्यमवर्गीयांना सुरक्षित जीवनाचे वेध लागले होते, सुस्थितीची स्वप्ने दिसू लागली होती. त्यामुळे इच्छा, अपेक्षा, आकांक्षा सर्व स्तरांवर वाढल्या होत्या. त्याचबरोबर मागण्याही. स्वातंत्र्य चळवळीचे 'स्पिरिट' मागे पडून लोकशाही राजकारणाचे प्राबल्य पसरले होते. तो कोलाहल मोठा होता. सामाजिक-सांस्कृतिक विसंगती भडकपणे जाणवू लागल्या होत्या. त्या वाङ्मयकोशासारखे प्रकल्प, ग्रंथसंग्रहालय-साहित्य संघ यांसारख्या संस्था - तेथील पदाधिकारी यांच्या वर्तनव्यवहारात दिसू लागल्या होत्या. त्या निमित्ताने वा.ल. कुलकर्णी, म.वा. धोंड अशा थोरांची नावेही प्रकट होऊन गेली. एकूणच, प्रस्थापित व्यवस्थांच्या बाबतीतील असंतोष सर्व स्तरांवरील बंडखोरीतून आणि चळवळींतून तीव्रपणे व्यक्त होत होता. राजकारणात विकेंद्रीकरण होत होते. जिल्हा परिषदा व जिल्हा बँका सामर्थ्यवान जाणवू लागल्या होत्या. तरी सांस्कृतिक-सामाजिक क्षेत्रे मुंबई-पुणेकेंद्री होती. वर्तमानपत्रांच्या मुंबई आवृत्तींचा प्रसार महाराष्ट्रभर होता. त्यामुळे 'मटा' व तळवलकर यांचे लेखन साऱ्या महाराष्ट्रभर पोचे. त्यांचा दबदबा सर्वत्र होई.

तळवलकर स्वत: तशा घडामोडींपासून दूर राहत, पण सारे सूक्ष्मतेने ताडून पाहत. त्यांचे वाचन अफाट वाढले होते. त्यांचे ते व्यसनच जणू झाले होते. त्यामुळे ते रोजचा अग्रलेख लिहित तो विलक्षण जोरकस असे. तळवलकरांच्या लेखनशैलीला ती धार होती. ते इंग्रजी पुस्तके-वर्तमानपत्रे यांतील लेखन वेगवेगळ्या स्तंभांमधून उद्धृत करत. ते इंग्रजी साहित्यातील, विचारपरंपरेतील नवनवे प्रवाह नोंदवत. तळवलकर वाचकांना एका बाजूला विश्वदर्शन घडवत असताना दुसऱ्या बाजूस मराठी समाजातील विसंगतीपूर्ण हीन, कद्रू वृत्ती-प्रवृत्तींवर हल्ले करत होते. त्यांचे त्यासाठी संदर्भ पाश्चात्य वर्तमानपत्रांतील व साहित्यातील असत. त्या परिस्थितीत मध्यमवर्गीय वाचकाला तळवलकरांचे अलिप्त राहून तडकफडक, रोखठोक लिहिणे आवडू लागले होते. स्वाभाविकच, अत्रे यांच्या मराठ्याचा जसा आमजनांत धाक वाटे, तसाच तळवलकरांच्या 'मटा'चा दरारा सुसंस्कृत जगात निर्माण झाला होता. वाचक तशा लेखनाने खूष होत. त्यांना वाटे, की तळवलकर जणू मूल्यांची जपणूक करत आहेत!

तळवलकर सार्वजनिक ठिकाणी दिसत नसत; एवढेच काय, त्यांचे स्वत:चे फोटोदेखील 'मटा'त प्रसिद्ध होत नसत. त्यामुळे त्यांचे लेखनातून होणारे दर्शन, त्यांनी 'वाचस्पती' या स्वीकारलेल्या टोपणनावाला शोभेसे 'अपौरुषेय' वाटे. प्रत्यक्षात त्यांचे व्यक्तिमत्त्वही लालसर गोरेगोमटे, सुदृढ, नीटनेटके व तेजस्वी वाटावे असे होते. त्यांच्या चेहऱ्यावर व आविर्भावात बुद्धीचे तेज दिसे. त्यामधून त्यांच्याबद्दलचा आदर/दरारा वाढत गेला. त्यांच्या

लेखनाचा झपाटा इतका होता, की काही जाणते लोक त्यावेळी म्हणत असत, ''तळवलकर वाचतात आणि ओकून टाकतात. त्यांनी थोडे रिचवावेसुद्धा!''

तळवलकर जे लिहीत होते ते मराठी संकुचित जगाला अपूर्वाईचे होते. तोपर्यंत मराठी मनाला बाहेरच्या जगाचा परिचय इंग्रजी अभिजात पुस्तकांचे वाचन, हॉलिवूडचे सिनेमा आणि ज्ञानेश्वर नाडकर्णी यांच्यासारखे कोणी पत्रकार-लेखक इंग्लंड-युरोपला जाऊन आल्यानंतर त्यांचे प्रत्यक्षदर्शी लेखन यांतून जेवढा होईल तेवढाच. बेडेकरांची 'रणांगण' आणि मर्ढेकरांची कविता हे साहित्य त्याच 'जॉनर'मधले व म्हणून मराठी समाजाच्या खूप पुढचे, आगळेवेगळे वाटणारे. प्रत्यक्ष त्यापलीकडचा वैश्विक दृष्टिकोन मराठी समाजासमोर त्याआधीच्या पंचवीस-तीस वर्षांत प्रकटला नव्हता. (साधारण १९२५-३० ते १९६०-७०. दुसऱ्या महायुद्धाच्या हकिगतीदेखील नेमक्या पोचत). ते सारे तळवलकरांच्या लेखनातून कळून येई. युरोपातील माणसे जीवन किती विविधांगांनी पाहतात व कशा रसवत्तेने जोखतात हे जाणवून जाई. त्यामुळे श्री.पु. भागवत, य.दि. फडके यांच्यासारखे मातब्बर संपादक-साहित्य संशोधकदेखील तळवलकरांकडे अचंब्याने पाहू लागले. त्यांचे अग्रलेख काही आम वाचकांना तर तोंडपाठ असत! मी पुण्यात प्राध्यापकांच्या तोंडून तळवलकरांच्या अग्रलेखांचे तसे पठन ऐकलेले आहे. प्रकाशक केशवराव कोठावळे यांच्या पत्नीने त्यांच्या मृत्यूनंतर जो लेख लिहिला, त्यामध्ये 'मटा'चा हृद्य संदर्भ आहे. श्रीमती कोठावळे यांनी म्हटले होते, की केशवरावांना निद्रानाशाचा विकार होता. त्यामुळे ते सकाळी नऊ-साडेनऊ वाजता उठत. त्यांना जाग येताच बाजूच्या टेबलवर चहाचा कप आणि 'मटा' हवा असे. तो तेथे नसेल तर ते संतापत. माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील हे सुशिक्षित नव्हते. त्यामुळे त्यांना वाचनाबद्दल औत्सुक्य नसे. तथापि, ते त्यांना तळवलकरांच्या अग्रलेखांनी वाचते केले असे सांगत.

दुसरा समाजबदल १९८६ च्या सुमारास टीव्ही कलर्ड झाला व त्यामुळे घडून आला. त्याची बीजे टीव्ही १९७२ साली आला तेव्हाच पेरली गेली होती. पण कलर्ड टीव्हीपाठोपाठ फोटो टाइप सेटिंग आले, पीसी आला, नंतरच्या दशकात इंटरनेट आले. मोबाईलने तर धुमाकूळच घातला आहे. तळवलकर या बदलालाही तरुण मनाने सामोरे गेले, त्यांनी स्टाफमधील आम्हा कोणाच्याही आधी हातातील बॉलपेन टाकून पीसीवरील मराठी लेखन सुरू केले. पुढे, विद्यमान संपादक अशोक पानवलकरने तत्संबंधी वाचकांचे अवधान वाढवण्याकरता लेखनयज्ञच आरंभला. तळवलकर यांना त्या क्रांतीतील तांत्रिकतेत वा तिच्या सामाजिक परिणामांत मात्र फार औत्सुक्य नव्हते. त्यांना त्यांचे लेखन नवीन पद्धतीने व जलद गतीने वाचकांकडे पोचत आहे याबद्दलच फार ओढ वाटत होती. त्यामुळे त्यांच्या लेखनाचे विषय फार बदलले नाहीत. फक्त त्यांचा विश्वसंचार सायबर वेगाने सुरू राहिला.

तळवलकर सकाळी दहा वाजताच 'मटा'च्या कार्यालयात येत व बऱ्याच वेळा लगेच अग्रलेख लिहून टाकत. त्यांची पहिली मीटिंग सकाळी अकरा वाजता होई- ती सहसंपादक मा.पं. शिखरे, रा.के. लेले, मी व कधी कधी भालचंद्र वैद्य अशी. त्या वेळी गप्पा सर्वसाधारण असत. त्यांना एका बाजूला महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनाबद्दल तुच्छता वाटे आणि दुसऱ्या बाजूला, ते त्याच जीवनाचा भाग असल्यामुळे त्यासंबंधी औत्सुक्य असे व सतत नवनवीन माहिती हवी असे. ते त्या सकाळच्या सत्रानंतर दुपारी एकच्या बेताला पुन्हा केबिनबाहेर येऊन माझ्या टेबलासमोर बसत. तेव्हाही त्यांच्या मराठी साहित्य-संस्कृती जगातील अनेक गोष्टींबद्दल विचारणा असत. तशा 'गॉसिप' गोळा करणे हा मोठाच उद्योग माझ्यासाठी असे. तळवलकरांची पु.ल., ना.गो. कालेलकर, व्यंकटेश माडगुळकर, मं.वि. राजाध्यक्ष यांच्यामधील उठबस बरीच वाढली होती. ते जवळ जवळ प्रत्येक वीकेंडला पुण्याला जात. त्यांची ठरलेली शनिवार दुपारची सिकंदराबाद एक्स्प्रेस ही गाडी असे. रविवारची पुरवणी त्या आधी सकाळी अकरा वाजता छापून आलेली असे. बदलत्या काळानुसार पुरवणीचा ढाचा निव्वळ वाङ्मयीन अभिरुचीकडून समाज-संस्कृतीच्या अनेकांगांकडे वळला होता. वाचकांचा वाढता सहभाग ही नवी क्लृप्ती रूढ झाली होती. समाज जसा प्रस्फुटित होत होता तसे मराठी नाटक-चित्रपट यांमध्ये नवनवे प्रयोग होत होते. तेंडुलकरांची 'घाशीराम'-'सखाराम' ही नाटके, श्रीराम लागू यांचा 'गार्बो'-अमोल पालेकरचे 'गोची'-'वासनाकांड' यांचे प्रयोग, सत्यदेव दुबेची कळकळ, छबिलदासची चळवळ; तसेच, फिल्म फेस्टिवल्स व स्थानिक फिल्म सोसायट्यांकडून होणारे पूर्व युरोपीय देशांतील चित्रपट प्रदर्शन यांनी चोखंदळांसाठी नवे जग उघडून दाखवणे सुरू केले होते. मराठी साहित्यात भाऊ पाध्ये, ह.मो. मराठे यांचे बंडखोर नवलेखन स्थिरावले होते. दलितांचा नवा प्रवाह उमटला होता. त्या सगळ्यांचे दर्शन 'मटा'च्या पुरवण्यांत होई. दैनिकात वार्ताहरांचा चमू चतुरस्त्र होता. रणदिवे यांची शोधकता, वि.ना. देवधरांची संस्कारशीलता, अशोक जैनची विदग्ध रसिकता, गो.आ. भट यांची तपशिलातील अचुकता व नीला उपाध्ये यांची तडफ असे विविध पैलू तेथे प्रकट होत. गावोगावी वार्ताहरांचा संचही सक्षम होता. तळवलकर त्यामध्ये दोन प्रकारची भर घालत. पाश्चात्त्य नियतकालिके व पुस्तके यांमधील विचारप्रवाह आणि मुंबईच्या कॉस्मोपॉलिटन जगातील घडामोडी - त्यामध्ये नानी पालखीवाला यांच्या भाषणांपासून 'जीना हाऊस'पर्यंतच्या विविध हकिगतींचा समावेश असे. कधी इस्त्रायलच्या राजदूताचा इंटरव्ह्यू घ्यावा लागे. असे साहित्य असले, की तळवलकर समाधान पावत. पण त्यांचा स्वभाव समाधान-खुशी व्यक्त करण्याचा नव्हता. उलट, ते उणिवा, त्रुटी यांवर नेमके व जखम होईल अशा तीक्ष्णतेने बोट ठेवत. त्यांच्या लेखनात ते तसेच व्यक्त होई. त्यामुळे संबंधित लोक जखमीदेखील होत.

जे लोक त्या फटकाऱ्यांनी जखमी होत त्यांतील काहींचा संताप सात्त्विक असे, पण त्यांना मराठी सांस्कृतिक जगात कोणी त्राता नसे. साहित्यसमीक्षक चंद्रकांत बांदिवडेकर हे एकदा असे

चिडून 'मटा'त आले, कारण तळवलकरांनी अग्रलेखात हिंदी साहित्यजगतावर काही निमित्ताने कडाडून हल्ला चढवला होता. तळवलकरांनी हिंदी साहित्य वाचलेही नव्हते, परंतु त्यांना त्याबद्दल पूर्वग्रह होते. ('काहे दिया परदेस?' या मालिकेतील मोहन जोशी!) बांदिवडेकर तळवलकरांच्या आक्षेपांचे निराकरण करू शकले नाहीत कारण त्यांचे आक्षेप निराधार होते. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक ग.ना. जोशी यांचा ग्रंथ न वाचता त्यावर तळवलकरांनी अग्रलेखातून टीका केली व त्यांना पुढे खुलासे छापत बसावे लागले. 'बँक ऑफ महाराष्ट्र'चे अध्यक्ष वसंतराव पटवर्धन यांच्यावरील हल्ला कुप्रसिद्ध आहे. तळवलकरांची ताकद त्यांच्या पूर्वग्रहांत होती. ते पूर्वग्रह अत्याग्रह वाटावे इतके तीव्र होते. त्यामुळे त्यांच्याकडून माणसे दुखावली जात. कोणीतरी कोणाला तरी झोडपून काढत आहे याचा आनंद वाचकांना वाटे. अशी कितीतरी उदाहरणे! 'सचिवालयात मेहुण', 'समाजवादी लक्षभोजन', 'सूक्ष्मातील विनोबा स्थूलातून आपण', 'नाथांचे भारूड', 'देवरस यांचे सीमोल्लंघन', 'भालबांचे नीतिपुराण', 'यशवंतराव बीसकलमे' अशांसारखे त्यांचे अग्रलेख गाजले. त्यांतील प्रासंगिकता व भेदकता विलक्षणच आहे. परंतु मागे वळून बघता ती देखील व्यक्तिगत टिकेचीच उदाहरणे वाटतात. तळवलकर त्यामधून बदलत्या काळाचे नवे आकलन सुचवत नाहीत. ते लेखन वर्तमानपत्रीय 'एक्स्पोजर' या पातळीवर राहते.

'मटा' आणि 'लोकसत्ता' यांच्यामध्ये वेगळीच चुरस असे. 'लोकसत्ता' मुंबईत 'मटा'च्या पुढे जवळ-जवळ लाख प्रतींनी होता, पण 'मटा' सुसंस्कृत शहर, पुण्यामध्ये अकरा हजार प्रती विकला जाई तर 'लोकसत्ते'च्या तेथे जेमतेम एक हजार प्रती प्रसारित होत. 'मटा'च्या वितरण विभागाला त्याचा खप मुंबईतही 'लोकसत्ते'एवढा असायला हवा असे वाटे आणि 'लोकसत्ता' मात्र 'मटा'ची प्रतिष्ठा मिळावी म्हणून तडफडत असे. माधव गडकरी यांनी त्यांच्या 'लोकसत्ते'च्या संपादकपदाच्या उत्तरकाळात ती प्रतिष्ठा काही प्रमाणात मिळवली. गडकरी यांच्या पाठोपाठ अरुण टिकेकर, कुमार केतकर व आता गिरीश कुबेर यांनी लोकसत्ते'ची प्रतिष्ठा वाढवत नेली आहे. पुल हे महाराष्ट्राचे नंबर एकचे लाडके व्यक्तिमत्त्व असेल तर गडकरी त्यांच्या पाठोपाठ दुसऱ्या स्थानावर १९८० च्या दशकात होते. तथापि, गडकरी यांची ती लोकप्रियता 'मटा'च्या प्रतिष्ठेच्या स्थानाला धक्का लावू शकली नाही. ते पुढे, भारतकुमार राऊत यांच्या संपादकीय कारकिर्दीत घडून आले.

गडकरी 'लोकसत्ते'तून निवृत्त झाल्यानंतर कोठे कोठे कॉलम लिहीत. त्यांची त्यावेळी मॅजेस्टिक गप्पांत मुलाखत झाली. त्यांना विचारले गेले, की संपादकपदाची कवचकुंडले गेल्यावर आता कसे वाटते? ते उद्गारले होते, की मजकडे अजून तेवढेच लोक येतात वगैरे. वास्तवात त्यांनी ताकद गमावली होती. त्यांच्या लेखनातील तळमळ, त्यांचा स्वत:चा कार्यकर्त्यांसारखा उत्साह वाचकांना भावून जात असे. त्यामुळे अनेक व्यक्तींना न्याय मिळालाही. सामाजिक परिषदेसारखे काही उपक्रम उभे राहिले. तळवलकर यांना तशा प्रकारच्या चळवळ्या पत्रकारितेचा राग असे. त्यामुळे तळवलकर यांनी त्यांच्या स्वभावप्रकृतीला साजेसा, अर्थपूर्ण जगण्यासाठी संशोधनपर लेखनाचा, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रगल्भ दर्शनाचा बाज निवृत्तीनंतर स्वीकारला. त्यांचे पूर्वग्रहही वयाबरोबर वितळत गेले असावे.

'मटा'ला प्रतिष्ठेचे जे स्थान होते, त्याचे श्रेय तळवलकरांइतके त्यांच्या टीमकडेही जाते. ती टीम जुळून आलेली होती. 'मटा' ज्या परिस्थितीत निर्माण झाला त्या परिस्थितीत त्याची कारणे आहेत. शिवाय, ती कामगिरी कर्णिकांची व गोखले यांची. 'मटा'तील तळवलकरांचे मा.पं. शिखरे, दि.वि. गोखले, दिनू रणदिवे, अशोक जैन, कमलाकर नाडकर्णी, वि.ना. देवधर, नरेंद्र बल्लाळ, जोजफ नरोन्हा, काही काळ जगन फडणीस, बि.वि. करमरकर असे सहकारी तोडीस तोड होते. त्या प्रत्येकाची 'मटा'मधील कामगिरी ही स्पृहणीय होती. मी, भालचंद्र वैद्य व श्रीराम शिधये, आम्ही 'पुरवणी विभाग' स्वतंत्रपणे सांभाळत होतो. त्यात 'रविवार पुरवणी'ला नवे रूप लाभलेच, पण 'मनोरंजन पुरवणी', 'विज्ञान पुरवणी' अशा नव्या कल्पनाही राबवल्या गेल्या. दूरदर्शनने मराठी सांस्कृतिक जगात जे नवे 'आक्रमण' केले होते आणि मनोरंजनाचा जो नवाच फंडा रूजू पाहत होता त्याला 'मनोरंजन पुरवणी'ने तोंड फोडले तर बुधवारच्या 'विज्ञान पुरवणी'ने 'मटा'ची ''बौद्धिक खाद्य पुरवणारे दैनिक' अशी प्रतिमा राखली गेली; त्याचबरोबर बदलत्या नव्या युगाची चाहूलही घेतली गेली. त्या काळात 'मटा'च्या जाहिरातीचे 'स्लोगन' बसस्टॉपवर लागले ते असे होते - 'बातम्या तर सगळेच देतात. विचार फक्त 'मटा' देतो.' हे विचार फक्त अग्रलेखांत नव्हते, तर बातम्या-लेखांच्या पाठीमागे भूमिका स्वरूपात दडलेले होते व त्यांचाही वाचकमानसावर परिणाम होत होता. तो काळ वैचारिक आंदोलनांनी भारलेला होता. 'मटा'ने तो विविधांगांनी त्याच्या प्रतिमेत उतरवला होता. तळवलकरांचे सपासप फटकारे मारणारे अग्रलेख हा त्याचा घटक होता. अन्य बातम्या-लेखांचे काहीच नमुने उद्धृत करतो. कै. एकनाथ ठाकूर यांनी स्टेट बँक अधिकाऱ्यांच्या असोसिएशनमध्ये संजय गांधी यांच्याविरूद्ध ऐन आणीबाणीच्या काळात ठाम भूमिका घेतली. दिनू रणदिवे त्यावेळी 'मटा'त त्यांच्या बाजूने उभे राहिले. गोखले यांनी तर आणीबाणीविरूद्ध सत्याग्रह केला. आणीबाणीपूर्व काळात दुर्गा भागवत यांनी आकाशवाणी/दूरदर्शनवर बहिष्कार घातला होता. तर मी लेख लिहिला होता - 'आकाशवाणी, नव्हे प्रचारवाणी'. अशोक जैनचे दिल्लीचे वार्तापत्र म्हणजे मेजवानी असे. लेखकवर्गाची तर किती नावे नोंदवावी? वि.म. दांडेकर (अर्थ), सिंधु डोक्रस (सौंदर्य), लीना मोहाडीकर (सेक्स) असे नियमित लिहिणारे लेखक होते. त्यांच्या विषयांवरील त्यांचे लेखन मराठी वर्तमानपत्रांत प्रथमच येत होते. स.गं. मालशे, सरोजिनी वैद्य यांच्यासारख्या नामवंतांपासून बाळ फोंडके, सुबोध जावडेकर या त्यावेळच्या नव्या लेखकांपर्यंतची मंडळी विविध प्रकारे व विविध क्षेत्रांतून लेखन करत.

तळवलकरांचे संपादकीय लेखनाबाबतीत साधर्म्य लोकमान्य

टिळक यांच्याशी सांगितले जाते पण टिळकांनी नेतृत्व केले, त्यासाठी 'केसरी' हे साधन म्हणून वापरले. तळवलकरांकडे नेतृत्वगुण होते असे त्यांचे मित्रदेखील म्हणणार नाहीत; किंबहुना त्यांच्या मनात नेतृत्वगुण, संघटनकौशल्य, लोकसंपर्क यांबद्दल नफरत होती. तळवलकरांचा तो गुणविशेष मराठी मध्यमवर्गीयांना प्रिय वाटला असावा कारण मध्यमवर्ग १९५० नंतरच्या काळात अधिकाधिक संकुचित व स्वान्त होत गेला. त्याने सभोवतालातील सहभाग जवळ जवळ बंद केला. त्याने स्वत:चा उत्कर्ष साधला, दूर बसून टिकाटिप्पणी करण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती अंगीकारली. पुढे, 'मटा'ची 'पत्र नव्हे मित्र' ही तळवलकरांपुरती तरी फसवी घोषणा आली आणि एक मोठा पत्रकार-लेखक त्याचे 'पत्र नव्हे मित्र नव्हे कुत्रं असे विडंबन करू धजला. कारण तोपर्यंत 'मटा' हे प्रॉडक्ट आहे आणि त्याची विक्री जाहिराती करून साबणासारखी वाढवता येईल ही, नवे मालक समीर जैन यांची विचारसरणी टाइम्स'च्या बिल्डिंगमध्ये व एकूण वर्तमानपत्रसृष्टीत पसरली होती. गिरीलाल जैन या 'टाइम्स'च्या संपादकांचा बौद्धिक रूबाब घसरला होता. तळवलकरांना त्याचे धक्के, त्यांचा 'पेपर' मराठी असल्याने दुरून बसू लागले होते परंतु मराठी समाजमनातील त्यांची प्रतिमा मात्र अभंग राहिली होती.

तळवलकरांना त्यांच्या लेखनापलीकडे 'मटा'ची मोठी ताकद जी होती, ती कळली होती की नाही याबद्दल माझ्या मनात बऱ्याच वेळा शंका असते. 'मी शंका असते' असे म्हणण्याचे कारण म्हणजे मी 'मटा'तून मुक्त झाल्यानंतर जवळ-जवळ आठ वर्षे तळवलकर 'मटा'चे संपादक होते. ते त्यानंतरची वीस वर्षे अमेरिकेत राहून वेगवेगळ्या नियतकालिकांसाठी व त्यांच्या स्वत:च्या पुस्तकांचे लेखन करत होते. काही पत्रकार सहकाऱ्यांनी त्यांच्या त्या काळातील लेखनाबद्दल व सहवासाबद्दल लिहिले आहे. त्यावरून ते खूप सहृदय, सहकाऱ्यांबद्दल आत्मीयता बाळगणारे, पत्रकारितेबद्दल काही धारणा असलेले असे संपादक वाटतात. विनोद शिरसाठ यांनी त्यांच्या 'साधने'तील लेखनाच्या निमित्ताने त्यांच्या सामाजिक जाणिवेची जी उदाहरणे सांगितली ती थक्क करणारी आहेत! तो त्यांच्या जीवनकारकिर्दीचा दुसरा व तिसरा टप्पा आहे. आता विचार करताना त्यांच्या त्या नव्या जाणिवेचा आरंभबिंदू य.दि. फडके यांच्या लेखानिमित्ताने प्रकट झालेला दिसला. तो 'मटा'त प्रसिद्ध झाला. १९८५-८६ चा सुमार. फडके यांच्या लेखातील टिळकांच्या क्रांतिकारकत्वासंबंधीच्या उल्लेखाबाबत वेगळी व जादा माहिती कुमार केतकरने एका पत्राने दिली. तळवलकर त्याकाळी माझ्या टेबलासमोर नियमित येणारे केतकर-अरुण साधू यांच्याकडे थोड्या अधिक्षेपानेच पाहत असत परंतु केतकरच्या त्या पत्रातील संदर्भांमुळे तळवलकरांना नवेच घबाड मिळाले. फडके यांच्या लेखास उत्तर म्हणून ते सारे संदर्भ उद्धृत केले गेले. तो मोठाच वाद घडून आला पण त्यामुळे तळवलकरांची तरुण पिढीकडे पाहण्याची दृष्टी बदलली. कुमार तर त्यांचा लाडका बनून गेला. इतका, की त्यांनी त्यांचा वारस म्हणून त्याला पुढे 'मटा'चा संपादक ठरवले! तोपर्यंत खरोखरीच वेगवेगळ्या क्षेत्रांतील नव्या विचारी कार्यकर्त्यांची व लेखकांची एक परिपक्व फळी समाजात तयार होऊन पुढे आली होती. मध्यमवर्गाचे जुने सांस्कृतिक जग बदलले होते. पत्रकारांची तरुण, जिज्ञासू पिढी तयार होत होती. तळवलकरांचा त्यांच्याबरोबर सुखसंवाद होऊ लागला होता. तळवलकरही पोक्त, साधनसंपत्तीने युक्त झाले होते.एक व्यक्ती केवळ पत्रकारितेचा व्यवसाय करून सुखसमृद्ध होते असे मराठीतील ते पहिलेच उदाहरण. त्यामुळे तरुण पत्रकार प्रभावित झाले. तळवलकरांचे बदललेले रूप विलोभनीय आहे. तळवलकरांच्या नजरेने विचारजगतातील 'शिफ्ट' अचूक हेरला याबद्दल त्यांचे कौतुकच वाटते.

माझा स्वत:चा त्यांच्यासोबतचा वीस वर्षांचा नोकरीतील सहवास आत्मीय भावाचाच होता परंतु त्यावेळी स्टाफपैकी जवळ जवळ सर्वांचे मत तळवलकर तुसडे, स्वत:पलीकडे न पाहणारे, पत्रकारितेची बूज फारशी न ठेवणारे, हस्तिदंती मनोऱ्यात राहणारे व वावरणारे आहेत असे होते. तळवलकर १९९६ साली निवृत्त झाले तेव्हा मंगला आठलेकर आणि निखिल वागळे यांनी तळवलकरांबद्दल अत्यंत टिकास्पद लेखन केले आहे किंवा त्याही आधी श्रीपाद हळबे यांनी 'दिनांक' या साप्ताहिकात तळवलकर-गडकरी या संपादकद्वयाची तुलना करताना तळवलकरांच्या, समाजापासून फटकून राहण्याच्या वृत्तीचा 'आयव्हरी टॉवर'मधील संपादक म्हणून खरपूस समाचार घेतला आहे.

तळवलकरांना त्यांच्या टिमचे श्रेय कधी जाणवले होते किंवा नाही याचा अंदाज कोणी कधी घेतलेला नाही. त्यांच्या ज्या पाच-सात मुलाखती प्रसिद्ध आहेत त्यांमध्ये देखील त्यांना हा प्रश्न विचारला गेल्याचे दिसत नाही; ना कधी त्यांनी स्वत:हून त्याचा उल्लेख केल्याचे आढळते. अपवाद म्हणजे त्यांनी 'मटा'तून निवृत्त होताना जो निरोपलेख लिहिला त्यात 'मटा'च्या प्रतिष्ठेला त्यांचा संपादकीय वर्ग व लेखकवर्गही कारणीभूत होता अशी औपचारिक नोंद केलेली आहे. गिरीश कुबेर, नीतिन वैद्य, प्रकाश अकोलकर, प्रताप आसबे, अंबरीश मिश्र यांसारख्या नंतरच्या पिढीतील बुद्धिकुशल पत्रकारांनी त्यांच्याबद्दल फार सहृदयतेने लिहिले आहे. त्यांच्या पिढीचे ते 'आयडॉल' होते असाच त्यामुळे समज होतो. तेही तळवलकरांचे दर्शन अगदी वेगळे आहे.

तळवलकर ज्या काळात महत्त्वाचे पत्रकार व संपादक बनले, तो मुद्रण माध्यमाच्या परमोत्कर्षाचा काळ होता. मराठीत छपाई दोनशे वर्षांपूर्वी सुरू झाली. दैनिके व नियतकालिके एकोणिसाव्या शतकामध्ये प्रबोधनपर व राष्ट्रीय स्वातंत्र्य या हेतूंसाठी प्रसिद्ध होत गेली. त्यांपैकी 'केसरी' व 'ज्ञानोदय' ही अजूनही अस्तित्वात आहेत. मराठी पुस्तकेदेखील एकोणिसाव्या शतकात प्रकाशित झाली. पहिल्या मराठी कादंबरीचे आयुष्य दीडशे वर्षांहून थोडे अधिक आहे. मराठी कथेने तीस वर्षांपूर्वी शताब्दी साजरी केली. जांभेकरांपासून आंबेडकरांपर्यंतची वैचारिक प्रबोधन परंपरा धगधगती आहे. त्यांचे माध्यम मुद्रित शब्द मराठी नियतकालिकांना

व छापील साहित्याला उत्कर्षाचा काळ लाभला १९१५-२० पासून. तो टिपेला पोचला१९४५-५० च्या आसपास. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनापासून ते राज्य स्थिरावेपर्यंतचा काळ - म्हणजे १९५१ ते १९८०- मराठी प्रकाशनांचा सर्वोत्कट काळ मानता येईल. त्या काळात अनेकविध रुचींची साप्ताहिके-मासिके मराठीत प्रसिद्ध होत गेली - स्तन-नितंबांच्या गोष्टी छापणाऱ्या 'रंभा', 'दी बेळगावी' मासिकांपासून समाज प्रबोधन पत्रिके'सारख्या तत्त्वविचारी मासिकापर्यंत. प्रसिद्ध पुस्तकांची संख्या वाढली, त्यांचा विषयविस्तार घडून आला, पण मराठी अभिरुचीचे जाणीवपूर्वक संगोपन व संवर्धन झाले ते तीन पीठांकडून - 'मौज-सत्यकथा', 'माणूस' व 'मटा'. त्या तीन प्रमुख नियतकालिकांमध्ये त्या काळातील मराठी समाजाचे वेगवेगळ्या थरांतील प्रतिबिंब उमटलेले दिसते. तिघांचा वाचकसंघ मध्यमवर्ग हाच होता आणि त्यांची धारणा वैचारिक बैठक व सुसंस्कृतता ही होती.

'सत्यकथे'ची विक्री महिन्याला दोन-तीन हजार प्रतीच होती. 'मौजे'च्या पुस्तकाच्या पहिल्या हजार प्रतींची आवृत्ती संपण्यास दहा-दहा वर्षे लागत परंतु महाराष्ट्राच्या कोणत्याही जिल्ह्या-तालुक्यात गेले तरी 'मौजे'चा एखादा वाचक भेटे. असे ते अभिरूचीचे जबरदस्त 'नेटवर्क' होते. वाचकांना कमल देसाई यांच्या कथेपासून आरती प्रभू यांची पहिली कविता स्त्रीनावामुळे 'सत्यकथे'त कशी छापली गेली या कुजबुजीपर्यंत सर्व गोष्टी माहीत असत. त्यांना त्यांच्या परिसरात नाव असे. अशा तऱ्हेने 'मौज-सत्यकथे'चा सांस्कृतिक प्रभाव साऱ्या महाराष्ट्रावर होता. ('ग्रंथाली'ची वाचक चळवळ येऊन वातावरण मोकळे झाल्यावर पुढे, रा.रं. बोराडे यांनी त्या प्रभावाचे वर्णन 'दहशत' असे केले आहे. त्यांनी असे म्हटले, की आपल्याला जे वाटते ते लिहावे, की 'खटाववाडी'ला प्रिय ते लिहावे अशी भीती मनात असे.) 'मौज-सत्यकथे'च्या साहित्यातून जी अभिरुची व्यक्त होई ती मूल्यव्यवस्था होती. मौजे'चे संपादक व लेखक उदार होतेच; त्यांना सर्व तऱ्हेच्या विचारांना, चळवळींना समजावून घेणे आवडे, पण ते त्यांच्या शर्तीवर. त्या शर्तीचे मूळ रूढ हिंदू संस्कृतिव्यवस्थेत होते. ती व्यवस्था विषमतेवर आधारित होती. त्यांना दूर इंग्लंडमध्ये असलेले फॅबियन वगैरे उदार समाजवादी प्रवाह वाचण्यास आवडत, मात्र त्यांना ते प्रवाह येथील समाजजीवनाशी कसे जुळले जातील याची कळकळ जाणवत नसे. त्यामुळे त्यास अभ्यासाचे, व्यासंगाचे मूल्य राही. पूर्वास्पृश्यांना दुरून पाणी वाढत तसा तो प्रकार - तहान तर भागवली आणि सोवळेपणही राखले. 'एनबीटी'च्या पुणे येथील एका सेमिनारमध्ये श्रीपुना गं.बा. सरदार यांनी या मुद्यावर छेडलेदेखील परंतु दोघांनी त्यांचे मूल्याधार वेगवेगळे आहेत हे जाणून व 'सेमिनारचे औचित्य' राखून त्यांच्या त्यांच्या तलवारी म्यान केल्या. ती बातमी 'मटा'च्या पहिल्या पानावर प्रसिद्ध झाली! 'मौज-सत्यकथे'ने व तळवलकरांनी पुढे तिकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले.

'मौज-सत्यकथा' पंथास जनांचे साहित्य प्रचारी वाटे. भारतीय संस्कृतीची विशालता आणि समावेशकता व्यक्त करील असे अभिजात साहित्यही मराठीत संतपरंपरेनंतर निर्माण झालेले नाही. अशा अवस्थेत ती मंडळी 'फॉर्म'ची उजळणी करत राहिली. कवी शंकर वैद्य 'सत्यकथे'च्या कथा-कवितेला टोक आणण्याच्या प्रयत्नांचे वर्णन गांधी टोपीचा दाखला देऊन करत. काँग्रेस पुढारी स्वातंत्र्योत्तर काळात गांधी टोपीला नीळ व खळ देऊन टोक आणत असत, पण त्या क्रियेत त्या टोपीचा आशय हरवून जात असे. तसे 'सत्यकथे'च्या कथा-कवितेला टोक आणण्याच्या संपादकीय संस्काराचे होते का असा त्यांचा सवाल होता. अभिजनांच्या ललित साहित्याची ही तऱ्हा तर केतकर-राजवाडे-डांगे काळातील अभ्यास परंपराही लोपली होती. विद्यापीठीय पारिभाषिक अभ्यासाचा बडिवार माजवला जात होता. फुले-आंबेडकरांचे, एवढेच काय कर्व्यांचे विचार स्वीकारण्यासदेखील गेल्या शतकाच्या ऐंशीनंतर मोकळा होत गेलेला काळ उजाडावा लागला! त्यामुळे सर्व साहित्यासाठी पश्चिमेकडे पाहवे लागे. निरोगी, निकोप भारतीय परंपरासूत्रे व आधुनिक विचार यांमधून एकात्म नवपरंपरा निर्माण होण्याची शक्यता राहिली नव्हती. तो पेच अजून तसाच आहे.

'मौजे'च्या या 'त्यांच्या शर्ती'वरील प्रभावास तडा गेला तो 'माणूस'मुळे. 'माणूस' कधी पाक्षिक, कधी साप्ताहिक तर कधी द्विसाप्ताहिक असे प्रसिद्ध होत असे. 'माणूस'ची सुरुवात १९६१ सालीच झाली. ते व्यापक, विविध विचारांना खुली जागा देणारे नव्या चळवळींचे-प्रयोगांचे उदार व्यासपीठ होते. त्यामुळे 'मौजे'कडे अचंबा व आदरयुक्त भीतीने पाहणारा मराठी वाचक थोडा मोकळा झाला आणि तो किलकिल्या झालेल्या डोळ्यांनी 'माणूस'च्या माध्यमातून समाजवास्तवाकडे पाहू लागला. 'माणूस'ची विक्री पंधरा ते पंचवीस हजारांच्या दरम्यानच होती. तथापि, त्याला बघता बघता, त्या वेळच्या महाराष्ट्राच्या पाच-सात कोटी लोकसंख्येच्या संवेदनाशील व वैचारिक प्रतिनिधीत्वाचे महात्म्य लाभले. पददलित, गरीब, स्त्रिया यांच्यासाठी काम करणाऱ्यांना त्यांची ती हक्काची जागा वाटे. तेथे उच्च प्रस्थापितांची मानभावी करुणा नव्हती तर समाजाच्या प्रश्नांना क्षेत्री भिडणे होते. त्यामुळे तरुणांचा राबता तिकडे होता. 'माणूस'चे संपादक श्री.ग. माजगावकर हे हिंदुत्वाच्या परंपरेत वाढलेले परंतु त्यांनी समतादी आधुनिक मूल्ये मन:पूर्वक स्वीकारार्ह मानली; क्युबापासून चीनपर्यंतच्या परदेशांतील क्रांतिप्रयत्नांचा आस्थेने मागोवा ठेवला. येथील अन्यायाविरुद्धच्या तळच्या वर्गातील लढ्यांचे चित्रण केले आणि 'माणूस' हे सुशिक्षित, संवेदनाशील विचारी मराठी मनाचे प्रतिबिंब बनले.

'मटा' हे वर्तमानपत्र 'माणूस' व 'मौज' या दोन टोकांना हिंदोळत असे. फक्त अग्रलेखांचा आणि तळवलकरांच्या लेखनाचा विचार केला तर तो झोका 'मौजे'कडे जाई. 'मटा'चा संपादकीय वर्ग त्याच्या विविधरंगी भूमिकांतून झोका - 'माणूस'प्रमाणे वास्तव भूमिकेकडे खेचून आणे. हे मोठ्या जाणीवपूर्वक घडत होते असे नव्हे परंतु वैचारिक 'कॅलिडोस्कोप'चा 'मटा'त खेळ चाले असा तो मामला होता. 'मटा'मध्ये लेखारंभी निर्देश केला त्याप्रमाणे दोनच गट राहिले नव्हते. समाजच विविध मतप्रवाहांत विखुरला

गेला होता आणि त्या सर्व छटा 'मटा'च्या संपादकीय वर्गात व्यक्त होत होत्या. त्या वेळची टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'नुक्कड' हिच्या धर्तीवर आम्ही 'मटा'ला नुक्कड म्हणत असू. तळवलकर साडेपाचला घरी जात. तळवलकरांची केबिन बगळली तर बाहेर गोखले यांचे दिलखुलास राज्य असे. ते बोलण्या-लिहिण्याचे खूप स्वातंत्र्य देत. सर्वांना सामावून घेत. आम्ही म्हणत असू, की त्यांनी ख्रिश्चन पाद्र्याचा ढिगळ झगा घातला आहे. मात्र सर्वांनी त्या झग्याच्या आत असायला हवे! गोखले यांच्यासमोर विविध मतप्रवाहांच्या घणाघाती चर्चा होत. एकच दाखला. गोखले सहसंपादक झाल्यावर त्यांनी पुण्यातील एका 'कोर्ट केस'वर 'धावते जग'मध्ये स्फुट लिहिले होते. खटला खुनाचा होता. गुन्हेगार फक्त चोवीस वर्षांचा होता. न्यायाधीशांनी त्याला जन्मठेपेची शिक्षा दिली होती. तो तरुण धीरोदात्तपणे म्हणाला होता, की मला फाशी द्यावे- मला जगण्याची इच्छा नाही! गोखले यांनी स्फुटात सूचित केले होते, की न्यायाधीशांनी त्या तरुणाला त्याच्या मागणीप्रमाणे फाशी द्यायला हवे होते कारण त्याचा गुन्हा गंभीर होता. त्या स्फुटावर दुसऱ्या दिवशी संपादकीय विभागात चर्चा झडली. गोखले त्यांच्या मतावर ठाम होते. त्यातून मंडळी पुरोगामी-प्रतिगामी ह्या त्या काळातील प्रचलित संज्ञांवर घसरली आणि मग गोखले यांना निर्वाणीचा टोला लगावला गेला, की न्यायाधीशांचा निर्णय योग्य आहे. त्या एवढ्या कोवळ्या गुन्हेगार मुलाला फाशी देणे हे रानटीपणाचे होईल. पुरोगामी-प्रतिगामी या संज्ञा जंगलराज संपले आणि मानवी संस्कृती निर्माण झाली, तेव्हा आल्या! तुमची फाशीची शिफारस ही रानटीपणात मोडते!

त्या काळी जगभर फाशीविरोधी वातावरण होते. श्रीराम लागू यांनीही तत्संबंधी 'मटा'त लिहिले होते व त्यावर पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला होता. मध्यमवर्गीय समाजातील संवेदनाशील, विचारी माणसांचे प्रतिबिंब 'मटा'च्या स्टाफमध्ये होते आणि सर्व खेळीमेळीने, एकत्र नांदत होते. चीन-पाकिस्तान बरोबरची युद्धे, कऱ्हाड-लातूर येथील भूकंप, पुरासारख्या आपत्ती, बहात्तरचा व त्यानंतर आलेले दुष्काळ, पुणे जिल्ह्यात झालेला विमान अपघात अशा प्रत्येक वेळी सारे एकदिलाने, जिव्हाळ्याने कामास लागत. एरवी, राजकीय-सामाजिक विषयांवरील धुसफुस, वाद-प्रतिवाद जोरदारपणे चाले. समाजातील कोणीही माणूस खुलेआम 'मटा'च्या कचेरीत येऊन प्रेमाने बसत होता. खरोखरीच, त्यांच्यापैकी काही हक्काने लेखनासाठी म्हणून न्यूजप्रिंटच्या कागदांचे पॅडदेखील घेऊन जात!

तळवलकर त्या भानगडींमध्ये नसत. ते आणि त्यांचे लेखन एवढाच त्यांचा बाणा होता. आणीबाणीनंतर जनता राज आले आणि मग मीडियाला मोकळे रान झाले. तळवलकरांना त्यांच्या 'अधिकारपदा'ची जाणीव त्या काळात केव्हातरी झाली. ते हुकमतीने लिहू लागले. तळवलकरांचे त्यांच्या मृत्यूनंतर दैवतीकरण होताना पाहिले, की त्यांची एक वेगळीच इमेज माझ्या मनात तयार होते. त्यांच्या एका हातात तलवार आहे व दुसऱ्या हातात ज्ञानदीप. पण मग त्यांच्या बाकी दोन भुजा 'मटा'च्या स्टाफमध्ये दिसू लागतात.

मराठीत संपादक दोन प्रकारचे राहत आले आहेत. एक लिहिणारे संपादक, दुसरे संयोजक संपादक. वाचकांना लिहिणारे संपादक जास्त आवडतात. तळवलकर फक्त लिहीत राहिले. त्यांनी वर्तमानपत्र घडवण्याचा विचार कधी केला नाही. श्री.पु. भागवतांनी लिहिले जवळ जवळ नाही - मोजकी भाषणे दिली, पण मराठीत साहित्यसंस्कृतीची भूमिका दृढमूल केली. श्री.पु. भागवत यांनी त्यांचा प्रस्थापितांचा भोज्जा सांभाळला. तळवलकर त्या भोज्ज्याच्या जवळ असत. त्याला त्यांनी पाश्चिमात्त्य उदाहरणे घेऊन आधुनिक व्यासंगी जोड दिली, परंतु ते त्या व्यासंगाचे नाते येथील समाजाशी जोडू शकले नाहीत. तळवलकरांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या नादाने कधी वेडीवाकडी वळणे घेतली, काही वैचारिक साहसे केली. ते रमले मात्र १९५० पूर्वीच्या गोठलेल्या विचारविश्वात! मराठी मध्यमवर्गीय वाचकाचे दुर्दैव असे, की तोही त्यांच्याबरोबर त्याच भोवऱ्यात गरगरत राहिला. माजगावकर प्रमुखतः संयोजक होते, त्यामुळे मराठी समाजात जी वैचारिक वादळे येत होती ती माजगावकरांनी अचूक टिपली; ते त्यांच्या परीने त्यांना वळणे देत राहिले. ते कधी चळवळीतही उतरले. त्या ओघात त्यांनी टिपणे स्वरूपात लेखन केले आहे, त्यात त्यांची स्वतःची दिशा आहे. त्यांच्याकडे समाजपरिवर्तनाचा कार्यक्रम होता. 'माणूस' श्रीगमा यांच्या मृत्यूआधीच १९८० च्या दशकात बंद पडले. त्यांची आठवण काढणारे पत्रकार अजून आहेत. 'माणूस'चा वसा चालू राहावा असे मानणारा वर्ग आहे. 'मौज' आणि 'मटा' यांनी मात्र केव्हाच कात टाकली आहे!

तळवलकर आणि त्यांचा चाहता मराठी मध्यमवर्ग यांनी गेल्या पंचवीस वर्षांतील कम्युनिकेशन क्रांतीचा लाभ घेतला, मात्र त्यांनी तिचा भविष्यवेध जाणला नाही. त्यांनी भविष्यकाळ भूतकाळातूनच घडणार आहे या जुन्या (कदाचित कालबाह्यही) विचारसूत्राचाच सतत आधार घेतला. त्यामुळे ते नेहरू-रानडे-गोखले यांचा इतिहास तपासत राहिले. काय योगायोग पाहा - त्यांचा शेवटचा जो लेख 'साधने'त प्रसिद्ध झाला तो गडकऱ्यांच्या 'राजसंन्यास'वर आहे. ते पुण्यातील पुतळ्याच्या वादंगाबद्दल काही बोलत नाहीत. 'राजसंन्यास'चे लेखन आणि अत्रे-पुल यांचे संदर्भ यासंबंधीच रसिकतेने लिहितात. मराठी मध्यमवर्ग अशाच आठवणीवजा लेखनात अधिक रमतो ना!

(लेखातील उल्लेख माझ्या आठवणीतून केले आहेत. त्यांची सत्यासत्यता तपासून पाहता आलेली नाही. अर्थात असे उल्लेख अन्यायकारक असणार नाहीत असे सहसा पाहिले आहे.)

**- दिनकर गांगल**
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com



# पत्रकारांचा बाप!

प्रवीण बर्दापूरकर

कोणत्याही निकषावर मी काही गोविंदराव तळवलकर स्कूलचा विद्यार्थी नाही. त्यांच्या निकट वा दूरच्या गोटातीलही नाही. लहानपणी घरी रविवारी मराठा आणि लोकसत्ता येत असत पण, ते काही वाचायचं वय नव्हतं. वाचनाचा संस्कार झालेला तो आईकडून. वीरकरांची डिक्शनरी, रेन अँड मार्टिनचं व्याकरण कायम हाताशी असायचं. दररोज मराठी इंग्रजी शुद्धलेखन केल्याशिवाय नाश्ता मिळत नसे. वृत्तपत्र वाचनाचा पहिला संस्कार झाला तो मराठवाडा दैनिकाचा; म्हणजे अनंतराव भालेराव यांचा. तेव्हा, आपण कधी पत्रकार होऊ अशी इच्छा बाळगलेली नव्हती. पुढे वाचन वाढत गेलं. महाराष्ट्र टाइम्सच्या भाषेचा मोह पडला. नंतर पत्रकारितेत आलो माधव गडकरी यांची ओळख झाली. तेव्हा मुंबईत माधव गडकरी, गोविंदराव तळवलकर यांचा बोलबाला होता तरी आमच्यावर अनंतराव भालेराव यांची छाया गडद होती. पत्रकारितेत रुळत गेलो तसा, गोविंदराव तळवलकर, माधव गडकरी, मा. गो. वैद्य, निशिकांत जोशी, मामासाहेब घुमरे, रंगा वैद्य आणि कुमार केतकर यांचा प्रभाव वाढत गेला. तरी लोकसत्ता किंवा महाराष्ट्र टाइम्समध्ये पत्रकारितेची संधी मिळेल असं वाटलं नव्हतं; कारण पार्श्वभूमी! इंग्रजीची बोंब असलेलं आणि जिल्हा परिषदेच्या शाळांतून झालेलं शिक्षण; खास मराठवाडी हेलाचं मराठी. त्यातच गोविंद तळवलकर नावाभोवती भलं मोठ्ठं वलय आणि त्यांचं वाचन, विद्वत्ता, करडी शिस्त, खडूसपणा वगैरेविषयी प्रचलित असलेल्या अनेक दंतकथा मन दडपून टाकणाऱ्या होत्या.


याच दरम्यान चिपळूणहून नागपूरला नागपूर पत्रिकेत शिफ्ट झालो. माधव गडकरी यांच्यामुळे राजकीय वृत्तसंकलनाच्या क्षेत्रात आलो. माधव गडकरी स्कूलमध्ये प्रवेश मिळाला. महाराष्ट्रभर संचार सुरु झाला आणि हळूहळू लक्षात येत गेला तो गोविंदराव तळवलकर यांचा दबदबा. साहित्य-राजकारण-समाजकारण-प्रशासनात, 'गोविंदराव काय म्हणाले?' अशी उत्सुकता किंवा 'गोविंदराव काय म्हणतील?' असा बचक जाणवायचाच. नागपूर, मुंबईत वावरत असतांना एकेका पत्रकाराच्या स्व'कौतुक' धन्यकथा ऐकत असताना जाणवलं की, महाराष्ट्राच्या राजकारण आणि समाजकारणाची दिशा ठरवणारा पत्रकारितेतला गोविंदराव तळवलकर हा 'बाप' माणूस आहे पण, त्या बापपणाचं तोरण न लावता हा माणूस आत्ममग्न वावरत असतो. हे बापपण किती उंचीचं तर, संपादक कसा असावा आणि पत्रकारिता कशी करावी याचे मापदंड गोविंदराव यांच्यापासून सुरू होत आणि ते संपादक असलेल्या 'महाराष्ट्र टाइम्स'पाशी ते संपत. त्यांचा व्यासंग मूलभूत आणि व्यापक असायचा. त्यांची दृष्टी चौकस, नितळ आणि भाषा त्यांच्यासमोर हात जोडून उभी...त्यामुळे त्यांचं लेखन धारदार असे पण; त्यात विखार नसे. संपादक म्हणून उदारमतवादी असल्यानं आपल्याला जे माहिती नाही ते अन्य कोणालाच माहिती नाही किंवा टोकाला जात ते तसं काही अस्तित्वातच नाही, अशी आजकालची वैपुल्यानं फोफावलेली तुच्छता म्हणा की कर्कश वृत्ती तळवलकरांत नव्हती. म्हणूनच आमच्या पिढीवरचा त्यांचा हा प्रभाव कायम राहणार आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे आम्हाला ज्यांचा अभिमान वाटायचा ते अनंतराव भालेराव हा तळवळकर यांचा वुईक पॉईंट आहे, हा अदृश्य समान धागाही होताच. अनंतरावांचे अग्रलेख गोविंदराव अनेकदा पुनर्मुद्रित करत; मनाचा असा संपादकीय मोकळेपणा दुर्मीळच.

याच काळात आणखी एक घटना घडली आणि गोविंदराव तळवलकर यांना भेटण्याची संधी मिळाली. तेव्हा मी नागपूर पत्रिकेचा मुख्य वार्ताहर होतो. एक प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला. मी तडकाफडकी राजीनामा दिला (वर्ष १९८४) तेव्हा लेक नुकतीच जन्माला आलेली होती; आणखी काही अडचणी समोर आऽऽ वासून उभ्या होत्या. मी चांगलाच अडचणीत सापडलेलो होतो. हे कळवल्यावर प्रख्यात साहित्यिक जयवंत दळवी आणि संपादक मुकुंदराव किर्लोस्कर यांनी मला नोकरी मिळावी यासाठी मुंबई-पुण्यात प्रयत्न सुरू केले. दळवी यांच्या प्रयत्नांना यश आलं आणि 'महाराष्ट्र टाइम्समध्ये रुजू व्हा', असा गोविंदराव तळवलकर यांचा टेलिग्राम आला. नेमक्या त्याचवेळी पुण्याच्या 'सकाळ'कडून नागपूरचा अर्धवेळ वार्ताहर म्हणून नियुक्त केल्याचं पत्र आलं आणि माधव गडकरी यांनी कळवलं की मुंबई 'लोकसत्ता'चा वार्ताहर म्हणून मी काम सुरू करावं; त्या मोबदल्यात मला ५०० रुपये दरमहा मिळणार होते. तत्पूर्वी 'मुंबई सकाळ'मध्ये असताना माधव

गडकरी यांनी माझी दरमहा ५०० रुपये मानधनावर वार्ताहर म्हणून नियुक्ती केलेली होती. 'तरुण भारत' या दैनिकातल्या सदराचे तीनेकशे रुपये मिळू लागलेले होते. पूर्ण वेळ श्रमिक पत्रकाराला वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे मिळणाऱ्या वेतनापेक्षा ही एकूण रक्कम किती तरी जास्त होती; अर्थात यापेक्षा मुंबईत 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये अधिक पगार मिळाला असता पण, नागपूर लगेच सोडणं शक्य नव्हतं. ''महाराष्ट्र टाइम्सला रुजू होऊ शकत नाही, हे तुम्हीच गोविंदरावांना सांगा'', असं जयवंत दळवी यांना सांगितलं आणि मला प्रचंड टेन्शन आलं.

रीतसर वेळ ठरवून मुंबईत तळवलकर यांना भेटलो. ही भेट फार तर आठ-नऊ मिनिटांची झाली असेल. माझा नकार त्यांना एव्हाना कळलेला आणि मुळीच रुचलेला नव्हता; हे जयवंत दळवी यांनी सांगितलेलं होतं. तळवलकर यांच्याकडून मिळालेल्या ट्रीटमेंटमधून ते लक्षात आलं. माझं म्हणणं त्यांनी नीट ऐकून घेतलं पण, उभं ठेवून आणि फक्त 'हं' असा एकाक्षरी प्रतिसाद देत! मी 'सॉरी' म्हणून उभा राहिलो तर त्यांनी 'भेटत चला अधूनमधून', असं म्हणत कटवलं. हा 'अधूनमधून' फारच रुक्ष आणि तीव्र नापसंतीचा होता; मात्र, त्याचे कोणतेही पडसाद नंतर उमटले नाहीत. तेव्हा महाराष्ट्र टाइम्समध्ये राज्याच्या अन्य भागात प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रातील सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असणाऱ्या उल्लेखनीय बातम्या आणि मजकुराची दाखल घेणारा एक स्तंभ होता. त्यात माझ्या बातम्या/लेखनाची दखल अनेकदा घेतली गेली. हे श्रेय तो स्तंभ लिहिणाऱ्याचं होतं तरी एकदा नाव आल्याबर ते नंतर टाळण्याची (आता अनेक संपादकांकडून दिली जाते तशी आणि बारंवार अनुभवायास मिळणारी) सूचना तळवलकर देऊ शकले असते पण संपादक म्हणून किरट्या विचाराचे आणि खुज्या उंचीचे ते नव्हते. दोन वेळा तर अग्रलेखातही बातम्यांचा उल्लेख आला. ते अग्रलेख खुद्द गोविंदराव तळवलकर यांनीच लिहिलेले आहेत असं सांगण्यात आलं तेव्हा; मी एकाचवेळी विस्मयचकित आणि त्यांच्यावर फिदाही झालो. असा उमदेपणा माधव गडकरी वगळता अन्य कोणत्या संपादकाकडून तोवर वाट्याला आलेला नव्हता.

नासिकराव तिरपुडे यांच्याशी गोविंदराव यांचा विशेष स्नेह होता. ते नागपूरला त्या काळात दोन-तीन वेळा आले पण नासिकराव तिरपुडे वगळता कोणालाच भेटले नाहीत. गोविंदराव आल्याचं एकदा कळल्यावर फोन केला आणि भेटायला येऊ का, असं विचारल्यावर ते चक्क 'नाही' म्हणाले. वयाची पंचाहत्तरी गाठली तेव्हा नासिकराव तिरपुडे यांनी काही पुरस्कार सुरु केले. पत्रकारितेसाठीचा पहिला पुरस्कार मला मिळाला. तो गोविंदराव यांच्या हस्ते प्रदान होणार असल्याचं नासिकराव तिरपुडे यांनी सांगितल्यावर साहजिकच आनंद झाला. प्रत्यक्षात मात्र त्या कार्यक्रमाला मी हजर राहू शकलो नाही; नेमक्या त्याच काळात मराठवाडा विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावानं केलेल्या नामविस्ताराची अंमलबजावणी करण्याचा



निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घेतला. त्यामुळे मराठवाड्यात हिंसक प्रतिक्रिया उमटली. त्याचं वृत्तसंकलन करण्यासाठी मराठवाड्यात जावं लागलं. मग, माझ्या कन्येनं तो पुरस्कार स्वीकारला. नागपूरला परतल्यावर गोविंदरावांना फोन करून दिलगिरी व्यक्त करताना गैरहजेरीचं कारण सांगितलं तर, त्याकडे साफ दुर्लक्ष करून ते म्हणाले, ''तुमची लेक गोड आहे, बरं का!'' आणि त्यांनी फोन बंद केला.

मग हळूहळू आमच्या भेटी होऊ लागल्या. महत्त्वाचं म्हणजे फारच अधूनमधूनच. धनंजय गोडबोले महाराष्ट्र टाइम्सचा प्रतिनिधी म्हणून नागपूरला आल्यावर यातलं 'फारच' अंतर जरासं गळून पडलं. मग सोनेरी चष्म्याआडचे त्यांचे डोळे जरब न वाटता कुतूहलाने ओथंबलेले वाटू लागले; तरी गोविंदराव तळवलकर यांच्या 'बाप'पणाचा धाक कायम मनावर असे. बहुतेकदा ते एकटेच बोलत असत आणि आम्ही अत्यंत भक्तिभावानं ते श्रवण करत असू. त्यांचा मूड चांगला आहे असं वाटलं तर, त्यांच्याबाबत ऐकलेल्या काही दंतकथाविषयी नेमकं काय आहे ते आम्ही विचारत असू. त्यावर तळवलकर मग बोलत असत, पण त्यांचा सूर कधीच 'कर्ता-करविता'चा नसे. गोविंदराव काही बैठकीतले नव्हते. खूप लोक असले तर ते फार खुलतही नसत. खरं तर अशा ठिकाणी ते जाणंच टाळत. नाईलाज म्हणून गेलेच अशा वेळी तर, ते मोजकं पण नेमकं बोलत आणि आटोपतं घेत. मात्र धनंजय गोडबोलेमुळे खुललेले गोविंदराव अनुभवायला मिळाले. गप्पांत अनेकदा समोरचा काय बोलतो हे ते लक्षपूर्वक श्रवण करत पण, त्यावर लगेच मतप्रदर्शन करत नसत.

कोणत्याशा कार्यक्रमासाठी एकदा गोविंदराव नागपूरला आले. धनंजय आणि मी त्यांना घेण्यासाठी विमानतळावर गेलो. कार्यक्रमाचे आयोजक बडे राजकारणी होते. त्यांची आलिशान वातानुकुलित कार गोविंदरावांच्या सेवेला होती. तेव्हा मी नुकतीच मारुती व्हॅन घेतलेली होती. त्यांच्या कारकडे जात असताना हा विषय निघाला आणि गोविंदराव लगेच व्हॅन पाहायला वळले. नुसतेच आले नाही तर माझ्याच व्हॅनमध्ये बसून पुढचे दोन दिवस ते फिरले. आयोजकांना त्यांना संस्थेत नेऊन बरंच मिरवायचं आहे हे लक्षात आल्यावर ''मला यांच्यासोबत जरा बाहेर जायचं आहे.

आधीच ठरलेलं आहे ते'', असं म्हणून गोविंदरावांनी आम्हाला इशारा केला. कारमध्ये बसल्यावर पुढे काय असा प्रश्न निर्माण झाला आणि अखेर 'नागपूर दर्शना'ची सैर ठरली. मग गोविंदराव पुढच्या सीटवर, शेजारी मी, चालक आणि मागे धनंजय गोडबोले; असे आम्ही तिघं चार-साडेचार तास भंडारा नाका ते वानाडोंगरी आणि वाडी ते कामठी असं भटकलो. सदरमधलं अशोका हॉटेल बंद होईपर्यंत गप्पा मारत बसलो. नवीन संदर्भ आणि अनोळखी माहितीचे लक्ष-लक्ष दिवे गोविंदराव तळवलकर यांनी उजळवले आहेत, असा तो कायम स्मरणीय अनुभव होता. ''लेखक म्हणून तुम्हाला बायस राहता येईल, संपादक म्हणून नाही, संपादक म्हणून तुम्हाला भूमिका घ्यावीच लागेल बायस नाही राहता येणार. हे लक्षात ठेवा बर्दापूरकर..'' असं बरंच काही ते त्यावेळी म्हणाले. तेव्हा मी मुख्य वार्ताहर होतो आणि संपादक होण्याची कल्पनाही मनाला स्पर्श करूनही गेलेली नव्हती. मी ते बोलून दाखवलं तर गोविंदराव म्हणाले, ''व्हाल हो एक दिवस संपादक तुम्हीही, त्यात काय!'' ते सगळं स्वप्नवतच वाटतंय अजूनही. लोकसत्ताच्या विदर्भ आवृत्तीचा संपादक म्हणून सूत्र स्वीकारली तेव्हा गोविंदरावांची ती भविष्यवाणी आठवली. त्यांना ती आठवण करून देत मेल पाठवला तर त्यांचं उत्तर आलं, ''ओके. ऑल द बेस्ट''. नंतर आमच्या दोन-तीनच भेटी झाल्या; त्याही ओझरत्या. क्वचितच फोनवर बोलणं होत असे.

ते सतत लिहिते राहिले. त्यांच्या लेखनातला गतकातर आठवणींच्या प्रदेशात रमणारा उबदार आशावाद खूपच भावत असे. नंतर त्यांचा मुक्काम अमेरिकेत हलल्यावर सहा/आठ महिन्यातून एखादा मेल असा संपर्क राहिला. काहीही कारण नसताना वर्षातून एखादवेळा मी त्यांना माझ्याविषयी अपडेट कळवत असे. बहुसंख्य मेलला त्यांचं, रिसीव्हड, थँक्स, ओके... असं कोरडं उत्तर येत असे.

'लोकसत्ता'त 'चार्ल्स डिकन्स कांड' घडलं तेव्हा माझ्यासाठी लोकसत्ता हे 'छोड आये हम वो गलियां' होऊन बरेच महिने उलटले होते. पुण्यात असतानाच गोविंदराव यांचा लेख साधना साप्ताहिकात मी वाचलेला होता. नागपुरात परतल्यावर लोकसत्तातील मजकूर वाचनात आला आणि आश्चर्य वाटलं. त्याबद्दल पाठवलेल्या मेलला गोविंदरावांनी सविस्तर उत्तर पाठवलं. कार्यकारी संपादकांना त्यांनी लिहिलेलं (खरं तर, झापलेलं!) पत्रही पाठवलं. तो एकूणच सगळा उबग आणणारा आणि नॉनजर्नालिस्टीक प्रकार होता. तो पत्रव्यवहार जाहीर करू का, असं मी विचारलं तर गोविंदरावांचं उत्तर आलं 'नो'. नंतर काही दिवसांनी त्यांनी एका मेलला उत्तर देताना तो संदर्भ देत लिहिलं, ''झालं तेवढं पुरे. पत्रकारितेची आपणच बदनामी कशाला करायची?''

अशा बापाच्या छायेत अत्यंत अल्प का होईना वावरता आलं, याचं समाधान घनगर्द आहे. अशी माणसं मराठी पत्रकारितेत आता तर भरदिवसा विजेरी घेऊन शोधली तरी सापडणं कठीण आहे !

गोविंदराव तळवलकर यांच्या निधनाची बातमी कळल्यावर धनंजय गोडबोले म्हणाला, ''आमचा बाप गेला. आम्ही पोरके झालो...'' त्याच्या भावनांशी मी पूर्ण सहमत आहे.


**– प्रवीण बर्दापूरकर**


भ्रमणध्वनी : ९८२२०५५७९९

praveen.bardapurkargmail.com

www.praveenbardapurkar.com



ग्रंथाली



**कुसवा**

**उषा परब**

**मूल्य २५० रुपये**

**सवलतीत १५० रुपये**


कुसवा कुस! बाईच्या बाईपणास आईपणाची कृतार्थता देणारी प्राकृतिक देणगी. पण तो अनुभव साक्षात होण्यापूर्वी आणि नंतरही तिच्या दैहिक भोगांची अनेक बिरूपे ही कादंबरी धक्कादायकपणे मांडते. एका कुटुंबकथेपासून सुरू झालेली ही कादंबरी कोकणच्या बदलत्या उद्ध्वस्तीकरणाच्या वास्तवाचे चित्रण या कथेला व्यापक परिमाण देते आहे.

**विमुक्ता**

साहित्य अकादमी पुरस्कार २०१५

तेलगू लेखिका **वोल्गा**

**अनुवाद : वंदना करंबेळकर**



**मूल्य १०० रुपये**

**सवलतीत ६० रुपये**

भारतीय संस्कृतीवर रामायण, महाभारताचा महत्त्वपूर्ण प्रभाव आहे. यातील पात्रांना आपण देवत्व बहाल करून त्यांना पूजनीय ठरवलं आहे. पण त्यांना अनुकरणीय करता येईल का? तसं करायचं असेल तर त्यांचा माणूस म्हणून विचार करावा लागेल. त्यांच्या मर्यादा आणि क्षमता यांचा अतिशय समजूतदारपणे आणि शहाणपणाने जाणीवपूर्वक विचारा करावा लागेल. हा विचार वोल्गाजींनी या सर्व पात्रांबाबत केलेला जाणवतो.

# एका पर्वाचा अस्त



अमरेन्द्र धनेश्वर

"Music washes away from the soul, the dust of everyday life" असे एका विचारवंताने म्हटले आहे. सामान्य माणसाचे दैनंदिन जीवन हे अत्यंत कष्टाचे आणि जिकिरीचे होत चालले आहे. ताणतणाव, मानसिक घालमेल, भविष्याची आणि वर्तमानाचीही चिंता आणि मनात सतत उठणारे शंकाकुशंकांचे काहूर यापासून दिलासा मिळविण्यासाठी माणूस सतत काही ना काही शोधत असतो. जीवनाच्या वैराण वाळवंटात कुठेतरी विसाव्याचे क्षण लाभावेत आणि तो थांबा घेतला की पुढील मार्गक्रमण करणे सोपे जावे अथवा सुलभ वाटावे असा त्याचा प्रयत्न असतो. या प्रयत्नात त्याला संगीताची साथ फार महत्त्वाची असते आणि किशोरी आमोणकरांचे गायन अशा प्रकारचे होते. रागदारी संगीताच्या क्षेत्रातील सर्वाधिक लोकप्रिय आणि सर्वात मातब्बर समजल्या जाणाऱ्या गायिका म्हणून त्यांनी सुमारे ४०-४५ वर्षे सामान्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. त्यांच्या यशाचे अथवा लोकप्रियतेचे रहस्य कशात आहे? या प्रश्नाचा विचार केला तर वर उद्‌धृत केलेल्या अवतरणात त्याचे उत्तर सापडते.

आपल्या चिंता, आपले दु:ख, आपल्या आयुष्यातल्या समस्या निदान काही काळापुरत्या तरी विसरायला लावणारे संगीत किशोरी आमोणकरांच्या कंठातून सामान्यांना ऐकायला मिळाले. त्यांच्या गायनातला सामान्य श्रोत्याला भावणारा विशेष तो कोणता? एक गायक कलाकार म्हणून मी स्वत: त्यांच्या गायनाचा विचार करतो तेव्हा असे लक्षात येते की तीव्र उत्कटता अथवा इंटेंसिटी हा त्यांच्या आवाजाच्या लगावाचा आणि गाण्याच्या एकूण सादरीकरणाचा विशेष गुण आहे आणि दुसरा अतिशय भावणारा गुण म्हणजे त्यांच्या तानक्रियेमधली अतीव सहजता 'तान' म्हणजे काय? याची सोपी व्याख्या कुमार गंधर्वांनी एकदा केली होती. ते म्हणायचे की एखादी चट्‌कन सुचलेली कल्पना तितक्याच वेगाने सांगावीशी वाटली की तान तयार होते आणि मनात तान तयार झाली की ती गळ्यातून बाहेर यायला वेळ लागत नाही. अर्थात गायकाचा गळा तयार असायला हवा. किशोरी आमोणकरांचा गळा अत्यंत तयार होता आणि तो तसा बनला कारण त्यामागे वर्षानुवर्षांची साधना आणि परिश्रम होते. त्यांच्या विलंबित ख्यालात तानक्रियेचा टप्पा आला की मैफलीत विलक्षण चैतन्य निर्माण होत असे आणि आपल्या हृदयावरून कुणी हळुवारपणे मोरपीस फिरवावे असा भास त्यांच्या जलद आणि अतिजलद ताना ऐकताना होत असे. ही कलावती अतिशय अलगदपणे तानांच्या लडीवर लडी सोडून आपल्या हृदयाला हलकेच गुदगुल्या करीत आपल्या चित्तवृत्ती उल्हासित करीत आहे असा भास सामान्य श्रोत्याला होत असे आणि हे किशोरी आमोणकरांच्या यशाचे खरे गमक होते.

तान हा एक अलंकरणाचा भाग आहे. तान गळ्यातून उमटण्यासाठी गळ्यात खटका निर्माण करावा लागतो. खटक्यातून एकेक स्वर अलग आणि वेगळा दाखवता येतो आणि दमश्वासातून असे अनेक अलग स्वर एकत्र गुंफता येतात आणि त्यातून तानेची लडी निर्माण होते. बहुतेक गायक कलाकारांना हा खटका निर्माण करण्यासाठी जी मेहनत करावी लागते, त्यातून खटक्याचा कठोरपणा टाळता येत नाही. किशोरी आमोणकरांचा विशेष गुण असा की त्यांना हा कठोरपणा आणि धारदारपणा टाळता आला आणि त्या खटक्याचे कोनबिंदू मुलायम आणि रेशमी बनवता आले. त्यांच्या आवाजाची जात ही त्यांच्या नावाला साजेशी होती. बोलण्याचा आवाज आणि गाण्याचा आवाज एकच असणारे आणि

तसा राखू शकणारे कलाकार फार विरळा! किशोरी आमोणकर अशा कलाकार होत्या. वयाच्या ८५ व्या वर्षीही त्यांचा आवाज एखाद्या षोडशवर्षीय युवतीला शोभेल असा होता. तेही त्यांच्या यशाचे एक कारण होते. गाणाऱ्या कलाकारांचा आवाज वयाबरोबर अधिकाधिक 'पिकू' लागतो किंवा परिपक्व होत जातो. याचा अर्थ किशोरी आमोणकरांचा आवाज अपरिपक्व होता असे नव्हे पण तो सदैव तरुण आणि ताजातवाना राहिला आणि वाटला हे महत्त्वाचे. किशोरी नामक रसायन असे बनले होते.

किशोरी आमोणकरांच्या गाण्याच्या जतन करण्यासारख्या आठवणी आणि क्षण अनेक आहेत. एनसीपीएच्या टाटा सभागृहात पावसाळ्यात त्यांची सकाळची मैफल होती. त्यांनी 'सूरदासी मल्हार' हा राग असा काही तयारीने आणि तडफेने गायला की अंगावर आठवणीनेही रोमांच उठतात. 'बादरवा बरसन को आये' ही चीज त्यांनी पेश केली आणि मुखड्याला केंद्रस्थानी ठेवून अवरोही तानांची अक्षरशः बरसात केली. त्यानंतर त्यांनी 'भैरवी' सुरू केली होती पण 'सूरमल्हार'चा असा प्रभाव पडला की त्यातून बाहेर पडावे असे वाटतच नव्हते म्हणून मी उठलो आणि टाटा सभागृहाबाहेर आलो. बाहेर रिमझिम पाऊस पडत होता आणि सुसाट वारा सुटला होता. नरिमन पॉईंटचा समुद्र अक्षरशः खवळला होता आणि एकामागोमाग एक लाटा विलक्षण आवेगाने खडकावर फुटत होत्या. निसर्ग आणि मानवनिर्मित कला अशा तऱ्हेने एकजीव झालेल्या पाहायला मिळणे हाही एक अजब अनुभव होता.

एकदा दादर-माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये त्यांची सकाळची बैठक ठरत होती. बाकी व्यवहारासंबंधी बोलणी झाली होती. वेळ मात्र ठरली नव्हती. मी त्यांच्या घरी उपस्थित असताना ''सकाळी सात वाजता का गाणं सुरू करत नाही?'' असे सुचवून पाहिले. त्यांना ती कल्पना एकदम पसंत पडली. त्या काळात 'प्रात:स्वर' किंवा 'उदयस्वर' मैफिलींचे पेव फुटले नव्हते. सकाळी साडेसहा वाजता सभागृह गच्च भरून गेले होते. सभागृहात दिवे लावायचे नाहीत असा हुकूम अगोदरच सुटल्यामुळे तसा अंधारच होता सभागृहात आणि मंचावरही. किशोरी आमोणकर स्थानापन्न झाल्या आणि त्यांच्या देहयष्टीचे अंधुक दर्शन दुरून होत होते. त्यांनी 'बिभास' रागाचे आलाप सुरू केले. जसजसा सूर्य वर येत गेला तसतसा नैसर्गिक प्रकाशाने रंगमंच उजळत गेला. त्यांच्या आवाजात विलक्षण तेज आणि प्रखरता जाणवत होती आणि क्रमाक्रमाने त्यांची तल्लीन झालेली मूर्ती स्पष्टपणे दिसू लागली. 'कागज के फूल' या चित्रपटात गुरुदत्तने चित्रित केलेल्या 'वक्तने किया क्या हंसी सितम' या गाण्याच्या वेळच्या दृश्याची आठवण मला झाली. वहिदा रेहमानची आकृती अगोदर दृग्गोचर होते आणि हळूहळू जसजसा एकेक अंतरा उगलडत जातो तसतसा तिचा विलक्षण बोलका आणि भावभावनांचा उद्रेक लपवू पाहणारा चेहरा दिसू लागतो तसे हे दृश्य होते. किशोरी आमोणकरांचा हा 'बिभास' म्हणजे एक अविस्मरणीय दृक्श्राव्य अनुभव होता यात शंका नाही.

किशोरी आमोणकरांचे प्रामुख्याने जयपूर अत्रौली घराण्यात शिक्षण झाले होते. आपली आई मोगुबाई कुर्डीकर यांच्याकडून त्या शिकल्या. याशिवाय त्याच घराण्याचे मोहनराव पालेकर यांच्याकडेही त्यांचे शिक्षण झाले. आग्रा घराण्याचे गायक अन्वर हुसेन खान हेही त्यांचे एक गुरू होते. भेंडीबाजार घराण्याच्या अंजनीबाई मालपेकरांकडेही त्या शिकल्या होत्या. अल्पकाळ ग्वाल्हेर घराण्याचे श्रेष्ठ गायक शरद्चन्द्र आरोलकर यांच्याकडेही त्या शिकल्या असे त्यांनी नमूद करून ठेवले आहे. त्यांच्या गायकीचा मुख्य बाज हा जयपूर अत्रौलीचाच होता यात वाद नाही.

अल्लादियाखाँ खाँसाहेबांची ख्याल गायकी ही मुख्यत: आकाराच्या माध्यमातून मांडली जाते. 'आ'कार अधिकाधिक रुंद करून रागाचे आलाप मांडणे आणि मग विशिष्ट गतीने आणि क्रमाने तानक्रिया अलंकारांची गुंफण करीत सादर करणे हा गायकीचा उसूल. आलाप हा लयीला न सोडता, मात्रेला धरून किंवा मात्रेच्या अंगाने आणि खटक्याची रेषा स्पष्ट न करीत गायला जातो. किशोरी आमोणकरांनी हे सर्व आत्मसात केले होते हे निश्चित परंतु गायकीचे हे जखडबंद स्वरूप त्यांना जाचक वाटू लागले. जयपूर/ अत्रौली घराण्याचे रागही फार ठरावीक असत. सिद्ध राग किंवा आम रागांपेक्षा अप्रचलित आणि जोड रागांकडे या घराण्याच्या कलाकारांचा कल असतो. किशोरी आमोणकरांना हे सर्व आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला बाधक अथवा मारक आहे असे वाटू लागले. त्यांचेच गुरुबंधू आणि ज्येष्ठ संगीतशास्त्रज्ञ वामनराव देशपांडे यांनी म्हटले आहे की जयपूर घराण्याच्या गायकीत किराणाशैलीच्या आलापांचे बेमालूम मिश्रण करून किशोरी आमोणकरांनी आपली शैली निर्माण केली. जयपूर अत्रौलीची गायकी ही तंत्रप्रधान असल्याची आणि भावात्मकतेला अग्रक्रम न देणारी होती अशी टीका केली जात असे. किशोरी आमोणकरांनी भावाभिव्यक्तीला प्राधान्य देण्याचे ठरविले आणि त्यांनी त्यासाठी आपले गायन, आपली ख्यालाची मांडणी अधिकाधिक स्वरानुगामी करण्याचा प्रयत्न केला आणि नेमका तो प्रयत्न रसिकांना भावला, पटला आणि म्हणून त्यांनी किशोरी आमोणकरांना डोक्यावर घेतले तर त्यात नवल नाही.

१९६०च्या दशकानंतर किशोरी आमोणकर गायिका म्हणून उदयाला आल्या. किशोरी आमोणकरांना अनेक तरुण गायिकांनी आपले दैवत, आपला आदर्श मानले. त्यांचे अनुकरण करीत आपली कारकीर्द घडविण्याचा अनेक गायिकांनी प्रयत्न केला. किशोरी आमोणकरांनी ठुमरी, गझल वगैरे गीतप्रकारांचा बारकाईने अभ्यास केला होता. त्यातील मुरक्या, हरकती, बेहलावे हे आपल्या ख्याल गायनात त्यांनी अलगदपणे समाविष्ट केले होते. त्यातून सामान्य श्रोत्याच्या हृदयाची तार निश्चितच छेडली जात असे परंतु ख्यालाचे गांभीर्य आणि भारदस्तपणा याच्याशी तडजोडही होत असे पण किशोरी आमोणकरांनी टीकेकडे दुर्लक्ष केले. त्यांच्या मनस्वीपणाचा आविष्कार त्यांच्या गाण्यातून प्रकट होत होता आणि त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व जनमानसात ठसत होते.

कधी कधी असे वाटत असे की किशोरी आमोणकर


नामक एका देहात दोन व्यक्ती किंवा दोन परस्परविरोधी प्रवृत्ती वास करीत आहेत. एकीकडे अध्यात्माची जपमाळ ओढणाऱ्या, गूढरम्य प्रदेशात विहार करीत असल्याचा आभास सातत्याने निर्माण करणाऱ्या किशोरी आमोणकर; दुसरीकडे पंचतारांकित सुखसोयींचा आणि लाखो रुपयांच्या बिदागीचा अट्टाहास बाळगणाऱ्या किशोरी आमोणकर. त्यांच्या स्वराला आईच्या ममत्वाचा स्पर्श असे कारण ही ममता हा त्यांच्या स्वभावाचा एक हवाहवासा पैलू होता. दुसरीकडे त्या आपल्या शिष्यांशी अत्यंत कठोरपणे आणि प्रसंगी निष्ठुरपणे वागत. अश्विनी भिडेंनी आपल्या आईशी (माणिक भिडे) किशोरी आमोणकर कशा वागल्या हे प्रांजळपणे लिहिलेच आहे. देवकी पंडितांनीही याविषयी संयम बाळगून पण सूचकपणे लिहिले आहे. आरती अंकलीकर, मीनल देशपांडे, के.एस. वैशाली, वीणा सहस्त्रबुद्धे, मालती कामत अशी किती नावे घ्यावीत? एवढ्या मोठ्या गुरूला हे शिष्य का बरे सोडून गेले? याची उत्तरे शोधायला हवीत. केशरबाईंच्या वागण्याचा आदर्श किशोरी आमोणकरांनी आपल्या डोळ्यांसमोर ठेवला असावा. ठमठमाट आसुसलेपणा आणि विस्फोटक ज्वलनशीलता हा केशरबाईंचा शिरस्ता होता!

अध्यात्माचा खरा उद्देश आपल्या अहंकाराचा विलय हा असला पाहिजे. किशोरी आमोणकरांच्या अहंकाराचा तडाखा बसलेले कित्येक जण असू शकतील. 'अंडरस्कोअर रेकॉर्ड्स या कंपनीने किशोरी आमोणकरांच्या ज्येष्ठ गुरूभगिनी कौसल्या मंजेश्वर यांच्या ध्वनिमुद्रणांची सीडी समारंभपूर्वक प्रकाशित केली. त्या समारंभात कौसल्या मंजेश्वर सतत भेदरलेल्या मुद्रेने वावरत होत्या. आपला हा समारंभ कुणीतरी पार पडू देणार नाही अशी त्यांना भीती होती परंतु एक गोष्ट मात्र खुल्या दिलाने मान्य करायला हवी. आपल्या घराण्याच्याच परंतु कडव्या प्रतिस्पर्धी म्हणून गणल्या गेलेल्या धोंडूताई कुलकर्णींसमोर काहीसे 'पडते' घेण्याची शालीनता आणि शान त्यांनी दाखविली. केशरबाई केरकरांच्या धोंडूताई या शिष्या आणि केशरबाईंच्या बाजूने मोगूबाई आणि त्यांच्या शिष्यांशी हाडवैर असल्यासारखी स्थिती! आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात किशोरी आमोणकर आणि धोंडूताई यांच्यात तह झाला आणि सलोख्याची नांदी झाली. ती एक स्वागतार्ह घटना होती. लोकप्रियता, जनमान्यता आणि उंची हे निकष ध्यानात घेतले तर किशोरी आमोणकरांना धोंडूताईंशी जमवून घेण्याची अजिबात निकड नव्हती पण त्यांनी औदार्य दाखविले आणि विद्येपुढे आपण झुकू शकतो हे सिद्ध केले. भास्करबुवा जोशी आणि सईदुद्दीन डागर या ज्येष्ठ गायकांचीही त्यांनी कदर केली हे नमूद करायला हवे.

त्यांच्या निधनामुळे स्वातंत्र्योत्तर काळातल्या हिंदुस्तानी संगीताचे एक पर्व समाप्त झाले आहे असे म्हणायला हरकत नाही.

– अमरेन्द्र धनेश्वर
(ग्वाल्हेर घराण्याचे गायक/समीक्षक)
दूरध्वनी : (०२२) २४३०८९३५
भ्रमणध्वनी : ९८२१८०४६२३
amardhan@gmail.com

ग्रंथाली




कथा
परमवीरचक्र
विजेत्यांच्या
आणि
ऑपरेशन
सद्भावना

अनुराधा विष्णू गोरे

मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

स्वातंत्र्य मिळवण्याएवढंच स्वातंत्र्य टिकवणंही तेवढंच महत्त्वाचं आणि कठीण. या कामीही हजारो आहुत्या पडल्या. हजारोजणांना अपंगत्व आलं. कोणी लढायांत, ऑपरेशनमध्ये असे गायब झाले की त्यांचा थांगपत्ताही लागला नाही. आपल्या कुटुंबापासून दूर राहात कित्येकांनी कधी देशात तर कधी परदेशात राहून भारतमातेची सेवा केली. भारतमातेची मान अभिमानानं उंच केली. अशा अनेकांपैकी काही परमवीरचक्र विजेते...
चला त्यांना जाणून घेऊया. आपण ज्या क्षेत्रात असू त्या क्षेत्रात परमोच्च शिखरावर पोचण्यासाठी. आणि त्याचबरोबर जाणून घेऊया- आर्मीच्या 'ऑपरेशन सद्भावना'विषयी. आपणही या ऑपरेशनमध्ये कसे सहभागी होऊ शकतो ते आपल्याला कळेल.



# अलौकिकाचा ध्यास रुजवणाऱ्या किशोरीताई


केशव परांजपे

> कोणताही भाव अभिव्यक्त करताना जेव्हा कलाकाराला स्वत:चा विसर पडतो, तो जेव्हा स्वरविभूषित भाव तेवढाच जगत असतो तेव्हा कलाकार स्वत:च एक माध्यम होऊन राहतो. भाव प्रकट करण्यासाठी लागणारे एक साधन इतकेच तिथे कलाकाराचे अस्तित्व शिल्लक राहते. तसे झाले तरच कलेतून त्या 'आनंदाची' म्हणजेच ब्रह्मानंद सहोदराची प्रचीती येऊ शकते. इथे भाव प्रकट करण्याला महत्त्व असते. तो भाव कोण प्रकट करतो हे दुय्यम महत्वाचे ठरते. स्वत:ला विसरल्यावर आपले स्वत्व तिथे राहत नसून राहतो तो फक्त एकमेव 'भाव'.
>
> – ('स्वरार्थरमणी'तून) किशोरी आमोणकर

''**म**ला ज्या दिवशी तो 'सत्य' सूर सापडेल, तेव्हा तुम्ही पहाल, मी शरीरानेही या जगात राहणार नाही... माझं सर्व अस्तित्व... माझं शरीरही... विरघळून जाईल!'' किशोरीताईंना सुराचा असा ध्यास होता. ''किशोरी काय, आज आहे, उद्या नाही; पण यमन राहणारच आहे; तो चिरंजीव आहे.'' असं ताई नेहमी म्हणत, पण त्यांच्या स्वरांत तो यमन जसा बहराला आला तसा त्या आधी तो आला नसावा, आणि आता, त्यांच्यानंतरही येईल असं वाटत नाही. ''जो पर्यंत तुम्ही 'किशोरीचा बागेश्री' चांगला झाला असं म्हणता तो पर्यंत काही न्यून नक्की आहे. जेव्हा यातून 'किशोरी' बाजूला सरेल आणि तुम्ही म्हणाल- ''काय हा बागेश्री!'' तेव्हा खरं. बागेश्री (प्रत्येकच राग) हे एक जिवंत अस्तित्व आहे, चैतन्य आहे. किशोरी काय बागेश्री दाखवणार, बागेश्रीच डोळे मिटलेल्या किशोरीला हाताला धरून वाट दाखवतो...'' म्हणूनच ताई रागाला शरण जायच्या; कासावीस होऊन, प्रसंगी त्रागा करून, स्वत:ला रागात विसर्जित करू पहायच्या. त्या म्हणत, ''हे सूर, हे राग म्हणजे संत स्वरूप आहेत, अपार दयावंत आहेत. तुम्ही पुढे-पुढे येऊ पहाल तर ते निमूट मागे जातील. तुमच्या आडमुठ्या अस्तित्वाच्या चाहुलीनेही ते स्वत:चा संकोच करतील.'' ताईंच्या गाण्यात रागाचं खरोखरंच एक झाड अंकुरून पालवायचं, फुला-फळाला यायचं. अनामिक वाऱ्याच्या झुळकीवर डोलायचं. ''आम्ही मैफलीत सादर करतो ते 'रागनाट्य''' असं त्या म्हणत; आणि नाटकाचं उदाहरण देत. शिवाजी महाराजांचं ५० वर्षांचं देदीप्यमान आयुष्य; पण आपण त्याचा दोन तासांच्या नाटकात अनुभव घेतो. म्हणजे शिवाजी महाराजांच्या आयुष्याचं एक लघुरूप, एक लघु प्रतिबिंब - मिनिएचर - आपण करतो, पाहतो. राग हेही महाराजांच्या आयुष्यासारखे असतात; किंबहुना त्याहूनही ते मोठे असतात, ते अजर-अमर असतात; स्थल-कालातीत असं चिरंतन अस्तित्व असतं त्यांना; आणि ते अस्तित्व भावात्म असतं. आम्ही तास दीड तास, दोन तास जे गातो त्यात राग संपत नाही.'' रागांविषयी ताईंची अशी धारणा होती. नव्हे, रागाचा त्यांना एवढा अनुभव होता. रागांना त्यांनी इतकं व्यापक, अनन्य स्वरूपात पाहिलं होतं. एकेका रागाच्या भव्य-उदात्त दर्शनाने 'हृदयाचा थरकाप' होतो असं त्या म्हणत. रागाच्या भेटीचा थरार त्यांनी अनुभवलेला होता म्हणून त्या सतत रागाच्या निकट सहवासात राहू पहायच्या. मैफलीतली प्रस्तुती बेतत त्या कधी बसल्या नाहीत. आपल्या गळ्यातून स्वरक्रिया उमटतील की नाही याची त्यांना काळजी नसायची; तर उत्कंठा असायची ती मैफलीत, त्या वेळी, तिथे तो राग आपल्या मनात प्रकट होण्याची! भ्रांत असायची ती रागाच्या भेटीची. मैफल हमखास जमण्याची सूत्रं (फॉर्म्युले) त्या कधी वापरूच शकल्या नाहीत. त्यांना ती अवगत नव्हती असं मुळीच नाही, पण अशी सूत्रं वापरण्याची त्यांच्या मनाची मुळीच तयारी नव्हती. अपारदर्शी सुरक्षिततेपेक्षा पारदर्शी असुरक्षितता त्यांना सुसह्य होती. 'रागसंगीत प्रस्तुतीची उत्स्फूर्तता' हे मूल्य किशोरीताईइतकं अन्य कोणी क्वचितच जपलं असेल. रागसंगीताला विपुल 'शास्त्रीय' पार्श्वभूमी असली तरी गायलं जातं ते 'शास्त्र' नाही; गायनाला कलेच्या कसोटीला उतरावंच लागतं,

हे किशोरीताईंनी सतत दाखवून दिलं. म्हणूनच या संदर्भात पं. सत्यशील देशपांडे यांनी म्हटलं आहे-

''त्यांनी (किशोरीताईंनी) आपल्यासमोर रागनिर्मितीचं उत्पादन नव्हे तर प्रक्रिया मांडली. म्हणून माझ्या दृष्टीने किशोरीताईंची एखादी न जमलेली मैफल ही झुबिन मेहतांच्या जमून आलेल्या सिंफनीपेक्षा श्रेष्ठ होती.''




''सुरांना त्यांचा स्वतःचा भावरंग आहे आणि त्या रंगात ते (सूर) तुम्हाला रंगवतातच, सुरांच्या जितकं जवळ जावं तितकं ते तुम्हाला आपलंसं करून टाकतात''- हे जेव्हा ताईंच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी आपला 'स्वतःचा' भाव सोडून दिला आणि स्वराच्या भावाचा रंग आस्तिकपणे त्या लेवू लागल्या. त्यांचे गाणे बदलले. गानतपस्विनी मोगूबाई कुर्डीकर यांची काटेकोर समर्थ तालीम, असाधारण बुद्धिमत्ता, विलक्षण उर्जा, या बळावर ऐन तारुण्यात त्यांचे गाणे जे झगमगते होते, दिपवून टाकणारे होते ते भावात्म बनत गेले; गुणवत्तेच्या प्रत्येक पैलूंचे पर्यवसान गहिऱ्या भावात्मतेत होत जाऊ लागले. लोकप्रियतेच्या शिखरावर असताना ताईंनी पाच-सात वर्षे दिवसरात्र खपून आपल्या सांगीतिक चिंतनाचा सिद्धांत शब्दबद्ध केला. ताईंचा 'स्वरार्थरमणी' हा ग्रंथ प्रकाशित झाला. संगीत ही सुरांची भाषा आहे. ही भाषा अमूर्त भावाला कवेत घेण्यासाठी अन्य सर्व माध्यमांपेक्षा अधिक अनुकूल आहे. माध्यमावरचे प्रभुत्व आणि या प्रभुत्वाचे प्रदर्शन, तालासुरांच्या करामती म्हणजे संगीत नव्हे हे त्या अत्यंत कळकळीने तरुण पिढीला सांगू लागल्या.

नाट्य, साहित्य या संदर्भात कलानंदापर्यंत पोचण्याची प्रक्रिया 'रससिद्धांत' म्हणून सांगितली गेली आहे. ताईंनी या रससिद्धांताचा अभ्यास केला आणि हा रससिद्धांत ख्याल गायनात कसा प्रत्ययाला येतो हे संगतवार मांडून दाखविले. वैयक्तिक भावानुभव विशुद्ध अशा स्वरभाषेत 'साधारण' कसा होतो, वैश्विक कसा होतो याचा अनुभव ताईंनी कथन केला आहे. स्वरभाषेत उतरल्यावर भावानुभव व्यापक कसा बनतो आणि शेवटी आनंदाची अनुभूती कसा देऊन जातो याची साक्ष ताईंना पटली होती. 'स्व'चे भान हरपून आपण भावमय होतो आणि आनंद स्थितीला पोचतो, हेच संगीताचे अध्यात्म अशी ग्वाही ताईंनी दिली आहे. ही क्षमता गायक आपल्यामध्ये विकसित करू शकतो असा विश्वास ताईंनी दिला आहे. या विकसनासाठी काय साधना करावी याचे मार्गदर्शन केले आहे. साधना म्हणजे मंचीय प्रस्तुतिकेंद्रित 'सराव' नव्हे. मंचीय प्रस्तुतीच्या अलीकडे आणि पलीकडे अपार संगीत आहे, याचा वेध कलाकाराने घ्यायला हवा असे ताईंनी आग्रहाने सांगितले आहे.

माध्यमावर पुरेसं प्रभुत्व आलं आणि कलाकार संपूर्ण प्रामाणिक असला की त्याच्या कलाविष्कारात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब पडू लागते. ताईंच्या गाण्यात ते पडलेच होते. ज्याचे प्रतिबिंब गाण्यात पडले ते ताईंचे व्यक्तिमत्त्व कसे होते? विलक्षण मनस्वी, उत्कट, सौंदर्यलक्ष्मी... ताईंचे गाणे खूप वरच्या दर्जाचे होते कारण ताईंचा भावानुभव लोकोत्तर होता. भावाला स्पर्श करणारा नव्हे तर भावाचा पार पाहणारा होता.

किशोरीताईंच्या तरुणपणी त्यांच्याविषयी गानरसिकांना विलक्षण कौतुक आणि कुतूहल होतं. त्या प्रस्थापित कलाकार झाल्या तेव्हा त्यांच्या मनस्वीपणाच्या विक्षिप्त वागण्याच्या कहाण्या तिखट-मीठ लावून सांगितल्या जाऊ लागल्या; आणि अलीकडे आबालवृद्ध त्यांच्या विषयीच्या प्रेमाने ओथंबून गेले होते. काही थोडे शिष्य त्यांच्यासमोर बसून शिकले- तारेवरची कसरत करीत संगीतात सुडौल झाले; पण अन्य किती तरी त्यांच्याकडून शिकले. काही जणांना कळू शकले की अलौकिकाचा ध्यास त्यांच्या मनात ताईंच्या गाण्याने रुजवला; अनेकांना कळलेही नाही की आतून, आतून जी हाक त्यांना ऐकू येते तिचे नाव आहे किशोरी आमोणकर. किशोरीताईंना वगळून आपल्या शतकातला कोणीही कलाकार पुढे जाऊच शकत नाही, ताईंचा प्रभाव एवढा सर्वदूर, व्यापक आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातही एक विलक्षण ओढ होती. त्यांच्या संपर्कात जो आला, तो त्यांच्याकडे ओढला गेला. म्हणूनच तर ३ एप्रिलला रात्री ती दुःखद बातमी आली तेव्हा कोणाच्याच मनाची त्या बातमीवर विश्वास ठेवायची तयारी नव्हती. प्रत्येक जण हळहळला. ताई मात्र सर्व काही जिंकून गेल्या. आपल्या टर्म्सवर जगल्या, आपल्या टर्म्सवर गेल्या. ''आता होती - आता नाही - पाहाल तुम्ही!'' असं त्या म्हणत, ते त्यांनी खरं केलं. शेवटपर्यंत अम्लान प्रतिभेने थकल्या गळ्यावरही सोन्याची झिलई लेवून त्या गात राहिल्या. ''स्वरार्थरमणी'' लिहून कृतकृत्य झाल्या. कापूर केव्हा उडून गेला कळले नाही. घमघमाट मात्र आमच्या आयुष्यभर भरून राहील! ताई तुम्हाला अत्यंत कृतज्ञतेने, अतीव प्रेमाने नमस्कार... म्हणाल- ''God bless you.''

''ताई God blessed us with you!''


**- केशव परांजपे**
भ्रमणध्वनी : ७७३८६७४३२१
kdparanjape@gmail.com

## नवीन 'मॅजेस्टिक'ने प्रकाशने

वास्तव आणि त्याला स्पर्श करणारी अनुभूती यांचं अद्‌भुत मिश्रण असलेल्या कथांचा संग्रह. वास्तवाचं व्यंगरूपसुद्धा येथे विनोदी होऊ न देता छान प्रगट होतं. एका अर्थाने कथा हा लेखकाने लावलेला वास्तवाचा अन्वयार्थ असतो, याची साक्ष या संग्रहातली प्रत्येक कथा देते.




# झाली लिहून कथा?

**मधुकर धर्मापुरीकर**

मूल्य : २०० रुपये

'तथाकथित' या संग्रहातील विजय तांबे यांच्या कथांमध्ये सामाजिक भानाच्या तुलनेत कल्पकता अधिक जाणवते. प्रयोगशील लेखकांच्या कथा वाचकांपर्यंत पोहोचणे हे साहित्यसंस्कृतीच्या सकस जोपासनेसाठी अत्यंत आवश्यक असते. वास्तववादाच्या आहारी गेलेल्या मराठी साहित्यासाठी ह्या कथा अभ्यासाचा असा वस्तुपाठ ठरू शकतात. – **सतीश तांबे**




# तथाकथित

**विजय तांबे**

मूल्य : २२० रुपये

मॅजेस्टिक

प्रमुख विक्रेते : मॅजेस्टिक बुक स्टॉल। गिरगाव। पुणे । मो. ९९२२३४४०८१ मॅजेस्टिक बुक डेपो। ठाणे (प.), दूरध्वनी : २५३७६८६५ मॅजेस्टिक ग्रंथदालन। शिवाजी मंदिर, भ्रमणध्वनी : ९८९२२२०२३९ मॅजेस्टिक बुक गॅलरी । म्हात्रे पुलाजवळ, १०० फूट डीपी रोड, पुणे । दूरध्वनी : (०२०) ६८८८८९०८

Website : www.majesticprakashan.com I E-mail : majesticph@gmail.com

आपली आवडती पुस्तके मागविण्यासाठी Click करा www.majesticonthenet.com या वेबसाइटवर

Customer Care : 022-65666755



## समीक्षक समाजशास्त्रज्ञ :

# प्रा. द.ना. धनागरे

डॉ. विजय मारुलकर

**एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठातील निवृत्त प्राध्यापक व समाजशास्त्र विभागाचे प्रमुख तसेच सध्या यु. जी. सी. एमेरिटस प्रोफेसर म्हणून शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागात कार्यरत असलेल्या प्रा. विजय मारुलकर यांचा प्रा. द.ना. धनागरे यांच्याशी प्रदीर्घ अनुबंध होता. समाजशास्त्र आणि शिक्षणाचे अभ्यासक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा हा मर्मग्राही आढावा...**


समकालीन समाजशास्त्रात आदराने ज्यांचा उल्लेख केला जातो असे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ व व्यासंगी प्राध्यापक, चिकित्सक संशोधक, उच्च शिक्षणावरील थोर भाष्यकार, परखड व साक्षेपी विचारवंत, कठोर प्रशासक, शिस्तशीर व कल्याणकारी कुलगुरु, चिंतनशील व्यक्तिमत्व असे बहुआयामी प्राध्यापक, प्रा. दत्तात्रेय नारायण धनागरे यांचे नुकतेच निधन झाले. ते आज काळाच्या पडद्याआड गेले असले तरी त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने अध्यापन, संशोधन, प्रशासन व एकूणच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात केलेले कार्य दीर्घकाळ लक्षात राहण्यासारखे आहे. शिक्षण आणि विशेषकरून उच्च शिक्षणाविषयी असणारी त्यांची आत्मीयता व तळमळ पण त्याचवेळी त्यांची त्यातील निर्भिड विचारसरणी, अध्यापन, संशोधन व त्याचबरोबर प्रशासनातील त्यांची करडी शिस्त, सामाजिक प्रश्नावरती टोकदार भाष्य करण्याची त्यांची प्रवृत्ती अशा अनेक गोष्टींमुळे प्रा. धनागरे सदैव चर्चेत राहिले.

समाजशास्त्रज्ञ हा स्वत: गतिमान असला तरच तो समकालीन समाजाचे चिकित्सक विश्लेषण करु शकतो. या गोष्टीशी ते नेहमीच चिकटून राहीले. आपल्या अभ्यासपूर्ण विचारांशी ते नेहमीच ठाम असत. अत्यंत आत्मविश्वासाने केलेल्या वैचारिक मांडणीशी ते कधीच तडजोड करीत नसत. सदैव सतर्क समाजभान असणाऱ्या या व्यक्तिमत्वाबद्दल त्यामुळेच एक आदरयुक्त भीती त्यांच्या सहवासात आलेल्या बहुतेकांना जाणवत असणार यात अजिबात संदेह नाही. त्यांची स्वतंत्र जीवनशैली, परंपरा आणि आधुनिकता याविषयी त्यांचे असणारे समर्थ भाष्य, इतरांना कार्यप्रवण व जिज्ञासू बनविण्याची त्यांची प्रवृत्ती, त्यांच्या ठायी असणारा सर्व बाबतीतील सडेतोडपणा पण त्याच बरोबर एखाद्याविषयी अगदी आस्थेवाईकपणे चौकशी करण्याचा त्यांचा स्वभाव, कोणत्याही बाबतीत माघारी न फिरण्याची त्यांची वृत्ती. अशा अनेक गोष्टींविषयी त्यांचा परिचय मला खूप जवळून झाला तो त्यांच्याशी असलेल्या गेल्या जवळजवळ चाळीस वर्षाच्या सहवासामुळे.

### जीवन, अध्ययन व अध्यापन

विदर्भातील 'वाशिम' या छोट्या शहरात ११ जून, १९३६ रोजी जन्माला आलेल्या प्रा. धनागरे यांच्यावर बालपणापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचा पगडा होता. त्यांचे कुटुंबीय हे संघाचे अनुयायी असल्यामुळे ते स्वाभाविक होते. धनागरेही संघाचे ऋण मान्य करीत, पण त्यांनी आपली कार्यपद्धती आणि संघाची विचारसरणी यांना जाणीवपूर्वक व खूप चलाखीने एकमेकापासून नेहमीच दूर ठेवले. शालेय शिक्षण वाशिमला झाल्यावर त्यांनी उच्चशिक्षण नागपूर विद्यापीठातून पूर्ण केले. बी. ए. परीक्षेत मराठी तर एम. ए. समाजशास्त्रातून पूर्ण करताना प्रथम येणाचा मान त्यांनी संपादन केला. बी. ए. परीक्षेत नागरिकशास्त्रात त्यांनी सुवर्णपदक तर मराठी विषयात रौप्य पदक प्राप्त केले. १९६५-६६ मध्ये त्यांना अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळाली ती नागपूरच्या हिस्लॉप महाविद्यालयात असताना, त्यांचा संपर्क आलेल्या अमेरिकन स्कॉलर एडविन ड्रायव्हर या शिक्षकांमुळे!

१९७३ मध्ये धनागरे यांनी इंग्लंडमधील ससेक्स विद्यापीठातून 'पीझंट मुव्हमेंटस इन इंडिया: १९२० ते १९५०' या विषयावरील प्रबंध सादर करून डी. फिल. पदवी संपादन केली. हा प्रबंध पुस्तक रूपाने ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने १९८३ मध्ये प्रकाशित केला व नंतर त्याच्या चार आवृत्या प्रकाशित झाल्या. त्यांचा हा ग्रंथ म्हणजे भारतातील शेतकरी चळवळीविषयीचा एक मानदंडच मानला जातो. तसेच सामाजिक चळवळी आणि तुलनात्मक सामाजिक इतिहास आणि समाजशास्त्राच्या अभ्यासातील एक अभ्यासपूर्ण कलाकृती म्हणूनही त्याला मान्यता मिळाली. १९७०-७३ या दरम्यान त्यांना तीन वर्षांसाठी प्रतिष्ठेची कॉमनवेल्थ स्कॉलरशिप मिळाली




व तेव्हाच त्यांनी डी. फिल. ही संशोधनातील पदवी प्राप्त केली. त्यांच्या या अध्ययन आणि संशोधनादरम्यान त्यांचा अनेक विद्वान लोकांशी संबंध आला आणि त्यांच्या विचारांचा प्रभाव धनागरे यांच्या आयुष्यावर जीवनभर पडलेला दिसतो. त्यामध्ये टॉम बॉटमोर आणि बार्बू, हामझा अलावी, एरिक वुल्फ, रणजीत गुहा, बॅरिंग्टन मूर, पी.सी. जोशी, थेडा स्कॉकपॉल, ई. एच. कार इत्यादींचा नामोल्लेख करावाच लागतो. तसेच त्यांच्या एकूण विचारावर इरफान हबीब, रोमिला थापर, डी. डी. कोसंबी, वॉलरस्टीन यांचा प्रभावही प्रकर्षाने जाणवतो. किंबहुना हे सर्व त्यांचे आवडते लेखक असल्याचे त्यांच्या अनेक व्याख्यानांतून नेहमीच ऐकायला मिळते. ऐतिहासिक समाजशास्त्र हा त्यांचा आवडीचा व संशोधनाचा विषय. तसेच सामाजिक इतिहास हे त्यांचे बलस्थान होते. वस्तुत: त्यांची पुणे विद्यापीठातील नियुक्ती ही रिसर्च मेथॉडॉलॉजीमधील प्रोफेसर अशी असली तरी तथ्यसंकलनात ते फारसे अडकून पडले नाहीत. तर तथ्यसंकलनातील निष्कर्ष मांडणी व सादरीकरणाचे समीक्षात्मक लिखाण करण्यावरच त्यांनी भर दिला.

ऑगस्ट २०१६ मध्ये शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागात व्याख्यान देताना त्यांनी स्वत:च आपण केवळ विश्लेषण करतो हे स्पष्ट करून समाजशास्त्रातील समीक्षक असल्याचे जाहीरपणे सांगून टाकले. म्हणूनच लेखाच्या शीर्षकात असा उल्लेख करण्याचा मोह मला आवरता आला नाही. समाजशास्त्रीय विचारातील व विश्लेषणातील हे त्यांचे वास्तव होते. त्याचप्रमाणे ते मूलत: समाजशास्त्राचे प्राध्यापक असले तरी इतर सामाजिक विज्ञाने व त्याच बरोबरीने भाषा विषयांचेही सखोल ज्ञान असल्याने आंतरविद्याशाखीय अभ्यास असेच त्यांचे कार्यक्षेत्र राहिले. कोणत्याही विशिष्ट शैक्षणिक चौकटीत त्यांनी स्वत:ला बांधून न घेता सर्वच ज्ञानशाखांमध्ये मुक्त संचार केला. अगदी सहजपणे ते या सर्व ज्ञानशाखांत वावरत असत. अलिकडच्या काही वर्षात ते वक्ता म्हणून अनेक चर्चासत्रात, कार्यक्रमात उपस्थित असत, पण त्याचबरोबर श्रोता म्हणूनही अशा कार्यक्रमातून हजेरी लावण्यात त्यांना आनंद वाटत असे. त्यांच्यातील ही प्रवृत्ती इतराना अंतर्मुख करणारी होती. त्यांचे विचारविश्वच वेगळे होते. अनुकरणीय आणि आदर्शवत् होते.

प्रा. धनागरे यांनी अध्यापनाची सुरुवात १९५९-६० मध्ये अमरावतीच्या एस. एस. महाविद्यालयातून केली. १९६०-६१ मध्ये ते अमरावतीतच महाराष्ट्र शासनाच्या सेवेत 'असिस्टंट एम्प्लॉयमेंट ऑफिसर' म्हणून कार्यरत होते. १९६१-६८ या कालावधीत ते आग्रा विद्यापीठाच्या 'इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस'मध्ये अधिव्याख्याता म्हणून कार्यरत राहिले. १९६८-७७ या कालावधीत ते कानपूरच्या आय. आय. टी.मध्ये सहाय्यक प्राध्यापक राहिले. डिसेंबर १९७७ पासून पुढे एकोणीस वर्षे प्रा. धनागरे, पुणे विद्यापीठात समाजशास्त्राचे प्राध्यापक होते. ही त्यांची नियुक्ती Professor of Methodology अशी होती. मेथॉडॉलॉजीसाठी वेगळा प्रोफेसर नेमण्याची महाराष्ट्रातील बहुधा ती पहिलीच वेळ होती. पुणे विद्यापीठात कार्यरत असतानाच १९९१-९३ या कालावधीत त्यांनी आय. सी. एस. एस. आर., नवी दिल्ली येथे मेंबर सेक्रेटरी म्हणून कार्य केले. उत्तर प्रदेशातील सामाजिक वनीकरणाच्या प्रकल्पाअंर्तगत ते १९९४-९५ मध्ये जागतिक बँकेचे समाजशास्त्रीय सल्लागार राहिले. १९९५-२००० या पाच वर्षासाठी प्रा. धनागरे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात कुलगुरुपदी कार्यरत राहिले. ही पाच वर्षे त्यांच्या आयुष्यात खूप वेगळ्या वळणावरची ठरली. त्यानंतर ते अगदी गेल्या वर्षापर्यंत 'इंडियन इन्स्टीट्युट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज, सिमला' या ठिकाणी 'नॅशनल फेलो' म्हणून संशोधन कार्यात मग्न होते. सामाजिक संशोधकाची आपली भूमिका अखेरपर्यंत त्यांनी निष्ठेने जपली होती, हे या ठिकाणी लक्षात घेण्यासारखे आहे.

**बहुमान व पारितोषिके**

प्राध्यापक धनागरे यांच्या एकूणच शैक्षणिक, संशोधनपर व प्रशासकीय कार्याची दखल देश-विदेशातील विविध संस्था व संघटनांनी वेळोवेळी घेतलेली दिसते. त्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती, पारितोषिके आणि अनेक बहुमान प्राप्त झाले. त्यामध्ये 'कॉमनवेल्थ स्कॉलरशिप', इंग्लंडमधील ग्रंथालयीन अध्ययनासाठी 'इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च फेलोशिप', कोपनहेगन, डेन्मार्कमधील स्कँडेनेव्हीयन इन्स्टिट्युट ऑफ एशियन स्टडीजची 'व्हिजिटींग एशिएन स्कॉलरशिप' विद्यापीठ अनुदान आयोगाचे राष्ट्रीय व्याख्याते, जपानस्थित टोकिओ विद्यापीठाच्या फॉरिन स्टडीजमधील व्हिजिटींग रिसर्च प्रोफेसर, शास्त्री इंडो-कॅनेडीयन इन्स्टिट्युटची प्रतिष्ठेची व्हिजिटींग फेलोशिप. (कॅनडामधील १६ विद्यापीठातील व्याख्यान दौरे). आय.सी.एच.आर.च्या रशिया व आय.सी.एस.एस.आर.च्या चीन भेटीच्या पथकातील सदस्य, आय.सी.एस.एस.आर.च्या जपान हॉलंड, फ्रान्स, रशिया आणि उत्तर कोरिया भेटीच्या पथकाचे नेतृत्व अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो.

पुणे विद्यापीठाने त्यांना १९९५ मध्ये संशोधनातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन 'उत्कृष्ट शिक्षक' या नात्याने प्राचार्य

'व्ही. के. जोग पारितोषिक' प्रदान केले. तसेच २००७ मध्ये त्यांच्या समाजशास्त्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांना 'स्वामी प्रणवानंद सरस्वती पारितोषिक' प्रदान केले. २०१० मध्ये त्यांचा इंडियनल सोशिओलॉजिकल सोसायटीने 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मान केला. तसेच २०१४ मध्ये असाच गौरव पुरस्कार त्यांना मराठी समाजशास्त्र परिषदेने प्रदान केला. अलिकडेच त्यांना 'अनंतराव भालेराव पत्रकारिता पुरस्कार'ही औरंगाबाद येथे प्रदान करण्यात आला होता. तरीही त्यांच्या तोलामोलाचे आणखी काही प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना मिळायला पाहिजे होते ही खंत त्यांनी एकदा माझ्याशी बोलताना व्यक्त केली होती.

**प्रकाशित साहित्य**

प्रा. धनागरे हे प्रखर बुद्धिवादी होते. त्यांनी जे लिहिले, जे मांडले ते सर्व अनुभवकथन होते. वास्तव सत्याचाच पाठपुरावा त्यांनी सदैव त्यांच्या लिखाणातून केला. संख्यात्मकतेपेक्षा गुणात्मक लिखाणावर त्यांनी भर दिला. त्यामुळेच त्यांच्या प्रकाशित ग्रंथांची संख्या कमी वाटत असली तरी त्यातील गुणात्मक आशय त्यांच्या एकूणच प्रतिभेची साक्ष देणारा आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समाजशास्त्रीय नियतकालिकांतून त्यांनी सुमारे सत्तर लेख लिहिले. शिवाय सहा ग्रंथ लिहिले. यातील बहुतांश लिखाण हे इंग्रजीतील आहे. मराठी वर्तमानपत्रांतूनही त्यांनी अलिकडच्या कांही वर्षात सातत्याने लिखाण केले, पण या सर्वामध्ये शिक्षण आणि उच्चशिक्षण हा केंद्रबिंदू असे. शिवाजी विद्यापीठात कुलगुरु झाल्यानंतर त्यांनी बहुतांश मराठी लिखाण केले हे लक्षात घेण्यासारखे आहे. नागपूरला बी.ए.च्या परीक्षेत मराठी विषयात त्यांनी रौप्य पदक मिळविले, पण नंतरची अनेक वर्षे समाजशास्त्रातील अध्यापन व संशोधनात त्यांनी इंग्रजीचाच पाठपुरावा केल्याने मराठीत ते फारसे लिहू शकले नसावेत असे वाटते.

त्यांच्या प्रकाशित ग्रंथांमध्ये 'अॅग्रेरियन मुव्हमेंटस अँड गांधीयन पॉलिटिक्स'; 'रुरल ट्रान्सफॉर्मेशन इन इंडिया : चॅलेंजिस अँड प्रॉस्पेक्टस; पीझंटस मुव्हमेंटस् इन इंडिया; थीमस् अ‍ॅन्ड परस्पेक्टीव्हज इन इंडियन सोशिऑलॉजी'; 'पॉप्युलिझम अ‍ॅन्ड पॉवर' या इंग्रजी ग्रंथांव्यतिरिक्त 'नागरी समाज, राज्यसंस्था आणि लोकतंत्र'; 'उच्च शिक्षण : ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे', 'संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव' (पुरस्कार प्राप्त); 'हिरवे अनुबंध' (पुरस्कारप्राप्त) या मराठीतील पुस्तकांचा समावेश होतो. यापैकी 'संकल्पनांचे विश्व' या पुस्तकात त्यांनी वेगवेगळ्या संदर्भात जी व्याख्याने दिली, त्यांचा समावेश आहे. प्रतिमा प्रकाशनने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाला पुरस्कार मिळाल्याचे समजताच मी त्यांना अभिनंदनाचा फोन केल्यावर लगेचच त्यांनी प्रकाशकांना पुस्तकाची प्रत मला पाठवून देण्यास सांगितले. मौज प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या 'हिरवे अनुबंध' या पुस्तकात त्यांचे ललित लेख आहेत. त्यांच्या संपर्कात आलेल्या मुस्लीम विचारवंत व समाजशास्त्रज्ञांविषयी तसेच वाशिम गावाविषयीचे लिखाण या पुस्तकात पहायला मिळते. हे त्यांचे पुस्तक प्रकाशित झाले तेव्हा दूरदर्शनवरील एका वाहिनीवर 'अनुबंध' नावाची मालिका नुकतीच संपली होती. हा एक योगायोग म्हणावा लागेल. अलीकडेच प्रकाशित झालेल्या 'पॉप्युलिझम अँड पॉवर' या पुस्तकात त्यांनी प्रामुख्याने शेतकरी संघटनेच्या चळवळीच्या संदर्भात पश्चिम भारतातील शेतकरी आंदोलनाचा पुन्हा विचार करून नव्याने त्याची मांडणी केली आहे. प्रा. धनागरेंच्या ललित लेखातून विशेषकरून दोन महनीय व्यक्तींचा उल्लेख झालेला दिसतो. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल व कुलपती पी. सी. अलेक्झांडर की ज्यांच्याशी त्यांचे उच्च शिक्षण व विद्यापीठ प्रशासन या बाबतीत अनुबंध जुळले आणि कॉ. गोविंद पानसरे, ज्यांच्याशी त्यांचे कोल्हापूरच्या वास्तव्यकाळात चळवळीच्या माध्यमातून संबंध जुळून आले. अशा दोघांविषयी धनागरे यांनी खूप तळमळीने व भरभरुन लिहिले आहे.

समाजशास्त्रीय स्वरूपाचे त्यांचे जे लिखाण झाले त्याला मात्र मार्क्सवादी विचारांची बैठक लाभली आहे, हे लक्षात घेतले पाहिजे कारण मार्क्सवादी विचार परंपरा हा त्यांच्या लिखाणाचा मूलस्त्रोत होता.

**संशोधनक्षेत्र व संस्थात्मक संबंध :**

समाजशास्त्र हे मुळातच व्यापक सामाजिक शास्त्र असल्यामुळे त्याच्या व्यापक संशोधनाची गरज प्रा. धनागरेंच्या नजरेतून सुटली नाही. विकासविषयक सिद्धांत, सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, भारतातील कृषक समाजशास्त्र, संशोधन पद्धती हे त्यांच्या आवडीचे संशोधनक्षेत्र होते. त्यावर ते अधिकारवाणीने बोलत पण अलीकडे पर्यावरण, स्त्रीवादी सिद्धांत याही क्षेत्रात त्यांनी आपले प्रभुत्व निर्माण केले होते. याविषयीच्या अभ्यासातून त्यांनी आपली सूक्ष्म निरीक्षणे नोंदविली होती.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आय. आय.टी. कानपूर आणि पुणे विद्यापीठातून एकूण तेरा संशोधकांनी पीएच.डी. पदवी संपादन केली.

'इंडियन सोशिऑलॉजिकल सोसायटी', 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ पब्लिक अ‍ॅडमिनिस्ट्रेशन', 'मराठी समाजशास्त्र परिषद', 'पीपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबर्टीज', 'इंडियन असोसिएशन ऑफ सोशल सायन्सेस' अशा अनेक संस्थांचे ते आजीव सदस्य व पदाधिकारीही होते.

'इंडियन सोशिऑलॉजिकल सोसायटी'चे ते दोन वर्षे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. तेथील त्यांच्या कार्यकाळातच सोसायटीचे 'न्यूज लेटर' त्यांनी सुरू केले.

शिवाजी विद्यापीठात कुलगुरु असताना त्यांच्याच पुढाकाराने व विभागप्रमुख एस. एन. पवार यांच्या सहकार्यातून त्यांनी समाजशास्त्राची राष्ट्रीय परिषद १९९६ साली यशस्वीरित्या आयोजित केली. अशी परिषद आजतागायत महाराष्ट्रातील एकाही

विद्यापीठाने आयोजित करण्याचे धाडस दाखविलेले नाही. इथेच धनागरे यांच्या कर्तबगारीची कल्पना येते.

शैक्षणिक योगदानासाठी प्रा. धनागरे यांनी अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड, डेन्मार्क, स्वीडन, स्पेन, बेल्जियम, रशिया, युगोस्लाव्हिया, चीन, जपान, फिलिपाइन्स, थायलंड, बांगला देश, ब्राझील, उत्तर कोरिया, ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान अशा अनेक देशांना भेटी दिल्या व आंतरराष्ट्रीय समाजशास्त्रीय क्षेत्रातही आपला ठसा उमटविला.

**कुलगुरु धनागरे**

प्रा. धनागरे १९९५-२००० या कालावधीत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात कुलगुरु होते. या त्यांच्या कार्यकाळात विद्यापीठात अनेक संघर्षमय प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले. पदावर आल्यावर त्यांचा विद्यापीठातील पहिलाच कार्यक्रम सूचक ठरला. आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धांचे तेव्हा आयोजन केले होते व सलामीची कुस्ती लावून त्यांनी स्पर्धेचे उद्‌घाटन केले, पण पुढे पाच वर्षे सतत विद्यापीठात अनेकांशी कुस्तीच करावी लागेल याची सुतरामही कल्पना त्यांना आली नसावी.

शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, प्राचार्य व संस्थाचालक यांच्याशी त्यांचा अखेरपर्यंत संघर्ष होतच राहिला. त्यांच्या विरोधात ४७ दिवस बंद राहिलेले विद्यापीठ, दोन वेळा कोल्हापूर शहर तर एक वेळेस सोलापूर शहर बंद याची चर्चा नेहमीच होत राहिली. त्यांच्या समर्थनार्थ व विरोधात सतत विद्यापीठ ढवळून निघाले. साताऱ्याचे तत्कालीन आमदार अभयसिंहराजे भोसले यांनी तर त्यांच्या विरोधात उपोषणच केले. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, तालीम संघ, खासदार, आमदार अशा सर्वांनीच हा संघर्ष उभा केला परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांचा त्यांना असणारा विरोध अनाकलनीय होता. ते केवळ एक राजकारण होते आणि या आगीत तेल ओतण्याचे काम एका प्रथितयश दैनिकाने केले, ही त्यातील सर्वात खेदाची बाब होती. महाराष्ट्र विधिमंडळात कुलगुरु हटावसाठी झालेला सर्व संमतीचा ठराव म्हणजे या सर्वांचा कळस होता. उच्च शिक्षण क्षेत्रातील शिस्तीलाच छेद देण्याचा हा ठराव विधिमंडळाने संमत करावा यासारखी लाजिरवाणी दुसरी गोष्टच असू शकत नाही. विद्यापीठातील समांतर प्रशासनाला काबूत ठेवण्यासाठी धनागरे यांनी शिस्तशीर पण प्रसंगी कडव्या प्रशासनाचा घेतलेला आधार हितसंबंधी लोकांना जाचक वाटू लागल्यानेच त्यांनी कुलगुरुविरोधी संघर्ष केला. हे वास्तव केवळ कुलपतींनीच लक्षात घेतले ही धनागरे यांची जमेची बाजू होती. त्यातच 'सुटा' या शिक्षक संघटनेने त्यांची उघड पाठराखण केल्याने धनागरेंना पूर्ण कार्यकाळ काम करता आले. अर्थात 'सुटा'लाही विद्यापीठ प्रशासनावर वर्चस्व ठेवायचे असल्याने त्यांनी कुलगुरुंना पाठिंबा दिला अशीही चर्चा तेव्हा होत राहिली, पण विरोधक आणि समर्थक असे चित्र दीर्घकाळ विद्यापीठात चर्चेत राहिले हे वास्तव मात्र कोणी नाकारू शकणार नाही.

हा दीर्घकालीन संघर्ष चालू असतानाही कुलगुरु म्हणून धनागरे यांनी अनेक विधायक, सकारात्मक व कल्याणकारी गोष्टी विद्यापीठात सुरू केल्या. आजतागायत या सर्व गोष्टी चालू आहेत. हीच त्यांची नैतिक उपलब्धी आहे. विद्यापीठातील सुमारे शंभर रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम सेवेच्या नेमणुका देऊन त्यांचे संसार त्यांनी उभे करून दिले. हे कर्मचारी आजही त्यांचे ऋण मान्य करतात.

याव्यतिरिक्त धनागरे यांनी विद्यापीठात जैवतंत्रज्ञान विभागाची निर्मिती, भाषाभवनाची उभारणी, परीक्षा विभागाची निर्मिती, भाषाभवन तलावाची बांधणी, वि. स. खांडेकर जन्म शताब्दीचे आयोजन, विद्यार्थी वसतिगृहातील मेसची पुनर्रचना, संतश्रेष्ठ तुकाराम पालखीचे स्वागत, गुणवान विद्यार्थ्यांना विद्यापीठ निधीतून लाखो रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्याची सोय अशा अनेक योजना कार्यान्वित करून विद्यापीठ विकासात भरीव योगदान दिले. त्यांचे तेव्हाचे विरोधकही आज या गोष्टीबद्दल आत्मीयतेने बोलतात. हाच धनागरे यांचा नैतिक विजय मानला पाहिजे.

वस्तुत: विद्वत्ता आणि कुलगुरु या गोष्टीचा अलीकडच्या काळात फारसा संबंध राहिलेला नसला तरी धनागरे हे त्याला अपवाद होते, ते विद्वान तर होतेच शिवाय कुलगुरु पदाचा योग्य तो सन्मान राखण्याचे प्रयत्न त्यांनी सातत्याने केले. शिक्षण आणि प्रशासन या दोन्ही गोष्टीत ते सहजपणे वावरत असत. त्यांच्या ठिकाणी असणारा प्रचंड आत्मविश्वास, धडाडी, निर्णयक्षमता, ठामपणा, दीर्घ अनुभव या गोष्टींमुळेच हे शक्य झाले होते.

अलीकडच्या काळात शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे धनिक वर्गाची होणारी मक्तेदारी, शिक्षणाचे होणारे बाजारीकरण या विरोधात ते सातत्याने व पोटतिडकीने बोलत. त्यांना या बाबतीत त्यांचे कांही स्नेही ''अहो धनागरे हे अरण्यरुदन आहे'', असे सांगत. तरीही ते आपला निषेधाचा सूर कधी थांबवत नसत. शिक्षणाचे होणारे राजकीयकरण हा त्यांच्या दृष्टीने एक घृणास्पद प्रकार होता.

प्रा. धनागरेंच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू उलगडत असताना कांही गोष्टीबाबत त्यांचा असणारा दृष्टिकोन हा अनाकलनीय वाटतो. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचे त्यांच्याशी व्यक्तिगत जिव्हाळ्याचे संबंध होते, पण त्यांच्या निधनानंतर आणि एकूणच शेतकरी संघर्षाबाबत धनागरे यांनी लिहिलेल्या लेखात महात्मा फुलेंच्या 'शेतकऱ्याचा आसूड'चा साधा उल्लेखही नव्हता ही बाब अनेकांना खटकणारी होती. तसेच समाजशास्त्राच्या क्षेत्रात ते घुर्ये, एम. एन. श्रीनिवास आणि इरावती कर्वे यांच्यावर टीका करीत असल्याने त्यामागचे कारण कधी समजू शकले नाही. धनागरे स्वत: मार्क्सवादी विचारसरणीवर आधारित समाजशास्त्रीय विश्लेषण करीत, पण त्याचवेळी ते इंडॉलॉजीही प्रमाण मानत. साहजिकच या काही गोष्टींमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व हे डिफरन्शियल पण त्याच वेळी कॉन्ट्रोव्हर्शियलही असल्याचे जाणवते. अर्थात त्यामुळे त्यांचे महत्त्व यत्किंचितही कमी होत नाही कारण वैचारिक

मतभिन्नता हाच विचारवंतांचा गुणविशेष असतो.

डॉ. वसंत गोवारीकर आणि डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांच्या निधनानंतर धनागरे यांनी त्यांच्याविषयी कृतज्ञतापूर्वक लिहिलेले लेख म्हणजे त्यांच्यातील असणारा जिव्हाळा, आत्मीयता यांचेच द्योतक होते.

सन २०१६ च्या मध्यावर त्यांची मुंबईतील एशियाटिक सोसायटीच्या विश्वस्तपदी झालेली नेमणूक म्हणजे त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे नवीन दालनच! पण दुर्दैवाने त्याचा आनंद त्यांना घेता आला नाही.

मराठी समाजशास्त्र परिषदेच्या शिवाजी विद्यापीठातील अधिवेशनात बीजभाषक म्हणून त्यांनी घेतलेला महाराष्ट्रातील समाजशास्त्राच्या वाटचालीचा आढावा म्हणजे सूक्ष्म समाजशास्त्रीय आकलनाचा नमुना होता. तसेच २०११ मधून मुंबई विद्यापीठात झालेल्या Pre conference seminar मध्ये निरोप समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी सुमारे दोन तास केलेले भाषण म्हणजे त्यांच्या सर्वस्पर्शी समाजशास्त्रीय ज्ञानाचा एक अनोखा अनुभव होता. आजही त्यांचे ते भाषण माझ्यासारख्या अनेक उपस्थितांना आठवत असेल.

२००७ मध्ये सुरत येथे त्यांनी प्रतिष्ठेचे आय. पी. देसाई मेमोरियल लेक्चर दिले होते. मानवी इतिहास आणि मार्क्सवादी विचारसरणीच्या त्यांनी केलेल्या मूल्यमापनात्मक भाषणाची पुस्तक रूपातील छापील प्रत त्यांनी मला आठवणीने पाठवून दिली होती. ती संग्राह्य आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

यावर्षी मुंबई विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाने त्यांना प्रतिष्ठेच्या जी. एस. घुर्ये मेमोरियल लेक्चरसाठी आमंत्रित केले होते पण प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना उपस्थित राहता आले नसल्याने, विभागाने पर्यायी व्यवस्था केली.

ओघवते वक्तृत्व, इंग्रजी व हिंदीवरील प्रभुत्व, कोणत्याही विषयावर सहजपणे बोलण्याची विद्वत्ता व व्यासंग असे अनेक गुण त्यांच्या ठिकाणी होते. त्यामुळेच संशोधनात शॉर्टकट त्यांना अजिबात खपत नसे.

मी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात समाजशास्त्र अभ्यास मंडळाचा अध्यक्ष असताना धनागरे तज्ज्ञ सदस्य या नात्याने नेहमी मिटींगला येत. त्यानी केलेल्या अनेक मौलिक सूचना आजही माझ्या स्मरणात आहेत. मुळात त्यांच्या बरोबर काम करायला मिळाले हीच मोठी अभिमानाची गोष्ट आहे. तसेच समाजशास्त्र विभागातर्फे मी आयोजित केलेल्या संशोधक विद्यार्थ्यांच्या एका कार्यशाळेत प्रा. धनागरे बीजभाषक व प्रा. नीरा देसाई अध्यक्ष होत्या. त्यावेळी त्यांची झालेली भेट म्हणजे उच्च Acadamic Fraternity (अकादमिक बंधुभावाचा) सुखद अनुभव उपस्थितांनी घेतला.

सुमारे तीन वर्षांपूर्वी महाराष्ट्र टाइम्समध्ये रविवार आवृत्तीत 'राहून गेलेली गोष्ट' असे सदर असे. त्यात एका रविवारी धनागरे यांनी संस्कृत अध्ययन राहून गेल्याचे नमूद केले होते. योगायोगाने मीही तेव्हा पुण्यात होतो आणि फोनवरून लेखाविषयी बोललो कारण माझेही संस्कृतचे अध्ययन असेच खंडित झाले होते. तेव्हा त्यांनी मला घरी बोलावून त्यावर सविस्तर चर्चा तर केलीच पण आपण दोघेही समदु:खी असल्याचे जाणवून दिले. इथे मी अगदी अचंबित झालो ते ज्ञानप्राप्तीच्या क्षेत्रात त्यांनी लहानथोर हा भेद मला न जाणवू देता, जी जवळीक साधली त्यामुळे.

अलीकडच्या काही वर्षात त्यांची वारंवार भेट होत असे आणि प्रत्येक भेटीदरम्यान माझ्या घरची, कुटुंबियांची ते आस्थेवाईकपणे चौकशी करायचे. त्यात माझी पत्नी व माझे ज्येष्ठ बंधू यांचा नेहमीच उल्लेख होत असे. पत्नी समाजशास्त्राचीच प्राध्यापिका असल्याने व बंधू त्यांच्या कार्यकाळात विद्यापीठात अधिकारी पदावर काम करीत असल्याने आमचे असे दुहेरी संबंध निर्माण झाले होते. समाजशास्त्रावरील माझी अनेक पुस्तके मी त्यांना अभिप्रायासाठी देत असे. तेव्हा प्रत्येक वेळी पुढच्या लिखाणासाठी ते आग्रह धरत. ते आमच्याकरता एक प्रेरणास्थानच होते.

प्रा. धनागरे यांना कोल्हापूर, सांगलीत यायला खूप आवडत असे कारण इथे त्यांची नवी नाती निर्माण झाली होती आणि ती जपण्याचा व संवर्धित करण्याचा ते नेहमीच प्रयत्न करीत. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात समाजशास्त्राचा झालेला विकास व विस्तार त्यांना नेहमीच सुखावह वाटे. विशेषत: ग्रामीण भागातील ही प्रगती त्यांना नेहमीच खुणावत राहिली आहे.

त्यांच्याबरोबर अनेक परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळात हजर रहाण्याची संधी मला वारंवार मिळत गेली. अशा अनेक ठिकाणी शिवाजी विद्यापीठाविषयी ते खूप अभिमानाने बोलताना पहावयास मिळाले. अलीकडे तर त्यांनी अनेक ठिकाणी Shivaji University is doing well among all the universities in Maharashtra असे प्रशस्तिपत्र देताना मला ऐकायला मिळाले. हे ऐकताना जो आनंद होतो, तो वर्णनातीत असतो हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

अभ्यासक, संशोधक, मार्गदर्शक, लेखक, वक्ता, कर्तव्यनिष्ठ प्रशासक, प्रभावी कुलगुरू अशा अनेक रूपात धनागरेंना आपण ओळखतो पण त्याच बरोबर विद्यापीठ कायद्यातील एक तज्ज्ञ अशीही त्यांची ओळख चिरकाल स्मरणात राहील. नवा महाराष्ट्र विद्यापीठ कायदा अस्तित्वात येत असताना ते आपल्यात नसणार ही उणीव मात्र सतत अनेकांना जाणवत राहील. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू के. भोगीशयन यानी धनागरेंच्या विषयी 'दि ग्रेट व्हाइस चॅन्सलर' हे काढलेले गौरवोद्गार पुरेसे बोलके आहेत.

**– डॉ. विजय मारुलकर**
भ्रमणध्वनी : ९३७०६५५०००
mvijaychandra1949@gmail. com



# कविता आणि मी

## अनिल साबळे

### ऊर भरून फुंकर

मुलांनो,
अंगभर कागद गुंडाळून तुम्ही चालत गेलात
ही डांबरी सडक संपेपर्यंत
नदीला तर तुडुंब लाल पूर आहे
ओल्या पाठी थरथरून
गाईगुरं मुकाट चरत आहेत
गळ्यातलं कुजकं लोढणं सांभाळून
खाचरा खाचरातल्या गुडघाभर गाळातून
वाकलेली माणसं
भिजल्या डोळ्यांनी पाहात आहेत तुम्हालाच
हातात रोपांची मूठ धरून
पावलापावलाने जवळ येतेय
तुमच्या घरात पेटलेली चूल
आणि घरभर कोंदलेला ओलागच्च धूर
खोड धरून वर चढून जावं
आणि झोक्याची द्यावी घट्ट गाठ
असं निथळलेलं झाड तरी कोठे आहे?
झाडाखोडाची फांदी न् फांदी
शेवाळून गेलीय
हरणटोळांच्या सापांनी विळखे घातल्यासारखी
गोठ्यातल्या शेण तुडवणाऱ्या
वासराचे डोळे
तुमच्याच रोखाने
गरगर फिरतायत
तळव्यावरल्या भोवऱ्यासारखे...
हातभरून पसरलेली मेंदी ओलीचिंबच
राहील
ऊर भरून फुंकर कोणी घातलीच नाही तर...

### वाघानं चाटलंय तुझ्या लेकराचं रक्त

त्याचं मूल रडतंच
धावत्या वाघाच्या जबड्यात...
तो हार मानत नाही
वाघाचा मैलभर पाठलाग करताना
त्याच्या हातातली
चिंचा झोडणारी काठी
वाघाच्या जबड्यावर
मोडली पाहिजे...
मुलाचं रडणं थांबण्याआत
चिंचा झोडलेले तुझे हातपाय
दमत चालले
तरी तुला धावलं पाहिजे
वाघाला गाठलं पाहिजे
चिंचा वेचता .....वेचता
हे मूल चालायला शिकलंच
त्याला दफन करून कसं चालेल?
मित्रा,
तुझे पोटपाय स्थलांतर होणारे
म्हणून तर तुला हाकलून लावले
प्रत्येक आश्रमशाळेतून
आठव तो दिवस
ते म्हणाले होते
''सुट्टी असली म्हणजे
तुझ्या मुलाला
कोणत्या पत्त्यावर सोडायचं?''
अखेर तुझ्या पायांनी
वाघाला गाठलं
पण तुझ्या कमरेच्या लंगोटीने
कसं थांबेल रे
लेकराच्या गळ्यातलं रक्त
हे बघ मित्रा,
वाघानं चाटलंय तुझ्या
लेकराचं रक्त
दिवस चिंचा झोडण्यात गेला तरी
रात्र तुला पहाऱ्यात
घालवावी लागणार आहे

"मी एका शासकीय आश्रमशाळेत स्वयंपाकी म्हणून करतोय. उपाशी मुलं जेव्हा जेवणासाठी रिकामं ताट घेऊन आश्रमशाळेकडे येतात, तेव्हा हे रिकामं ताट म्हणजे माझ्यासाठी एक कोरा कागद असतो आणि पोटभर जेवण करून आश्रमशाळेच्या वर्गाकडे निघालेली मुलं ही माझी पूर्ण कविता असते. दुपारी आश्रमशाळेच्या भोवती फिरायला निघालं की अनेक आदिवासी माणसं भेटतात. गाईगुरांना वळणारी, कोयत्याने मोळ्या तोडणारी. त्यांच्या दुःखाचे अनेक प्रसंग मी कवितेत मांडण्याचा प्रयत्न करतो. आधुनिकीकरणात आदिवासी कुठे आहे...? खरं तर आधुनिकीकरण आदिवासी खेड्यात अजून कुठे आलंय? जिथं आधुनिकीकरण झालं तिथल्या आदिवासी माणसाला तिथून बाहेर निघावं लागलं."

**– अनिल साबळे**

भ्रमणध्वनी : ९५६१८९०४४४




# जगण्याची उर्मी जिवंत ठेवणारे 'कासव'

**संतोष पाठारे**

**श्या**मची आई नंतर मराठी चित्रपटाला सुवर्णकमळ मिळायला तब्बल पन्नास वर्ष जावी लागली. संदिप सावंतच्या 'श्वास'ने २००४ मध्ये मराठी चित्रपटसृष्टीला तिची चाकोरी मोडायला मदत केली. विनोद, नाचगाणी, अनावश्यक मेलोड्रामा या घटकांशिवायही मराठी चित्रपट लक्षणीय, प्रेक्षणीय बनू शकतो याचा वस्तुपाठ 'श्वास'ने घालून दिला. 'श्वास नंतर गेल्या तेरा वर्षात 'देऊळ', 'कोर्ट' आणि 'कासव' या मराठी चित्रपटांना सुवर्णकमळाने सन्मानित करण्यात आलं. आज अनेक मराठी दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ यांची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेलीय. गेल्या दशकात मराठी चित्रपट संख्येनेही वाढला. मात्र चांगल्या चित्रपटांची संख्या काही वाढली नाही. प्रशिक्षित दिग्दर्शक, आशयाच्या पातळीवर होणारे प्रयोग, तंत्रज्ञानात झालेली प्रगती यामुळे निश्चितच मराठी चित्रपट महाराष्ट्राबाहेरही लौकिक मिळवू लागलेत. अमराठी लोकांमध्ये मराठी चित्रपटांचं आदरमिश्रित कौतुक निर्माण झालंय. मराठीत होत असलेल्या मोजक्याच पण आशयघन चित्रपटांच्या निर्मितीला 'कासव'च्या सुवर्णकमळाने प्रशंसेची पोचपावती मिळाली आहे.

डिप्रेशन, नैराश्य हा आजार आहे की मनाची एक तात्पुरती अवस्था? एखाद्या व्यक्तीला नैराश्याने ग्रासलं की त्याला त्या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी औषधोपचाराची गरज असते का? नैराश्यामुळे आयुष्याला कंटाळलेली व्यक्ती पुन्हा एकदा उभारी घेऊन नव्याने आयुष्याला सामोरी जाऊ शकते का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न सुमित्रा भावे, सुनिल सुखथनकर यांनी त्यांच्या 'कासव' या आगामी चित्रपटात केलाय. त्यांच्या 'देवराई', 'अस्तु' या आधीच्या चित्रपटातून स्किझोफ्रेनिया, डिमेन्शिया यासारख्या मानसिक आजारांवर भाष्य केलं होतं, 'कासव'मुळे

ही मानसिक स्वास्थावरील त्यांची चित्रत्रयी पूर्ण झाली आहे. भावे-सुखथनकरांचे हे चित्रपट मानसिक आजारांबद्दल भाष्य करत असले तरीही ते या आजारांची लक्षणे व उपचारपद्धती सांगणारे माहितीपट नाहीत. संवेदनशील वृत्तीच्या पात्रांची गोष्ट सांगता सांगता दिग्दर्शक द्वयी दृकश्राव्य भाषेचा सुयोग्य उपयोग करत या आजाराबद्दल व त्याने ग्रासलेल्या व्यक्तीबद्दल सहानुभाव निर्माण करतात. 'कासव'देखील याला अपवाद नाही.

नैराश्याची भावना आपण सर्वचजण अधूनमधून अनुभवत असतो. आपल्या आसपासची परिस्थिती ही भावना निर्माणही करते व त्याच बरोबरीने त्याची तीव्रता कमी करण्यासही मदत करते. 'कासव'चा नायक मानव मात्र त्याच्या आसपासच्या माणसांमधून पार तुटलेला आहे. त्याचे कुटुंबीय, मित्रमैत्रिणी यांच्यापासून कायम दूर जावं किंबहुना या जगातूनच नाहीसं व्हावं इतक्या टोकाच्या निर्णयाला तो आलेला आहे. घरातून एका सॅकमध्ये जुजबी सामान घेऊन तो बाहेर पडलाय. मोबाईलचा चार्जर पुलावरून फेकून देऊन तो जणू काही आपल्या माणसांशी संपर्कच तोडून टाकतो. हाताच्या नसा कापून स्वतःचा अंत करून पाहतो. त्याच्या आयुष्याच्या या टप्प्यावर त्याला जानकी भेटते. जानकी कासवांच्या जीवनक्रमावर संशोधन करायला देवगडला चाललीय. तापाने फणफणलेल्या व रस्त्यावर बेवारस होऊन पडलेल्या मानवला ती तिच्याबरोबर देवगडला आणते. जानकीला मानवबद्दल सहानुभूती वाटण्यामागे तिचं एक वैयक्तिक कारण आहे. अमेरिकेत असलेला नवरा, तरुण मुलगा यांच्या बरोबर सुखासीन आयुष्य जगताना तिला आलेल्या एकटेपणाच्या अवस्थेतून ती बाहेर पडलीय. कासवांबरील प्रोजेक्टच्या निमित्ताने तिला जगण्याचं एक कारण मिळालंय. मानवच्या मनगटावरील जखमांवरून ती त्याची मनस्थिती ओळखते. मानवने नैराश्य झटकून जीवनाला सामोरं जावं यासाठी ती प्रयत्न करू लागते.

'कासव'चं कथानक जानकी व मानव या दोन व्यक्तिरेखांभोवती केंद्रित असलं तरीही जानकीचा रोखठोक वृत्तीचा नोकर यदू (किशोर कदम), एसटी स्टॅंडवर चहा विकणारा लहानगा निरागस छोकरा परश्या आणि मानवची सावत्र आई सुबेला (रेणुका दफ्तरदार) या व्यक्तिरेखा कथानकाला पूरक ठरतात.

कासव हे विपरीत परिस्थितीतही स्वतःतील जगण्याची उर्मी कायम ठेवण्याचं प्रतीक म्हणून चित्रपटात येतं. किनाऱ्यावर अंडी घालून कासवीण पुन्हा एकदा समुद्रात जाते. तिला आपल्या नवजात पिलांची काळजी असतेच पण ती त्या वातावरणात राहू शकत नाही. कासवाची पिलं स्वतःच अंडी फोडून बाहेर येतात आणि समुद्राकडे वाटचाल करतात. माणूस हा त्याच्या भावनिक गुंतवणुकीमुळे कासवापेक्षा वेगळा ठरतो. आपल्या माणसांकडून दुखावल्या गेलेल्या व्यक्तीला अनोळखी व्यक्तीकडून एम्पथी मिळाली तर तो निराशेच्या गर्तेतून बाहेर येऊ शकतो. आपल्या माणसाकडून मिळणाऱ्या निर्व्याज, निरपेक्ष मैत्री भावनेचं मोलं अधिक असतं. जानकीकडे मानवसाठी मातृत्वभाव आहे पण ती मानवची आई बनण्यापेक्षा मैत्रीण बनते. त्याला समजून घेता घेता स्वतःचं दुःखही त्याच्याशी शेअर करते. मानवची सोबत तिला तिच्या नैराश्यावर मात करण्यासाठी उपयोगी ठरते. जानकीचं समुपदेशन, औषधोपचार आणि जिव्हाळा यामुळे मानव पूर्वपदावर येतो. स्वतःपलिकडचं जग तो पाहू लागतो. आपला मार्ग आपणच शोधायचा असतो पण ही आत्मभावना जागृत करण्यासाठी एका चार्जरची गरज असतेच. मानवच्या बाबतीत जानकी चार्जरची भूमिका बठवते.

'कासव'ची सुरुवातीची संथ लय या चित्रपटाची जमेची बाजू ठरते. मानवची मनोवस्था उलगडून दाखवण्यासाठी तिचा योग्य वापर होतो. मानवचा सुरुवातीचा वेदनादायक हुंकार अखेरीस जानकीच्या गाण्यातील सूर होतो हे त्याच्या व्यक्तिरेखेतलं परिवर्तन लिखाणातून चांगलं उतरलंय पण ते पडद्यावर आलोक राजवाडेने अतिशय प्रभावी मांडलंय. नैराश्यग्रस्त तरुण ते जगण्याची आशा मिळालेला मानव हे रूपांतर आलोकच्या अभिनयातून अत्यंत नैसर्गिकपणे आलंय. इरावती हर्षेचं व्यक्तिमत्त्व जानकीच्या भूमिकेसाठी अगदी परफेक्ट आहे. तिच्या व्यक्तिरेखेतले विविध पदर तिने सहजतेने सादर केलेत.

धनंजय कुलकर्णींनी छायांकित केलेला देवगडचा परिसर आणि सायली खरेने गायलेली सुनिल सुकथनकरांची सूफी ढंगातली गीते कासवला अधिक परिपूर्ण करतात. कथानकाचे ठोकताळे बांधता येऊनसुद्धा प्रेक्षक 'कासव'मुळे अंतर्मुख होतात, आपल्या आयुष्यातील क्षणांना शोधतात हे कासवचं यश आहे.

अर्थात 'कासव'चे हे यश जेव्हा अधिकाधिक प्रेक्षक त्याचा आस्वाद घेतील तेव्हाच परिपूर्ण होईल.



**– संतोष पाठारे**

भ्रमणध्वनी : ९८२०३७४०९३

santosh_pathare1@yahoo.co.in


**'कासव'च्या निर्मितीत 'धर्मधुरीण' या 'ग्रंथाली' प्रकाशित पुस्तकाचे लेखक डॉ. प्रकाश लोथे यांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्याबद्दल त्यांचे 'ग्रंथाली' परिवारातर्फे अभिनंदन!**


ग्रंथाली




**बदक-नामा**

**मिलिंद पदकी**

'बदक-नामा'मधली कविता ही अशा अस्वस्थ वर्तमानाची कविता आहे. कवीच्या अमेरिकेतील वास्तव्यामुळे या वर्तमानाची मराठी कवितेला अपरिचित अशी समाजजीवनाची अनेक रूपं कवितेत साकारली आहेत.

मूल्य १०० रु.
सवलतीत ६० रु.



# गर्दीचा सिनेमा- व्हेंटिलेटर

**गणेश मतकरी**

गेल्या वर्षीच्या 'बाहुबली' आणि इतर व्यावसायिक चित्रपटांच्या वर्चस्वाचा अपवाद वगळला, तर अनेकदा पाहाण्यात येतं की राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारणारे चित्रपट सर्वसाधारण प्रेक्षकाना माहीतच नसतात. खासकरून मराठीबाबत हे फारच खरं आहे. याचं एक महत्वाचं कारण म्हणजे राष्ट्रीय पुरस्कारांची निवड ही बहुधा कलात्मक निकषांवर केली जाते आणि मराठी प्रेक्षकांना आशयघन, कलात्मक वळणाच्या, बहुधा गंभीर प्रकृतीच्या सिनेमाचं वावडं असल्याने याप्रकारचे बरेच चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी फार वेळ घेतात. कधीकधी तर ते प्रदर्शितच न होण्याचीही शक्यता असते. ते स्पर्धेत सहभागी असतात कारण बहुसंख्य (देशांतर्गत) चित्रपट महोत्सवांना पाठवताना चित्रपट सेन्सॉर करून घ्यावे लागतात आणि राष्ट्रीय पुरस्काराच्या पात्रतेत आदल्या वर्षी सेन्सॉर झालेले चित्रपट घेणं हा पात्रतेचा नियमच आहे. यंदाही सुवर्णकमळ मिळालेला 'कासव', तीन पुरस्कार मिळवलेला 'दशक्रिया' आणि एक पुरस्कार पटकवणारा 'सायकल' हे या प्रकारच्याच अजून लोकांसमोर न आलेल्या चित्रपटांमधे मोडतात, पण सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन (राजेश मापुसकर), संकलन (रामेश्वर) आणि ध्वनीपुनर्मुद्रण (आलोक दे) हे तीन महत्वाचे पुरस्कार पटकवणारा 'व्हेंटिलेटर' हा चित्रपट याला अपवाद आहे. 'व्हेंटिलेटर' हा व्यावसायिक चित्रपट आहे. त्यात आशयाला स्थान जरूर आहे, पण तो हलकाफुलका आहे, गांभीर्याबरोबर विनोदालाही त्यात जागा आहे. प्रियांका चोप्राची निर्मिती, 'झी'चं वितरण आणि प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद यामुळे त्याने नोटाबंदीशी काही प्रमाणात टक्कर देत बऱ्यापैकी व्यवसायही केल्याचं आपल्याला आठवत असेलच.

'व्हेंटिलेटर' हा राष्ट्रीय पुरस्कारविजेता ठरणं अपेक्षित आहे का? त्याला मिळालेले तिन्ही पुरस्कार हे केवळ मराठीपुरते नसून संपूर्ण भारतभरातल्या गेल्या वर्षीच्या चित्रपटांमधून निवडले गेले आहेत हे लक्षात घेतलं, तर हे थोडं चमत्कारिक जरूर वाटतं. पण ज्या तीन विभागांमधून तो निवडला गेलाय त्या विभागांत त्याची गुणवत्ता आहे का? तर जरूर आहे. केवळ दिग्दर्शनाबद्दलच बोलायचं, तर शंभराहून अधिक कलावंत असणारी ही फिल्म आहे आणि यातले बहुतेक प्रसंग हे अनेक कलावंताना एकाच वेळी पडद्यावर आणणारे आहेत. आता केवळ कलावंत अधिक असले म्हणजे दिग्दर्शन चांगलं का, तर निश्चितच नाही. मात्र असे प्रसंग कामचलाऊ न वाटता जिवंत करून दाखवणं यात दिग्दर्शकाची तंत्रावरली पकड दिसते हेदेखील खरं.

'व्हेंटिलेटर'चा विषय मी जेव्हा ऐकला तेव्हा मला 'डेनी आरकाँ' या दिग्दर्शकाच्या 'द बार्बेरीअन इन्वेजन्स' या परभाषिक चित्रपटाचा पुरस्कार पटकवलेल्या फ्रेंच कनेडीअन चित्रपटाची आठवण झाली. वडिलांबरोबर झालेला वाद बाजूला ठेवून मुलगा

आपल्या आजारी बापाला भेटायला जातो आणि पुढे त्यांच्यात एक संवाद कसा तयार होतो, याबद्दलचा हा गाजलेला चित्रपट. 'तो' आणि 'व्हेंटिलेटर' यांमधे फार साम्य नसलं, तरी हॉस्पिटलम धलं घडणं, बाप मुलाच्या नात्याचा विषय आणि गंभीर विषय मांडताना केलेली गंमतीदार मांडणी, या गोष्टी दोन्हीकडे आहेत. 'व्हेंटिलेटर'चा विशेष वेगळेपणा आहे तो त्याच्या पात्रसंख्या आणि पात्रयोजनेत. 'व्हेंटिलेटर'मधलं कामेरकर कुटुंब प्रचंड मोठं आहे आणि गजाकाका व्हेंटिलेटरवर आहेत असं कळताक्षणी गावापासून शहरापर्यंत सगळीकडूनच नातेवाईक जमा होतात. सर्वांना गजाकाकाची काळजी तर असते, पण काहींचा हेतू वेगळा, स्वार्थी असतो.

'व्हेंटिलेटर'मध्ये बाप मुलाच्या दोन जोड्या आहेत. गजाकाका आणि त्यांचा मुलगा प्रसन्ना (जितेंद्र जोशी) ही एक जोडी, तर गजाकाकाचे बंधू, भाऊ (सतीश आळेकर) आणि त्याचा मुलगा राजा (आशुतोष गोवारीकर) ही दुसरी. या दोन जोड्या आणि नातेवाईकांचा गदारोळ या सगळ्यामधून 'व्हेंटिलेटर' आकार घेतो.

मला स्वत:ला हे अधिक पटलं असतं, की दोन जोड्यांऐवजी इथे एकच जोडी दिसली असती, तीही आजारी बाप आणि वादानंतर घर सोडलेला मुलगा ही, कारण या दोघांमधला परभाव नष्ट होणं हा चित्रपटातला महत्वाचा भाग आहे. आता त्याऐवजी काय होतं, तर त्या मूळ जोडीतला बाप शुद्धीतच नसल्याने गजाकाका आणि प्रसन्ना यांच्यातला संवाद अपुरा रहातो आणि जवळजवळ तेच नातं भाऊ आणि राजा या जोडीचा आधार घेत नव्याने मांडलं जातं. या विचित्र रचनेने चित्रपटाचा शेवटही फार समाधान देत नाही. प्रसन्ना, राजा आणि भाऊ या तिन्ही व्यक्तिरेखा स्वतंत्रपणे चांगल्या उभ्या राहूनही.

दिग्दर्शकाला मोठे ग्रुप्स हाताळण्याची चांगली जाण असून आणि चित्रपटातले बरेच नवे-जुने चांगले कलावंत असूनही 'व्हेंटिलेटर' चित्रपटाचा विशेष आणि उणीवही, या नातेवाईकांची प्रचंड संख्या हीच आहे. कौटुंबिक नात्यातले उतार-चढाव, बेबनाव दाखवणं ही कल्पना चांगली आहे. व्यक्तिरेखांमधे विविधताही आहे. त्यामुळे काही काळ करमणूक होतेही, पण ही संख्या इतकी प्रचंड प्रमाणात आहे, की त्यातले काही मोजके लोक सोडले तर हे कुटुंबातलं कोण कोणाचं आहे हेच कळेनासं होतं. काहीजण ठळकपणे समोर येतात तर उरलेले गर्दीचा भाग होऊन जातात. मध्यंतरापूर्वीचे बरेच प्रसंग लहान-लहान, वेगवेगळ्या व्यक्तिरेखांमधून बांधलेले आहे. ते करमणूक करतात पण कुटुंबाचं एकसंध रूप आपल्यासमोर ठेवू शकत नाही. दिलेला वेळ या प्रकारच्या रिअलिस्टीक अपेक्षांसाठी पुरणंच शक्य नाही.

'व्हेंटिलेटर'चं एका बाबतीत मात्र कौतुक करण्यासारखं आहे आणि ते म्हणजे कास्टिंग. रोहन मापुसकरचं कास्टिंग हा या चित्रपटाच्या यशातला अर्धा भाग आहे. लहान मोठ्या कामांना इतके चांगले, आणि चपखल बसणारे लोक उपलब्ध करून देणं हे सोपं नाही. कास्टिंग ही एकेकाळी दुर्लक्षित शाखा आता दिवसेंदिवस अधिक महत्त्वाची ठरतेय, त्याचच हे उदाहरण म्हणता येईल.

'व्हेंटिलेटर' मला चित्रपट म्हणून सरासरीपेक्षा उजवा वाटला, पण त्याने माझं पूर्ण समाधान केलं नाही. अर्थात आपली वैयक्तिक मतं काहीही असली, तरी राष्ट्रीय पुरस्कारात ज्युरी कोण आहे याचाही पुरस्कारांच्या निवडीत मोठा हात असतोच. ही ज्युरी व्यवसायाशी संबंधित लोकांमधून निवडलेली असते आणि त्यांच्या वैयक्तिक जाणिवा, संवेदनशीलता, आवडनिवड याचा अंतिम निकालाशी कायम संबंध असतो. प्रियदर्शनसारखा गर्दीचे सिनेमे करणारा दिग्दर्शक या ज्युरीच्या प्रमुखपदी असल्याने अशी फिल्म करण्यातला तंत्राचा अवघड भाग त्याच्या लक्षात येऊन त्याचा उचित सन्मान त्याला करावासा वाटणं सहाजिकच आहे. तरीही, सर्वोत्कृष्ट चित्रपट निवडताना या ज्युरीने 'कासव'सारखा आशयाला महत्त्व देणारा चित्रपट निवडावा, याला ज्युरीच्या नि:पक्षपातीपणाची खूण मानणं सहज शक्य आहे.



**– गणेश मतकरी**

भ्रमणध्वनी : ९८२०२४३७७८

ganesh.matkari@gmail.com



ग्रंथाली



महाभारतातील काही प्रसंग :

**विवेचन व रसग्रहण**

खंड २

**अरुण जातेगांवकर**

**वासंती जातेगांवकर**

कौरव-पांडवांचे द्यूत आणि दुर्योधन वध ह्या प्रसंगांवरचे लेख लेखकांनी वाचकांसमोर ठेवले आहेत.

मूल्य २५० रु.

सवलतीत १५० रु.

**पाऊलखुणा कवितेच्या...**

**शोभा मांगले**

या कवितासंग्रहात मानवी जीवनाबद्दल आशावादी कविता आहेतच पण श्रद्धा, अंधश्रद्धा, धर्मकांड, देवभोळेपण, सत्तेचं राजकारण, स्त्री शक्तीवरील अन्याय अशा अनेक सामाजिक भान जपणाऱ्या प्रगतीवादी कविताही आहेत.

– नितीन तेंडुलकर



मूल्य १२५ रु.

सवलतीत ७५ रु.




# 'दशक्रिया'च्या निमित्ताने

डॉ. प्रसाद भिडे

प्रत्येक कलाविष्काराच्या माध्यमातून कलावंत मूलत: स्वत:ला जोखून पाहत असतो. ही काही घड्याळी तासांवर चालणारी प्रक्रिया नसते. कलावंताचं काम निरंतर सुरू असतं. इतर 'उत्पादनांप्रमाणे' ते जगाला सतत दिसत मात्र नाही. अशा वेळी, करत असलेल्या कामासाठी पुरस्काराचा 'पुरावा' तयार झाला की कलावंत करत असलेल्या कामाला आपोआप एक अधिष्ठान/लौकिक ओळख मिळते. म्हणून, पुरस्कार मिळणे ही एका अर्थाने कलाक्षेत्रात एक आवश्यक आणि पोषक ठरणारी गोष्ट आहे. यंदा, मराठी चित्रपटसृष्टीला पुरस्कारांचा घसघशीत खुराक मिळाला आहे. 'दशक्रिया' हा संजय कृष्णाजी पाटील यांची पटकथा आणि संवाद असलेला संदीप पाटील दिग्दर्शित चित्रपट यंदा राष्ट्रीय पुरस्काराचा मानकरी ठरला आहे. दशक्रिया' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट, सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता (मनोज जोशी), सर्वोत्कृष्ट पटकथा लेखन (संजय कृष्णाजी पाटील) असे तीन पुरस्कार जाहीर झाले. याचा चित्रपटाचा दिग्दर्शक संदीप पाटील याला महाविद्यालयीन जीवनापासून एकांकिका, संस्कृत नाटक, शॉर्ट फिल्म्स, दिग्दर्शकांकडे उमेदवारी अशा वेगवेगळ्या परिघात पाहत आलोय. या राष्ट्रीय पुरस्कारांच्या निमित्ताने मुद्दाम त्याची मुलाखत घ्यायचा योग साधला.

**प्रश्न :** संदीप, एखादा पुरस्कार मिळाला की, संबंधित कलावंताचं नाव एकदम चर्चेत येतं. पण त्यापूर्वीही त्या कलावंतानं बरंच काम केलेलं असतं. दशक्रिया तर लोक पाहतीलच. पण त्यापूर्वीचं तुझं काम काय?

**उत्तर :** गजेंद्र अहिरेंकडे मी सहाय्यक दिग्दर्शक म्हणून गेली काही वर्षं काम करतोच आहे. 'नॉट ओन्ली मिसेस राऊत' हा प्रेक्षक आणि समीक्षकांनी वाखाणलेला चित्रपट. त्याच्या दिग्दर्शनसहाय्यात माझा सहभाग होता. 'मुलखावेगळा सखाराम' या शीर्षकाचं कमलाकर सारंगांनी लिहिलेलं पुस्तक आहे. त्यावर मी डॉक्युमेंटरी फिल्म केली. त्यासाठी 'सखाराम बाईंडर'चे लेखक स्वत: विजय तेंडुलकर, निळू फुले यांना कॅमेराच्या माध्यमातून बोलतं केलं. 'दशक्रिया'पूर्वी मी 'असोसिएट डायरेक्टर' म्हणून 'अ डॉट कॉम मॉम' नावाचा चित्रपट केला. त्यानिमित्त अमेरिकेत गेलो. अमेरिकेत या सिनेमाचं कौतुक झालं.

**प्रश्न :** थोडक्यात पुरस्कारांशी तुझं नातं सुरुवातीपासून आहे. दशक्रियाच्या रूपात तुला स्वतंत्र ओळख मिळतेय. 'दशक्रिया'बाबत काय सांगशील?

**उत्तर :** 'दशक्रिया' ही मूळची बाबा भांड यांची कादंबरी आहे. 'जीवन, मरण आणि पोट' हा या कादंबरीचा गाभा आहे. मनुष्य निवर्तल्यानंतर जी धार्मिक कार्ये केली जातात त्यात मृत्यूनंतर दहाव्या दिवशी एक विधी केला जातो. तो विधी का करतात तर मोक्ष मिळावा म्हणून! पण 'मोक्ष' म्हणजे नक्की काय? याची

प्रत्येकाने त्याच्या त्याच्या समजुतीनुसार उत्तरं दिली आहेत किंवा या प्रश्नाचं उत्तर अजून कुणालाच देता आलं नाहीय. मोक्ष मिळतो म्हणजे नक्की काय होतं? तो कधी मिळतो? मुळात मोक्ष मिळतो का? ही अंधश्रद्धा म्हणायची की एक मूलभूत भावना? असे कितीतरी प्रश्न या विषयाच्या निमित्ताने मनात पिंगा घालत होते. त्या प्रश्नांचा मागोवा घेणारा चित्रपट म्हणजे दशक्रिया. कादंबरीचा गाभा हरवू न देता आम्ही आम्हाला अनुकूल अशी पटकथा त्यासाठी लिहिली. विषय तसा गुंतागुंतीचा, लोकांच्या भावनांशी संबंधित असल्याने, चित्रपट या माध्यमातून तो पोहोचवत असताना काळजी घ्यावी लागते. तो कुठेही 'प्रिचिंग' होता कामा नये, एखाद्याच्या भावना दुखावणारा ठरू नये आणि त्याचवेळी काही एक भाष्य चित्रभाषेद्वारे करणारा असला पाहिजे. अशा वेगवेगळ्या कंगोऱ्यांचा विचार करावा लागतो. तो विचार करून 'दशक्रिया घडवला' आहे.

**प्रश्न :** अशा पद्धतीचा चित्रपट केला की तो सामान्य प्रेक्षकांच्या आधी फेस्टिव्हल्स आणि समीक्षकांपर्यंत पोहोचतो. त्यात राष्ट्रीय पुरस्कार वगैरे मिळाला की त्याचं समीक्षण लगेच आंतरराष्ट्रीय चित्रपट, परदेशी दिग्दर्शकांच्या शैली इत्यादी परिप्रेक्ष्यात केलं जातं. याबाबत तुझं काय म्हणणं?

**उत्तर :** प्रत्येक चित्रपट 'स्वतंत्र' असतो. आता इराणी चित्रपट दिग्दर्शक माजिद माजिदीचा चित्रपट जर आपण पाहिला तर तो आपल्याला इराणच्या दैनंदिन जीवनातील एखादी छोटीशी गोष्ट उलगडून दाखवतो. तिथल्या माणसाच्या मनातली बोच व्यक्त करतो. त्याचवेळी सौंदर्यही दाखवतो. त्याचा चित्रपट स्थानिक असूनही त्याचा गाभा मात्र वैश्विक असतो. त्या अर्थाने, तो चित्रपट 'परदेशी' नसतोच. तसा आपला चित्रपटही काहीतरी 'स्वतंत्र' अस्तित्व असलेला असूच शकतो. त्याचा परीघ काय ते कळलं पाहिजे किंवा दाखवता आलं पाहिजे. मी तर म्हणेन, माजिदी ज्या प्रकारचे विषय हाताळतो तसे कितीतरी विषय आपल्याकडे आहेत. पण आपली विषय हाताळण्याची शैली वेगळी असते. आपल्याकडे मनोरंजनाचं मूल्य थोडे अधिक आहे. त्यामुळे गाणी, झालंच तर विनोद यांचं गार्निशिंग असावं लागते. प्रसंगी या बाबी न टाळता येण्यासारख्या असतात. समीक्षण करताना या बाबींचा विचारही महत्त्वाचा असतोच. आपल्याकडे विषय चांगला असतो फक्त आपण तो मांडण्याच्या शैलीत कुठेतरी वेगळे होतो. त्यामुळे तुलनाच करायची झाली तर आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या चित्रपटांसारखेच सशक्त विषय आपल्याकडे आहेत. ते तशा प्रकारे पोहोचवताना काही बंधनं येतात हे मात्र खरं!

**प्रश्न :** तुझा रोख 'कमर्शियल सिनेमा' किंवा चित्रपटाच्या अर्थशास्त्राकडे आहे. एकीकडे प्रतिभा, कला किंवा विचारांशी एकनिष्ठता आणि त्या पद्धतीने व्यक्त होणं असतं आणि दुसरीकडे 'मार्केट', 'डिमांड' हे घटक असतात. या दोन्हीचा मेळ घालता येतो?

**उत्तर :** मराठी रसिक सुजाण आहे. तुम्ही बघा, मराठी रसिक मार्केटची गणितं मांडून केलेल्या गल्लाभरू चित्रपटांपेक्षा, आशयघन, समाजावर किंवा माणसावर थेट भाष्य करणारा, ज्यात उत्तम पटकथा बांधून एखादा गंभीर विषय मांडलाय असा चित्रपट उचलून धरतातच. असा चित्रपट फेस्टिव्हल्समध्ये तर गाजतोच पण बॉक्स ऑफिसवर सुद्धा हिट होतो. चित्रपट चांगला असेल तर तो चालतोच. फक्त तो प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला हवा.

**प्रश्न :** मग आता 'दशक्रिया'च्या वितरणाचं काय करणार आहात?

**उत्तर :** महाराष्ट्रात जे दोन-तीन चांगले वितरक आहेत त्यांना आम्ही चित्रपट दाखवणार आहोत. झी, कलर्स, स्टार प्रवाह ह्यांची वितरणव्यवस्था उत्तम आहे. 'श्वास', 'फँड्री', 'किल्ला' हे चित्रपट व्यावसायिकदृष्ट्या सुद्धा यशस्वी ठरले कारण त्यांचं वितरण चांगलं झालं. चांगला चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचला तर मराठी रसिक त्याला उत्तम प्रतिसाद देतात.

**– डॉ. प्रसाद भिडे**
भ्रमणध्वनी : ९०२९९५०००१
prasadrbhide@gmail.com

## 'एक कवी, दोन भाष्यकार'

### ज्येष्ठ कवी श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांच्या समग्र काव्यप्रवासाचा आढावा घेणारा कार्यक्रम

'मराठी कवितेला नेमके वळण आणि परिणामकारक बळ' पुरवणारे कवी म्हणून ज्ञात असलेले ज्येष्ठ कवी श्रीपाद भालचंद्र जोशी ह्यांच्या ग्रंथाली, मुंबईने प्रकाशित केलेल्या 'सळाळ आणि सळाळनंतर...', 'समायत', 'मथितार्थ' आणि 'इत्यादि' या चारही कवितासंग्रहातून विखुरलेल्या त्यांच्या ४५ वर्षांहून अधिक काळापासून सातत्याने चाललेल्या काव्यप्रवासाचा समीक्षात्मक आढावा घेणारा, 'एक कवी, दोन समीक्षक' हा कार्यक्रम ग्रंथाली, मुंबई आणि प्रगतिशील लेखक संघ, औरंगाबाद ह्यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ६ मे रोजी सायं ६.३० वा. सन्मित्र कॉलनीस्थित मराठवाडा साहित्य परिषदेच्या नांदापूरकर सभागृहात आयोजिण्यात आला आहे. प्रख्यात ज्येष्ठ समीक्षक, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे एक पूर्वाध्यक्ष, डॉ सुधीर रसाळ व ज्येष्ठ समीक्षक व संपादक प्रा. प्रभाकर बागले हे या संग्रहावर भाष्य करतील. कवी श्रीपाद भालचंद्र जोशी या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समाधान इंगळे करतील. कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि प्रगतिशील लेखक संघ, औरंगाबादचे अध्यक्ष डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले आहे.

# बॉम्बे आर्ट सोसायटी - शतकोत्तरी रौप्यमहोत्सवी प्रदर्शन



महेंद्र दामले

**१० फेब्रुवारी २०१७ पासून मुंबईच्या मॉडर्न आर्ट गॅलरीत (शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयासमोर) बॉम्बे आर्ट सोसायटीचे रौप्यमहोत्सवी प्रदर्शन सुरू आहे. भारतीय कलेला बहुमूल्य योगदान देणाऱ्या कलाकृती इथे पाहायला मिळतील. स्वत:ला मुंबईकर म्हणवणाऱ्या सर्वांनी हे प्रदर्शन जरूर पाहिले पाहिजे.**


मुंबईच्या धावपळीत आपल्याला वेळ कुठे आहे हे जाणून घ्यायला की आपल्या शहराच्या नावाने एक संस्था आहे, जी कलेचा विकास, प्रोत्साहन याकरता स्थापन केली गेली. आपण आपल्या मुंबई शहराबद्दल राजकीय जाणिवांतून तयार झालेल्या वृत्तीतून अभिमान वगैरे बाळगतो पण आपण किती संस्थांना मुंबई वरून नाव देतो? किती वेळा शहराचा आणि त्यातील माणसे, त्याचं जीवन, संस्कृती याबर एकसंधपणे, एकत्रितपणे विचार करतो? त्यामुळे शहरात एक कलासंस्था जी शहराच्या एका विशिष्ट कलेचं संवर्धन करेल, अशा नगराची मांडणी, कल्पना आपण करत नाही.

बॉम्बे आर्ट सोसायटी, स्वातंत्र्यपूर्व काळात, १८८८ साली डिसेंबर महिन्यात, मुंबई शहरात स्थापन झाली. ज्या शहरात ती स्थापन झाली त्यावरून संस्थेला नाव मिळाले. तरी काळाच्या ओघात तिचा परिणाम पूर्ण भारतभरातील कलाक्षेत्रात दिसू लागला. सोसायटीच्या वार्षिक प्रदर्शनात कलाकृती प्रदर्शित होणे, त्याला पदक किंवा पारितोषिक मिळणे कलाकारांमध्ये मानाचे मानले जाऊ लागले.

चित्रकारांना, चित्रकलेला प्रोत्साहन देणे म्हणजे काय? असा प्रश्न विचारल्यास, त्यांना प्रदर्शन भरवण्यास जागा देणे, त्यांची चित्र विकत घेणे, त्या प्रदर्शनाबद्दल लेख वगैरे लिहून आणणे आणि त्यासंबंधी एक जाणीव समाजात निर्माण करणे अशा गोष्टी त्या प्रश्नांची उत्तरे म्हणून लगेच मनात येतील. बॉम्बे आर्ट सोसायटी स्थापना करताना, भारतात त्याकाळी जे ब्रिटिश नागरिक राहात होते व एक हौस म्हणून चित्र रंगवायला शिकले होते त्यांना प्रोत्साहन देणे हा हेतू होता

त्याचवेळी १८५७ साली, सर ज.जी. कलामहाविद्यालय स्थापन झाले होते. त्यात शिकून तयार झालेल्या चित्रकारांना, त्यांची कला प्रदर्शित करण्यासाठी, त्यांच्या कलेला प्रोत्साहन देण्यास 'बॉम्बे आर्ट सोसायटी' ही संस्था स्थापन केली गेली. स्थापना झाल्यानंतर दोन महिन्यांनी १८८९ मध्ये पहिले प्रदर्शन भरवले गेले. अशा प्रकारे प्रदर्शन भरवणे ही पाश्चिमात्य रूढी होय. त्याच प्रकारे 'बॉम्बे आर्ट सोसायटी'ही प्रदर्शन भरवू लागली. दर वर्षी अशा प्रकारचे प्रदर्शन सोसायटी आयोजित करते. हे प्रदर्शन काळाच्या ओघात एक 'कला उत्सव' झाले आहे. या प्रदर्शनात पारितोषिक मिळणे म्हणजे आपल्यातील कलाप्रतिभेवर शिक्कामोर्तब असे कलावंत मानू लागले.

१० फेब्रुवारी २०१७ रोजी मुंबईच्या राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालयात सुरू झालेले प्रदर्शन, हे एकशेपंचविसावे प्रदर्शन आहे. एकशेपंचवीस प्रदर्शनांची ही परंपरा अतूट असणे, ही एक अभिमानाची गोष्ट आहे व त्यासाठी आत्तापर्यंत 'बॉम्बे आर्ट सोसायटी'च्या विकासासाठी झटलेल्या सर्व व्यक्तींचे आभार मानायला हवेत. एकशेपंचविसावे प्रदर्शन हे विशेष आहे. या प्रदर्शनाचे क्युरेटर चित्रकार सुहास बहुलकर आहेत. त्यांनी गेल्या १२५ वर्षातील वार्षिक प्रदर्शनातील, सुवर्ण पदक, रौप्य पदक, तसेच गव्हर्नर पारितोषिक प्राप्त कलाकृतींची एक विस्तारित मांडणी केली आहे. याखेरीज भारतीय कलेला बहुमूल्य योगदान देणाऱ्या, पण बॉम्बे आर्ट सोसायटीचे सुवर्ण पदक न मिळालेल्या चित्रकारांच्या कलाकृतीही इथे पाहायला मिळतील. हा एक आगळा सोहळा आहे.



सुहास बहुलकर
'In Search of Identity',
Oil on Canvas,
एस.एम. डहाणूकर प्राइझ, १९८९

कला प्रदर्शन हे नुसते 'कलाकृतींची मांडणी' इतकेच मर्यादित नसते. त्यामध्ये, समकालीन कला प्रवाहातील विचारधारा त्यातील ताण, संघर्ष, याचे प्रतिबिंब पडत असते.म्हणजे अगदी त्या काळीपण ब्रिटिश आणि भारतीय चित्रकार यांचे वेगळे दालन होते इत्यादी. याच प्रकारे मग चित्रप्रकार, शैली, विषय इत्यादीनुसार 'सोसायटी पारितोषिक' द्यायला सुरुवात झाली कारण पाश्चात्य कलेमधील कलासंस्थांमध्ये त्या कोणत्या कला मूल्यांवर विश्वास बाळगतात, त्या मूल्यांमध्ये काय बदल होत आहेत हे सर्व प्रदर्शनांतून कळायचे. चित्रकार त्यानुसार आपल्या कलानिर्मितीला वळण देणे किंवा कला मूल्यांबद्दल चर्चा वाद करणे इत्यादी गोष्टी करत असत. 'बॉम्बे आर्ट सोसायटी'ने कधीही त्यांची कलाविषयक भूमिका निश्चितपणे मांडली नाही तरी, प्रदर्शनासाठी केलेली निवड आणि पारितोषिक प्राप्त कलाकृती यातून मुंबई आणि भारतातील कला वातावरणात काय बदल घडत गेले ते समजू शकते.

त्याचा आजच्या, मुंबई, महाराष्ट्रातील कला विद्यार्थ्यांसाठी, (कलाविद्यार्थी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी) रसिकांसाठी स्वतःची जागा या कलाजगतामधे निश्चित करताना, आपली परंपरा जाणून घेण्यासाठी एक आरसा उपलब्ध होऊ शकतो. या प्रदर्शनासोबत बहुलकर बहू प्रयत्नांती 'बॉम्बे आर्ट सोसायटी'च्या १२७ वर्षांच्या इतिहासावर लिहीत असलेल्या पुस्तकाचा पहिला भाग या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी फेब्रुवारी महिन्यात प्रकाशित झाला. त्याचा दुसरा भाग आणि दोन्ही भागांची इंग्रजी आवृत्तीही यथावकाश प्रकाशित होईल. प्रदर्शन व पुस्तक, या दोन्ही गोष्टी मुंबई कलाजगतातील प्रवाह जाणून घेण्यास अभ्यास करू इच्छिणाऱ्या सर्वांना मदत करतील. या पुस्तकातून बॉम्बे आर्ट सोसायटीची स्थापना कशी एका सहज हेतूने झाली, मग वार्षिक कला प्रदर्शन, पारितोषिके, त्यांची मूल्य, त्यांचे आश्रयदाते, इथपासून पासून ते बेंद्रे-हुसेन शिष्यवृत्ती इथपर्यंत कशा गोष्टी घडत गेल्या ते पाहणे खूप गंमतीचे आहे.

सर ज. जी. कला महाविद्यालय आणि बॉम्बे आर्ट सोसायटी या दोन संस्थांमध्ये एक अलिखित संबंध आहे. जे.जे.मध्ये शिकून जे विद्यार्थी कला जगतात कलाकार होऊ इच्छितात, ते बॉम्बे आर्ट सोसायटीच्या वार्षिक प्रदर्शनात कलाकृती प्रदर्शित व्हावी अशी इच्छा गेली कित्येक पिढ्या बाळगत आहेत आणि त्याच वेळेला जे.जे.मधील शिक्षक, तसेच जे.जे.मधील शिक्षित कलाकार यांना प्रदर्शनातील कलाकृती निवडीसाठी 'बॉम्बे आर्ट सोसायटी'कडून आमंत्रित केले जायचे. परिणामी जे.जे.मधील चित्र, कलाविषयक कल्पना, त्यातील स्थित्यंतरे यांचे पडसाद 'बॉम्बे आर्ट सोसायटी'च्या प्रदर्शनात नेहमीच पडत आले आहेत.

जे.जे. स्थापन झाल्यापासून, युरोपियन कलाशैली आपल्याकडे शिक्षणातून रीतसर पसरली. काळाच्या ओघात त्यातील अनेक स्थित्यंतरे आपल्या शिक्षणाचा भाग बनली. त्यात निओ क्लासिझम, रोमँटिसिझम, इम्प्रेशनिझम, क्युबिझम, जर्मन एक्सप्रेशनिझम, अमेरिकन ॲबस्ट्रॅक्ट एक्सप्रेशनिझम अशा कित्येक कलाप्रणालींचा अंतर्भाव होतो. एकीकडे आपण या प्रणाली आत्मसात करत होतो, आणि त्याच वेळी आपण आपली भारतीय ओळखही शोधू पाहात होतो.

आपण भारतीय लघुचित्रांवर आधारित कलाकृती किंवा लघुचित्रांतील जलरंग आणि निओक्लासिझममधील रेखाटनं यांच्या मिश्रणातून कलाकृती, शैली विकसित करू इच्छित होतो, या प्रमुख दोन प्रवाहांचे प्रतिबिंब या प्रदर्शनात आपल्याला दिसेल. याखेरीज भारतीय व पाश्चात्य दृष्टींचे मिश्रण करून चित्र करणारी चित्रकार अमृता शेरगील, किंवा जे.जे.मधील अकॅडेमिक शिक्षणाला विरोध करून चित्रनिर्मिती करणाऱ्या प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुपमधील चित्रकारांची चित्रंही या प्रदर्शनात पाहायला मिळतील म्हणूनच 'बॉम्बे आर्ट सोसायटी'चा इतिहास हा आपल्या कला जाणिवांचा, त्याच्या विकासाचा, त्यातील बदलांचा इतिहास ठरतो. हे प्रदर्शन हा या इतिहासाला जोडून ठेवणारा एक सोनेरी क्षण आहे. त्या क्षणाला निश्चितच जपले पाहिजे. स्वतःला मुंबईकर म्हणवणाऱ्या सर्वांनी हे प्रदर्शन जरूर पाहिले पाहिजे.

या सर्व इतिहासाला पाहणे, समजून घेणे, बहू अंगानी त्याकडे पाहण्याची दृष्टी प्राप्त करून घेणे या दृष्टीने कलाक्षेत्रातील अनेक मान्यवर चित्रकार, लेखक, कवी, नाट्य आणि सिनेअभ्यासक, समीक्षक यांना आमंत्रित करून 'बॉम्बे आर्ट सोसायटी'ने चर्चा घडवून आणल्या. या चर्चांमधील विचारांच्या आदानप्रदानाने आणि एकूणच या प्रदर्शनाने मुंबईतील कला वातावरणात एक संजीवनी आणली आहे.

– **महेंद्र दामले**
mahendradamle@gmail.com



# बॉब डिलन

राहुल बनसोडे

साहित्यातल्या नोबेल पुरस्काराने सन्मानित झालेल्या बॉब डिलनच्या कार्याची सुरुवात १९६१ सालापासून होते. इतिहासाच्या फक्त सनावळ्यांच्या नजरेतून पाहिले तर हे नुसतेच एक वर्ष असल्यासारखे भासेल पण आधुनिक जगाच्या एकूण मानसिकतेच्या आणि त्या मानसिकतेतून घडलेल्या चांगल्या वाईट बदलांची सुरुवात ही १९६० च्या दशकात अमेरिकेच्या सॅनफ्रान्सिस्को ह्या समुद्रकिनाऱ्यावर वसलेल्या शहरात झाली. या दरम्यान महासत्तेने प्रस्थापित केलेल्या मूल्यांमुळे होणाऱ्या मानसिक घुसमटीला प्रतिक्रिया म्हणून अमेरिकेत निरनिराळ्या ठिकाणी तरुण निरनिराळी विचारमंथने करीत होते.

हे दिवस मोबाईल इंटरनेटच्या खूप आधीचे आणि केबल टिव्हीचे प्रस्थ सुरु होण्याच्याही खूप आधीचे आहेत. माणसाला वेळ घालवायला आणि मेंदूला खाद्य पुरवायला इतर माणसांची प्रचंड गरज असे आणि त्यातून अमेरिकेत 'कट्टा संस्कृती' जन्माला आली. ह्या कट्ट्यावर शाळा कॉलेजात जाणारी तरुण मुले-मुली तासन्तास बसून रहात आणि कथा, कविता, संगीत ह्यातून आपल्या सृजनाला वाट मिळवून देत. ही मुले तरुण होती त्यामुळे त्यांच्या कवितांतून एकूणच सामाजिक विद्रोह आणि व्यवस्थेला विरोध असणे सहाजिक होते. अनेक विद्रोही कविता लिहिल्या जात होत्या पण त्यांचे स्वरूप आपापल्या कट्ट्यांपुरते मर्यादित होते. संगीतातले फ्रँक सिनात्राचे क्लासिक युग मागे पडून त्यात आता नवनवे प्रयोग आणि परिवर्तने होत होती. दरम्यान जगातली दुसरी महासत्ता रशिया ही युरोप आणि त्याला खेटून असणाऱ्या देशांशी व्यापार संपर्क रहावा म्हणून निरनिराळे आंतरराष्ट्रीय महामार्ग बांधत होती. हे प्रकल्प जसजसे पूर्ण होत होते तसतशी अनेक राष्ट्रे एकमेकांशी जोडली जात होती आणि त्यांच्या तरुण पिढ्यांमध्ये सांस्कतिक आदानप्रदान होत होते. एकमेकांच्या संस्कृतीबद्दल जाणून घेताना 'राष्ट्रवाद' ही किती संकुचित भावना आहे हे अनेक तरुणांना कळायला लागले. दोन महायुद्धांतून सावरल्यानंतर जगात आता बरीचशी शांतता आलेली होती आणि अशा शांततेत मुक्त विचार, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि सीमारेषांचे अर्थ पुसून काढणारे आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान व त्याला अनुकूल अशा साहित्याची निर्मिती होऊ लागली. दरम्यान मानववंशशास्त्रज्ञांनी लावलेले विविध शोध 'माणुसकी'ची व्याख्या वेगाने अपडेट करित होते. ह्या नवख्या ऊर्जेने आणि तरुणाईच्या उमेदीने भारलेल्या नव्या वातावरणात अनेक सृजनकारांना पुढे आणले त्यातलेच बॉब डिलन हे एक होत.

बॉब डिलनविषयी लिहिण्यासाठी जगातला कुठलाही कळीचा लेखक एका पायावर तयार असतो. किंबहुना बॉब डिलनचे मोठेपण सांगताना ते नेमक्या शब्दात मांडून आपल्या लिखाणाची पातळी जोखणारेही अनेक लोक आहेत. बॉबविषयी भरभरून लिहिताना तो सर्वोच्च दर्जाचा कवी, गायक आणि संगीतकार असल्याच्या निष्कर्षाप्रत पोहचल्यानंतर अर्थातच त्याला मग नोबेल प्राईज का मिळत नाही? ह्या कळीच्या मुद्यावर गेल्या सात वर्षांत अनेक लेखकांनी आपल्या लेखांचा समारोप केला आहे. बॉब डीलन ह्यांना गतवर्षी साहित्यातले नोबेल पारितोषिक देऊन नोबेल परिषदेने ह्या सर्व चर्चांना एकदाचा विराम दिला आहे. साहित्याचे नोबेल एखाद्या लेखकाला न देता कवी आणि संगीतकाराला का दिले गेले आणि ज्या कार्यासाठी हा पुरस्कार दिला गेला ते कार्य नेमके कसे आहे आणि महान असल्यास ते कुठल्या कारणाने महान आहे ह्याबद्दल माध्यमात बऱ्याच चर्चा घडून आल्या. केवळ बॉबने लिहिलेल्या/गायलेल्या गाण्यांची यादी आणि त्याचे अर्थ सांगून बॉबच्या मोठेपणाचा शोध घेता येणार नाही तर त्याचा जगभरातल्या तरुणांवर पडलेला प्रभाव आणि त्यायोगे झालेले सामाजिक आणि राजकीय बदल ह्यांच्या परीक्षणातून हा शोध घेता येईल आणि ह्यासाठी आपल्याला पुन्हा बॉबच्या कारकिर्दीची सुरुवातीची वर्षे आठवावी लागतील. साठच्या दशकात बदललेल्या काव्य आणि संगीतप्रवाहात बॉब डिलनची गाणी आणि संगीत व्यवस्थित सामावले गेले. ते सामावले गेले असे म्हणण्यापेक्षा बॉबने आपल्या कामातून त्याच्यापुरता स्वतंत्र असा विस्तारित अवकाश निर्माण केला आणि हा स्वतंत्र अवकाश मग मुख्यधारेतल्या अवकाशाला येऊन भिडला. बरबर पहाता बॉबचे शब्द नैराश्यातून आलेले आहेत त्यामुळे ही पराभूतांची गाणी आहेत असे प्रथमदर्शनी कुणासही वाटते, पण शब्दांकडे व्यवस्थित लक्ष दिल्यास ते कुठेही दुबळे झालेले दिसत नाहीत. एखाद्या लढाईत पराजित सैनिक मारला गेला

नाही तर तो पराभूत असूनही त्याच्यामध्ये कुठलासा अभिनिवेश अजूनही शिल्लक असतो. हा अभिनिवेश संपवायचा असेल तर तो सैनिक अजून काही तास लढून आपली उरली सुरली शक्ती वापरून निरंक अवस्थेत जाऊ शकतो, मारला जाऊ शकतो किंवा मग एकूण अभिनिवेशातून आता थोड्याशाच उरलेल्या अभिनिवेशाला जपून तो हिंसेच्या मार्गाने व्यक्त करण्याऐवजी शांततेच्या मार्गाने जास्त चांगल्या प्रकारे व्यक्त केला जाऊ शकतो हे बॉबला व्यवस्थित समजते. हा अभिनिवेश वापरात आणताना तो मानवी जीवनाच्या मूलभूत हिंसात्मक स्वभावाला कुठेही पूरक ठरणार नाही ह्याबद्दल प्रयत्नशील असतो. आपला अभिनिवेश सृजनात्मक मार्गाने हिंसेच्या विरोधात वापरताना इतर ठिकाणाहून आलेल्या प्रतिहिंसात्मक विद्रोहाचा बॉब डिलन पूरक वापर करून न घेता त्यालाही विरोध करतो, म्हणजे एका अर्थाने बॉब विद्रोहाशी विद्रोह करतो.

विद्रोहाशी विद्रोह करताना सृजनाची परिस्थिती गणितीय नियमाने पुन्हा मुख्य धारेकडे वळते किंवा मग एका दुर्मीळ शक्यतेत मुख्य धारेतला हिंसाचार, व्यवस्थांची हडेलहप्पी आणि एकूणच राजकीय व्यवस्थेतली दांभिकता आणि फोलपणा उघड करतात. हा फोलपणा उघड केल्यानंतर उरलेली परिस्थिती अर्थहीन, दिशाहीन आणि मिथ्या वाटू शकते. मानवी जीवनाची व्याख्या ह्या परिस्थितीतून आल्यानंतर बॉब डिलन शून्यतावादाच्या दुष्टचक्रात अडकण्याऐवजी आपल्या सृजनासाठी ह्या परिस्थितीचा वापर करतो, त्यातून मग जे काही घडते ते मानवी स्थितीबद्दलच्या आपल्या आकलनाला फक्त नवी दिशा वा प्रतल न देता थेट नवे अवकाशच देते. ह्या नव्या अवकाशातले तत्त्वज्ञान जागतिक शांततेसाठी केलेली विनंती, आर्जव, धमकी, अपेक्षा वा करूण आळवणी ह्याभोवती फिरत रहाते. इथे शांततेचे अर्थ अती गुंतागुंतीचे वा बाष्कळतेचे नाहीत तर शांततेची गरज ही मानवाची मूलभूत गरज मानून त्यातून आलेल्या अतिशय सोप्या समीकरणांवर ते आधारलेले आहेत. बॉबने शांतता आणि अहिंसा इतकी सोपी केल्यानंतर कॉलेजात जाणाऱ्या षोडशवर्षीय मुलांनाही शांततेचा आग्रह धरणे सोपे झाले. अहिंसा, व्यक्तिस्वातंत्र्य आणि जग बदलण्याच्या स्वप्नाळूपणातून बॉबच्या सृजनाचा तत्त्वज्ञान म्हणून विचार करणारे अनेक पंथ निर्माण झाले. अर्थात ह्या पंथाच्या निर्मितीचे कारण एकटा बॉब नव्हता, ह्याशिवाय स्वतः बॉब कुठल्याही पंथाचे थेट समर्थन करीत नव्हता. असे असले तरी निरनिराळ्या पंथांमध्ये होणारे बदल आणि चळवळींना पूरक ठरणारी गाणी आणी संगीत तयार करणेही बॉबने सुरूच ठेवले होते.

बॉबच्या सुरुवातीच्या कालखंडात मोठा प्रभाव पडलेला पंथ म्हणजे हिप्पी पंथ. साठच्या दशकात सॅनफ्रॅन्सिस्को शहरात झालेल्या वैचारिक क्रांतीनंतर सुखवस्तू साचलेपण सोडून अमेरिकेतले अनेक तरुण नव्या दिशा शोधू लागले. एरव्ही फक्त भांडवलशाही आणि ख्रिश्चन धर्माचा वरचष्मा असणाऱ्या जगात जगणाऱ्या ह्या तरुणांना जगातले इतर तत्त्वज्ञान, धर्म आणि संस्कृतीचा शोध घ्यावासा वाटू लागला. दरम्यानच्या काळात युरोपमध्ये लंडन शहरातून फ्रान्सच्या पॅरिसपर्यंत आणि इटलीच्या मिलान शहरापासून टर्कीच्या इस्तांबूल शहरापर्यंत फिरस्त्यांची एक पिढी युरोपात उदयाला येऊ लागली होती. रशियाने मध्यपूर्वेत बांधलेल्या रस्त्यांतून हे फिरस्ते सिरिया, जॉर्डन, इराक, इराणपर्यंत जात इस्लामिक संस्कृतीचा शोध घेत होते. ह्या रस्त्याच्या पुढे पाकिस्तान, भारत आणि नेपाळमध्ये असलेल्या भारतीय संस्कृतीला जाणून घेणे हा ह्या शोधाचा अंतिम टप्पा होता. लवकरच काही हौशी लोक असतील तितके पैसे आणि जमेल त्या मार्गाने लंडन, पॅरिस, मिलान ह्या शहरातून साध्या टेम्पो ट्रॅव्हलर वा मिनी व्हॅन्समधून ह्या रस्त्यावरून जगभ्रमंती करू लागले आणि बॅकपॅकर्सचा एक नवीन पंथ उदयास आला. स्वस्त एअरलाईन्सने जमेल तितके पैसे घेऊन अमेरिकेतले अनेक तरुण लंडन वा पॅरिसला विमानाने जाऊन पुढे रस्त्यांच्या मार्गाने ह्या गर्दीत सामील होऊ लागले आणि नवशांततावादी हिप्पींचा पंथ उदयास आला.

ह्या पंथाची शांततेची व्याख्या ही अतिशय मूलभूत आणि सोपी असल्याने त्यात पापपुण्याच्या जड व्याख्या नव्हत्या. त्यामुळे शांतीच्या आग्रहाशिवाय अंमली पदार्थ आणि मुक्त शरीरसंबध ह्याचेही ह्या पंथास वावडे नव्हते. मुक्तस्वातंत्र्य आणि नशेचा आस्वाद घेत अनेक आठवडे गाडीत बसून लंडनहून गोव्यापर्यंत येणाऱ्या हजारो मैलांच्या प्रवासात हिप्पी पंथाच्या काही मुख्य आदर्शांपैकी एक आदर्श होता बॉब डिलन. निरनिराळ्या अमंली पदार्थांच्या वापराने मेंदूत झालेले तात्पुरते बदल आणि त्यावर पडलेली डिलनची तात्त्विक गाणी ही त्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या व्यक्तीच्या विचारात बदल करीत होती. ह्यातून संपूर्ण जग हे संकटात असून ते वाचविण्यासाठी त्याला अपार प्रेमाची गरज आहे, पर्यावरणाची समस्या गंभीर होत असून मानवजातीचा अंत जवळ आला आहे आणि हा अंत टाळायचा असेल तर माणसाने निसर्गावर प्रेम केले पाहिजे. त्याचे संवर्धन केले पाहिजे. राष्ट्रसंकल्पना हा केवळ आभास असून त्यातून माणसामाणसांत वैर निर्माण होते, अशा व्यापक तत्त्वज्ञानाचा उदय झाला. त्याकाळी उथळ आणि भोगी पिढीचे पुढे काय झाले? हे जाणून घेण्याचा फार कुणी प्रयत्न केला नाही पण वर्तमानकाळाच्या माहिती तंत्रज्ञानक्रांतीत, पर्यावरणाच्या जागतिक लढ्यात, आर्थिक विभवांतराच्या विरोधी मांडणीत आणि जागतिक शांततेच्या आग्रही तत्त्वज्ञानात हिप्पी पंथाच्या इतिहासाचा मोठा सहभाग आहे आणि ह्या इतिहासाचा बॉब डिलन हा एक मोठा भाग आहे.

सुदैवाने वा दुर्दैवाने हिप्पींचा पंथ हळूहळू अस्तास गेला. हे होत असतांना डिलनचे काम मात्र थांबलेले नव्हते. बदलत्या परिस्थितीचा आढावा घेत त्याचे काम चालूच राहिले. हिप्पींच्या पिढीनंतर भारतीय जनमानसांत डिलनचा प्रभाव शोधताना काळाचे पुन्हा तीन वेगवेगळे भाग करावे लागतील. ह्यातला पहिला कालखंड अर्थात हिप्पींच्या संपर्कात आलेल्या मर्यादित भारतीयांचा येईल जो मुख्यधारेपर्यंत पोहचेस्तोवर विरून गेला होता पण विरून जाण्यापूर्वी त्यांनी पाश्चात्त्यांकडून घेतलेल्या डिलनच्या बदल्यात

आपला रविंद्रनाथ टागोर त्यांना देऊन ह्या दोन संस्कृतींमध्ये घट्ट दुवा साधला होता. दुसरा कालखंड मुंबई, कलकत्ता, पाँडिचेरी आणि गोव्यातल्या काही प्रतिभाशाली लोकांना जागतिक संगीत आवडणे आणि त्यातल्या त्यात डिलन आवडणे आणि इथून काही मोजक्याच परंतु महत्त्वाच्या व्यक्तींवर त्याचा प्रभाव पडणे इथून सुरू होतो. ह्या महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये अरुण कोलटकर, जावेद अख्तर अशा मोठ्या नावांचा समावेश होतो. ह्यानंतरचा अलीकडच्या काळात उदयाला आलेला आणि सर्वात महत्त्वाचा तिसरा कालखंड हा अगदी पंधरा वर्षांपूर्वीचा आहे आणि त्याचे मुख्य श्रेय १९९८ ते २००३ ह्या काळात भारतात झालेल्या टेलिव्हिजन क्रांतीला देता येईल.

साधारण १९९६ च्या सुमारास इंग्रजी टिव्ही माध्यमांनी आपला मोर्चा भारताकडे वळविण्यास सुरुवात केली. यावेळी भारताला पाश्चात्त्य संस्कृतीची मूलभूत ओळख करून देण्याचे मुख्य काम 'डिस्कवरी चॅनल'ने केले. 'डिस्कवरी'चे कर्ताधर्ता किरण कर्णिक ह्यांनी अमेरिकेच्या राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासासंदर्भात असलेल्या उच्च दर्जाच्या माहितीपटांचे हिंदीत भाषांतर करून भारतीयांना एकूण जगाची तोंडओळख करून दिली. दरम्यान इंग्रजी सिनेमे दाखविणाऱ्या वाहिन्यांवरती युद्धासंबधी 'गुड मॉर्निंग व्हिएतनाम', 'द पियानिस्ट', 'फॉरेस्ट गंप' ह्यासारख्या उच्च दर्जाच्या चित्रपटांचे प्रसारण होऊ लागले, ज्यातल्या काही चित्रपटांमध्ये बॉब डिलनची गाणी आणि संगीत वापरण्यात आले होते. इंटरनेटचा वापर सुलभ होऊ लागला तसे लोक ही गाणी शोधून काढू लागले आणि ती डिलनची आहेत हे समजल्यावर त्याची इतर गाणी शोधून ती ऐकू लागले.

साधारण २००८ च्या सुमारास डिलन ऐकणारी नवीन पिढी उदयाला आली. ह्या पिढीने मुंबई कलकत्त्याच्या मूठभर जुन्या पिढीच्या डिलन फॅन्सना आपसुकच पुनर्स्थित केले. मोठ्या शहरांशिवाय डिलनच्या चाहत्यांचा एक खूप मोठा वर्ग पुण्यातल्या एफटीआय आणि दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयात तयार झालेला आहे. जेएनयूमधल्या डाव्या आणि उजव्या विचारांच्या तरुणांच्या बऱ्याच चर्चा आणि निदर्शने आपण पाहिली आहेत, पण ह्या कॅम्पसमधल्या शांततावादी नवहिप्पी पंथाबद्दल अजून कुणी काही विशेष बोललेले नाही. भारतातल्या निरनिराळ्या ठिकाणी असलेल्या डिलनच्या चाहत्यांचा हा नवा वर्ग हा बहुतांशी साठच्या दशकात सॅनफ्रान्सिस्को शहरात झालेल्या क्रांतीच्या वाटेवर उभा आहे.

गेल्या पन्नास वर्षांत जगभरात उदयास आलेल्या निरनिराळ्या शांतिपंथांवरती, मानवतेच्या तत्त्वांवरती आणि एकूणच उद्याच्या आशेवरती बॉब डिलन ह्या माणसाचा किती मोठा प्रभाव आहे हे आपल्याला इथे दिसून येईल. ह्या नवशांततावादी मानवतेच्या तत्त्वांना उत्तेजन द्यायचे असेल तर त्या तत्त्वांच्या आविष्कारकांपैकी एक अर्थात बॉब डिलनसारख्या तत्त्ववेत्त्याला उत्तेजन देणे आवश्यक आहे. बॉब डिलनला मिळालेले नोबेल हे साहित्यासाठी असले तरी ते जगभरातल्या शांततेच्या निर्मितिप्रक्रियेत मोठा हातभार लावू शकते.

हिप्पींचा पंथ अस्तंगत होत असतांना शेवटच्या उरलेल्या हिप्पींपैकी 'एट फिंगर्स एडी' ह्या एका हिप्पीला गोव्यात भेटण्याची संधी मला मिळाली होती. दोन्ही हाताला चारच बोटे आणि ऐंशी वर्षांच्या त्या म्हाताऱ्या माणसाशी चर्चा करतांना तो म्हणाला, ''ह्या जगात मोठे डॉक्टर, अंतराळवीर, महान उद्योजक, प्रभावी राष्ट्राध्यक्ष हे जे काही जन्माला यायचे होते ते येऊन झालेत. जगात अनेक स्टिव्ह जॉब्ज आणि रिचर्ड ब्रेन्सन जन्माला येत आहेत पण आपल्याला गरज आहे ती अधिकाधिक बॉब डिलन जन्माला येण्याची.'' आपल्या नवीन पिढीची महत्त्वाकांक्षा असली महान माणसे बनण्यापेक्षा अतिशय साधा माणूस बनण्याकडे असली पाहिजे, हे त्याचे बोलणे ऐकल्यानंतर माझ्या अंगावर शहारा आला होता, त्या शहाऱ्याकडे स्मितहास्याने पाहात एट फिंगर्स एडी म्हणाला, ''तो शहरा दिसतोय ना? तो शहारा म्हणजे बॉब डिलन.''

– राहुल बनसोडे
rahulbaba@gmail.com

॥ग्रंथाली॥





**शब्दकिमया**

नीला पाटणकर

पुस्तकातील कोडी साधे व सोपे, नेहमी बोलण्यात येणारे शब्द घालून केली आहेत. दोन किंवा तीन शब्दांच्या जोड्या व रोजच्या वापरात येणारे वा.प्र., म्हणी घालून नावीन्य आणले आहे.

मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.




**मळई**

किसन डगळे

या कथासंग्रहामध्ये एकूण सात दीर्घकथा आहेत. यात जनजीवनाचे चित्रण अनुभवसंपन्न आणि सर्वस्पर्शी आहे. ग्रामीण जीवन आणि त्यात घडत आलेलं परिवर्तन याचं समावेशक चित्र या कथांमधून उभं राहतं.

मूल्य ४०० रु.
सवलतीत २४० रु.



# अमेरिका : अध्यक्षीय निवडणुकीचं मरणोत्तर विच्छेदन

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

गेली चार वर्षं अव्याहतपणे सुरू असलेल्या राष्ट्रीय निवडणुकीचे रणशिंग शेवटी बंद होऊन ८ नोव्हेंबर २०१६ च्या रात्री सकाळच्या प्रहराला निकाल लागला. त्यावेळी दोन गोष्टी घडल्या. एक म्हणजे सर्वांनी हिलरी अमेरिकेची पहिली महिला अध्यक्षा होणार म्हणून यशाची गुढी उभारली होती. मोठ्या पार्टीची जय्यत तयारी केली होती. त्यावेळी देण्यात येणारं महत्त्वाचं भाषण केव्हाच लिहून झालं होतं. मग तिच्या पदरात अपयश कसं पडलं याचा काथ्याकूट सुरू झाला. दुसरं म्हणजे २०२० मध्ये तिच्या जागेवर कोण उभं राहणार याची चर्चा सुरू झाली. हिलरीचं वय (सध्या ७० वर्षे) व चारदा अपयश बघता ती पुन्हा उभी राहण्याची शक्यता जवळजवळ शून्यच. देणगीदार तिला निवडणुकीसाठी कधीच हातभार लावणार नाहीत. लगेच झालेल्या सर्वेक्षणात उपाध्यक्ष ज्यो बायडनला सर्वाधिक जास्त मतं मिळालीत, पण ते २०२० मध्ये ७६ वर्षांचे होणार. तारुण्याची पूजा करणाऱ्या या देशात मतदारांना ते कधीही पसंत पडणार नाही म्हणून तिकडे कुणी लक्ष दिलं नाही.

ऐरणीचा मुद्दा म्हणजे जवळ एवढा पैसा असताना, सर्व्हेक्षणात पुढे असताना, सर्व माध्यमं पाठीशी असताना, ओबामांनी तिला उचलून धरलं असताना व बव्हंशी अब्जाधीशांनी दान देऊन सक्रिय मदत केली असताना हिलरी हरली कशी? ती

जिंकण्याची शक्यता ९०-९५ टक्के आहे असं उदारमतवाद्यांचा देव- 'न्यूयॉर्क टाइम्स' म्हणत असताना ही देववाणी खोटी कशी ठरली? याचं विश्लेषण (Post Mortem) या धक्क्यातून शुद्धीवर आल्यावर सुरू झालं. हा वज्राघाव साधा नव्हता. तिची पाठराखण करणारे अनेक अब्जाधीश आपल्या गुंतवणुकीवर परतावा मिळणार नाही म्हणून कमालीचे नाखूश झाले होते. तिच्या काही चाहत्यांनी केशवपन करून शोकसंदेश पाठवला. न्यूयॉर्कच्या महानगरपालिकेत काम करणाऱ्या अनेक कर्मचाऱ्यांना नैराश्य (depression) आले म्हणून पाळीव प्राणी उपचारार्थ देण्यात आले. एका मुस्लीम मुलीची झोप उडाली म्हणून चॅनेलवाल्यांनी जाहीर केलं. ट्रंपला मुस्लिमांचा विटाळ असल्यामुळे आपली हकालपट्टी होणार की काय याची तिला भीती पडली होती.

हिलरीनं एकूण १.२ अब्ज डॉलर उभे करून विक्रम केला होता. व्यूहात्मक राज्यात कचेऱ्या उघडून अनेक हंगामी कर्मचारी कामावर ठेवले. त्यांचं काम एकच. ते म्हणजे आपल्या मतदारांचं बोट धरून त्यांना मतदान केंद्रावर नेणं. त्यात दारू पाजणं किंवा कोंबडी खाऊ घालणं आलंच. असं केलं नसतं तर तिचे अल्पसंख्यांक मतदार (काळे व हिसपॅनिक) या भानगडीत कधीच पडले नसते. प्रत्येक डेमॉक्रॅटीक पक्षाच्या मतदाराची तिच्या अफाट संगणक यंत्रात नोंदच नव्हे तर सर्व वैयक्तिक माहिती साठवून ठेवण्यात आली होती. याप्रमाणे कळपातल्या प्रत्येक मेंढीची त्यांना ओळख होती. अशी खोल व व्यापक भूव्यवस्था (Ground Game) इतिहासात कुणीच आखली नव्हती. तुलनेनं या पायाभूत सुविधेच्या बाबतीत तिचे स्पर्धक ट्रंप कितीतरी मागे होते. पैशाअभावी ते अशी व्यवस्था राबवू शकले नाहीत.

पण ट्रंप अनेक बाबतीत हिलरीशी स्पर्धा करू शकत नव्हते. त्या महिला दावेदारीणनं आपलं सर्व आयुष्य राजकारणात घातलं होतं तर त्या अब्जाधीशानं आयुष्यात एकही निवडणूक लढवली नव्हती. ते या बाबतीत एक बघे होते. ते कधीच भागीदार नव्हते. या भूमिकेतून त्यांनी दोन्ही पक्षांच्या उमेदवारांना सढळ हातांनी मदत केली होती. त्यामुळे उभय पक्षाचे अनेक राजकारणी त्यांच्या खिशात होते. आपल्या बांधकाम उद्योगाच्या विकासासाठी दोन्ही बाजूंच्या घोड्यांवर स्वार होणं आवश्यक आहे असं ते म्हणत. त्यामुळे हा राजकीय खेळ कसा लढला जातो ते आपल्याला चांगलं ठाऊक आहे असं ते सारखे सांगत. आतापर्यंत आपण स्वहितासाठी लढलो. यापुढे आपण देशहितासाठी प्रयत्नशील असू हे त्यांचं विधान सर्वांना पटलं.

थेंबाथेंबानं तळं साचतं असं आपण म्हणत असलो तरी राजकारणात तसं होत नाही. त्यासाठी बादलीनं नव्हे तर वॉटर टॅंकरनी पाणी ओतावं लागतं. म्हणजे सर्वसामान्य चाहत्यांचं योगदान महत्त्वाचं असलं तरी ते अपुरं पडतं. त्यासाठी अब्जाधीश पाठीशी असणं आवश्यक असतं. हिलरीला त्यांची कमी नसली तरी ट्रंपच्या बाजूनं हातावर मोजण्याएवढे देखील पूंजीपती नव्हते. ही वानवा भरून काढण्यासाठी त्यांना स्वतःचे खिसे उघडावे लागले. त्यासाठी आपण स्वतःचे १०० दशलक्ष डॉलर ओतले असं ते म्हणत असले तरी खरा आकडा ६५ दशलक्ष डॉलरच्या घरात आहे असं आढळून आलं. त्यासाठी त्यांना फारसं कण्हावं लागलं नाही म्हणा कारण त्यांचं वार्षिक उत्पन्न ५०० दशलक्ष डॉलरच्या आसपास आहे असा कुणी तरी अंदाज केला. त्यांनी हिलरीच्या निम्मे पैसे उभे केले, पण नवलाची गोष्ट अशी की निवडणूक संपल्यावर हिलरीच्या खात्यात १.२ अब्ज डॉलरमधून फक्त ६ लाख डॉलर उरले तर ट्रंपच्या बॅंकेत ६६० दशलक्ष डॉलरमधले ६ दशलक्ष डॉलर शिल्लक राहिले. कमीत कमी पैसा खर्च करून यश मिळवण्याचा त्यांचा हेतू साध्य झाला.

पैशाशिवाय इतर परिस्थितीही ट्रंपना प्रतिकूल होती. एक-दोन वार्तापत्र सोडली तर सगळी दैनिकं हिलरीच्या बाजूनं. त्यांनी अगोदरच ट्रंपविषयीचा मृत्युलेख लिहून ठेवला होता. चॅनलवाले मुख्यतः CNN, तर उघडउघड ट्रंपची कुचेष्टा करून त्यांच्या शब्दाचा विपरीत अर्थ काढे. त्यांचा प्रेक्षकवर्ग मर्यादित असल्यामुळे त्याचा फारसा परिणाम झाला नाही. हा पक्षपात व पूर्वग्रहदूषित माहिती बघून ट्रंपनी जाहीरपणे प्रसारमाध्यमांशी युद्ध पुकारलं. हे वैर अजूनही कायम आहे. त्यांच्या भाषणाला तोबा गर्दी तर हिलरीच्या वक्तव्याला शोकसभेची स्थिती. त्यावेळी ट्रंप तिथे जमलेल्या मुद्रित व रजत माध्यमांकडे बोट दाखवून 'ते जगातले सर्वाधिक अप्रामाणिक प्राणी' म्हणून त्यांची कुचेष्टा करण्यास कधी विसरत नव्हते. असं म्हणताच त्यांना हटकून टाळ्या मिळत. सर्वसामान्य राजकारण्याला अशी भूमिका घेणं आत्मघातकी ठरतं. म्हणून तो वार्ताहारांची व चॅनेलवाल्यांची दाढी धरून त्यांना खूश ठेवण्याचा प्रयत्न करतो, पण ट्रंपला असामान्य करिष्मा लाभल्यामुळे कुठलाच चिखल चिकटला नाही.

आपला अपमान करणाऱ्या राजकारण्याला प्रसिद्धिमाध्यमं अनुल्लेखानं मारून टाकतात, पण ट्रंपच्या बाबतीत ते तसं करू शकले नाही. त्यात त्यांचा स्वार्थ आडवा आला. ट्रंपचं चित्र मुखपृष्ठावर छापल्यानं खपाचा आलेख वर जात असल्यामुळे त्यांना दुर्लक्षित करणं मुद्रित माध्यमांना अव्यवहार्य होतं. तेच चॅनलवाल्याचं. 'फोर्ब्स' मासिकानं त्यांचा फोटो मुखपृष्ठावर छापला आणि त्याचा खपानं इतिहासात उच्चांक गाठला. त्यानंतर इतर मासिकांनीही तसंच केलं. एखाद्या अर्धनग्न स्त्रीपेक्षा वाचकांना ट्रंपचा फोटो जास्त अभिरूची संपन्न वाटला. 'टाईम' साप्ताहिकाच्या मुखपृष्ठावर झळकून अमरत्व मिळण्यासाठी सगळे राजकारणी झटतात पण ट्रंपनी त्याचं मुखपृष्ठ एकदा नव्हे तर चारदा भूषवलं. 'टाईम' हे उदारमतवादी व डाव्या वळणाचं साप्ताहिक. तरीही त्यानं उजव्या विचारांच्या ट्रंपला हे मानाचं स्थान एवढ्यांदा देणं म्हणजे एक चमत्कारच समजला पाहिजे. दोनदा त्यांचे सकारात्मक फोटो व मजकूर झळकला तर शेवटच्या दोनदा वितळता बर्फाचा खडा संकुचित होतो तसं ट्रंपचा प्रचार अस्ताला जात आहे असं दर्शवणारं व्यंगचित्र छापलं. दरवेळी 'टाईम'चा खप वाढत गेला हे सांगणे नकोच. असं असामान्य विक्रीमूल्य

लाभलेला राजकारणी अजून जन्मायचा आहे. यात मजेची गोष्ट अशी की ट्रंपनी किंवा हिलरीनं मुद्रित माध्यमाचा उपयोग क्वचितच केला. जाहिरातीच्या पैशांचा सगळा ओघ रजत माध्यमाकडे वळला. तरीही मुद्रित माध्यमांनी त्यांचा एवढा गवगवा करावा ही आश्चर्याची गोष्ट नव्हे का?

जनमानसाची जडणघडण करण्यासाठी मुद्रित व रजत माध्यमांची आत्यंतिक जरुरी असते असा जो समज असे त्याला ट्रंपनी सुरुंग लावला. आम्ही लोकशाहीचा चौथा स्तंभ, जनसेवा करण्याचं कांकण बांधलेले व निर्भीडपणे मतं व्यक्त करणारे असे आत्मगौरवात्मक उदात्त विधानं करणारी माध्यमं फोल ठरली. त्यामुळे त्यांची विश्वासार्हता रसातळाला गेली. त्यात फोल (fake) न्यूजची भर पडली. ही तर आपल्या पेड न्यूजपेक्षा जास्त हानिकारक. म्हणून अमेरिकेत वर्तमानपत्र फार कमी लोक वाचतात. त्यांची वार्ताभूक भ्रमणध्वनीवरून भागवली जाते. म्हणजे 'न्यूयॉर्क टाइम्स'चे स्वतःला सामान्यांपेक्षा हुशार समजणारे संपादक जनमानस न घडविता फेसबुकचा कान पिळला तर दूध निघेल एवढा तरुण (३२ वर्षे) मार्क झुकरबर्ग हे काम करतो असं म्हणावं लागेल. तो तर टोकाचा डाव्या विचारांचा. असं असूनही उजवे ट्रंप निवडून आले ही गिनिज (Guinness) बुकमध्ये नोंद घेण्यासारखी गोष्ट नव्हे का?

सगळे राजकारणी माध्यमांची मध्यस्थी पत्करून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतात. म्हणजे त्यांच्या चाळणीतून (filter) बातमी गाळल्यावरच ती वाचकांपर्यंत पोचते. त्यांच्या अर्थाचा अनर्थ काढण्याची सवय असलेली माध्यमं ट्रंपला मुळीच धार्जिणी नव्हती. म्हणून ते ट्विटर, इंस्टाग्राम वगैरे आधुनिक सामाजिक माध्यमांचा उपयोग करून थेट मतदारांपर्यंत पोचतात. त्यांचा हा लक्ष्यगट ४७ दशलक्ष लोकांचा आहे. एवढा खप कुठच्याच वर्तमानपत्राला नाही. चॅनलवाले देखील त्यांची बरोबरी करू शकत नाहीत. संपादकानी संस्कारित न केलेल्या भाषेत ते आपल्या चाहत्यापर्यंत पोहचत असल्यामुळे कुठल्याच नकारात्मक बातम्यांचा त्यांच्या लोकप्रियतेवर फारसा परिणाम झाला नाही. म्हणून दैनिकांचे संपादक दातओठ खात असतील तर नवल कसलं? अशी असामी त्यांनी कधीच बघितला नव्हता. पत्रकारितेला हीन समजून निवडून येणारे ते पहिले राजकारणी असावेत. हिलरीनं त्यांची प्रतिमा मलीन करण्यासाठी ६००-७०० अब्ज डॉलरच्या जाहिराती प्रसारित केल्या. अशा भडिमाराखाली कुठलाही राजकारणी जखमी झाला असता, पण ट्रंपना आपल्या संमोहक व्यक्तिमत्त्वामुळे व राजनिरपेक्ष भाषेत (Politically Correct) बोलण्याऐवजी वस्तुनिष्ठ भाषेत बोलण्याची सवय असल्यामुळे चिरंजीवित्व लाभलं आणि बिचाऱ्या हिलरीला घरी बसावं लागलं.

आपला वारसा पुढे चालू राहावा म्हणून ओबामांनी हिलरीला पाठिंबा दिला. तिच्यासाठी देशभर भाषणं ठोकली व पैसे उभे केले. त्यांचा लक्ष्यगट म्हणजे कृष्णवर्णीय. वर्णसादृश्यामुळे तो त्यांचा निष्ठावंत गट होता. म्हणून त्यांनी हिलरीला मतं द्यावीत अशी निग्रही भाषणं दिली. राष्ट्राध्यक्ष होण्याची ट्रंपची लायकी नाही. त्यासाठी लागणाऱ्या मानसिकतेपासून ते वंचित आहेत व ते अब्जाधीश म्हणून काळांच्या प्रश्नांना अनभिज्ञ व निसंज्ञ आहेत असा ओबामांनी प्रचार केला. हिलरीपेक्षा ते उत्तम वक्ते असल्यामुळे त्यांच्या शब्दांना सर्व डावे मान देत होते. ते म्हणाले, ''मला तुमच्यावाचून ख्रिसमसची भेट नको. तुम्ही मतदान केलं हेच पुरे होईल, पण जेव्हा ओबामा दावेदार होते व त्यांचं नाव मतपत्रावर झळकत होतं तेव्हा हे कृष्णवर्णीय कमालीचे चैतन्यशील होते. पण यावेळी त्यांनी निरूत्सकताच दाखवली. तरीही काळ्यांनी ८८ टक्के मतदान हिलरीला केलं. ओबामांना त्यांची ९४ टक्के मतं पडली होती.

हीच पक्षपाती वर्तमानपत्रं व चॅनलवाले सर्वेक्षण पुरस्कृत करीत होते. त्यांची संख्या बघून मतदारांना अजीर्ण झालं. बातम्यांप्रमाणे ही सर्वेक्षणंही पूर्वग्रहदूषित आणि विसंगत होती. जवळजवळ सगळे हिलरी पुढे आहे असं दर्शवत होती. ते बघून अनेकांनी निवडणुकीची जरूरी नसून आताच हिलरीचा राज्याभिषेक करावा असं सुचवलं. त्यात ते एवढे आत्मविश्वासू झाले की ट्रंपच्या चाहत्यांची कुचेष्टा व प्रसंगी मारहाण करणं अपवादात्मक राहिलं नाही. म्हणून ट्रंपचे अनुयायी दबून मतप्रदर्शन करू लागले. सर्वेक्षणकारांना ते आपलं खरं मत सांगत नव्हते. त्यामुळे ही सर्वे क्षणं चुकीची, दिशाभूल करणारी व ट्रंपच्या चाहत्यांची परीक्षा बघणारी होती असंच म्हणावं लागेल. या बाबतीत ओहायो (Ohio) हा प्रांत महत्त्वाचा समजला जातो. तो जिंकल्याशिवाय रिपब्लिकन पक्षाचा दावेदार वॉशिंग्टनला जाऊ शकत नाही असं इतिहास सांगतो. व्हाईट हाऊसला जाण्याचा रस्ता याप्रमाणे या राज्यातून जात असल्यामुळे इथलं सर्वेक्षण महत्त्वाचं होतं. त्यातली अनेक ट्रंप फक्त दोन टक्क्यांनी पुढे आहे असं सांगत होती. हा फरक चुकीच्या टप्प्यात मोडत असल्यामुळे आकडेशास्त्रीय नियमांनुसार दोघांनाही सारखीच मतं पडत होती. इथे हिलरी जिंकण्याची दाट शक्यता होती. पण निवडणुकीत ट्रंप दोन नव्हे तर दहा टक्क्यांनी पुढे होते असं आढळून आलं आणि पत्रकारितेप्रमाणे सर्वेक्षणकारांची विश्वासार्हताही प्रश्नांकित झाली.

राजकारणात पराजयानंतर नेहमी आत्मपरीक्षण केलं जातं. अशावेळी दावेदार किंवा पक्षश्रेष्ठीत काही उणं होतं असं न मानण्याची प्रथा देशवासीयांना चांगली ठाऊक. गेल्या निवडणुकीत जेव्हा काँग्रेस पडली तेव्हा सोनिया गांधी पराभवाला कारणीभूत होत्या असं म्हणण्याचं कुणाचं धाडस झालं होतं का? त्या अजूनही पदावर आहेतच. हिलरी व तिचा उदारमतवादी डावा डेमॉक्रॅट पक्ष तसाच. तिनं स्वतःला सोडून इतर अनेक कारणांवर बोट ठेवलं व विजनवास पत्करला. एकही मुलाखत दिली नाही.

पहिलं कारण तिच्या प्रसारसमितीचे चेअरमन जॉन पोडेस्टानं सांगितलं. निवडणूक प्रक्रियाच सदोष होती असं पिल्लू सोडून त्यानं हिलरीला निर्दोष ठरवलं. याचा अर्थ मतमोजणीत गडबड होती. मागासलेल्या देशात असं होतं म्हणून जगात स्वतःला या

बाबतीत पुढारलेली समजणारी अमेरिका आपले प्रतिनिधी पाठवून निवडणुका सुव्यवस्थित झाल्याची काळजी घेते. आता तोच अपप्रकार या महासत्ताक देशात झाला हा एक कलंक नव्हता का? इथे सर्व मतदान यंत्राद्वारे होत नाही. काही मतपत्रिका हातानं भरून पेटीत टाकण्यात येतात. या मशिनमध्येच काही बिघाड झाला हा आरोप फार गंभीर स्वरूपाचा होता म्हणून नेहमी डेमॉक्रॅट पक्षाच्या बाजूला असलेला विस्कॉन्सिन प्रांत २०,००० मतांनी यावेळी ट्रंपकडे कसा झुकला त्यासाठी पुनर्मतमोजणी करण्यात आली. पण त्यापूर्वी त्या मतदानाचा खर्च इच्छुकाला भरावा लागतो. त्यासाठी दशलक्षावधी डॉलर लागतात. ते पैसे हिलरीच्या चाहत्यांनी तिसऱ्या पक्षामार्फत भरले. त्या ग्रीन पार्टीला फक्त दोन टक्के मतं पडलीत. तरीही मतदान प्रक्रियेची एकात्मकता (integrity) व वैधता अमेरिकन लोकशाहीसाठी महत्त्वाची असं उदात्त कारण



सांगून त्या पक्षाच्या मुख्य जील स्टाईन मोकळ्या झाल्या. ते पैसे तिनं अल्पकाळात कसे जमवले व ते हिलरीच्या चाहत्यांनी दिले असावेत हे गौडबंगाल तसंच राहिलं. तरी पण पुनर्मतमोजणी झाली व त्यात हिलरी ऐवजी ट्रंपना १३१ जास्त मतं पडलीत.

तो फुगा फुटल्यावर दुसरा बाण सोडण्यात आला. तो म्हणजे फेक (Fake News) न्यूज. परदेशी शक्तींनी आपल्या विरुद्ध खोट्यानाट्या बातम्या वर्तमानपत्रांत पेरून जनमानस पालटवला व तो ट्रंपकडे बळवला असं तिच्या निकटवर्तींयांना वाटलं. पण परदेशी हस्तक्षेपामुळे (म्हणजे रशियामुळे) हिलरी पडली यावर ५७ टक्के जनतेचा विश्वास नाही असं वॉल स्ट्रीट जर्नलच्या केलेल्या सर्वेक्षणात आढळून आलं आणि हे घोडं दामटणं बंद झालं.

मग खुद्द बिल क्लिंटननी आपली विद्वत्ता पाजळली. गोरे पुरुष (विशेषतः अल्पशिक्षित) ओबामांच्या आठ वर्षांच्या कारकिर्दीत क्रोधाविष्ट झाले होते. तिकडे हिलरीनं पुरेसं लक्ष दिलं नव्हतं. जागतिकीकरणामुळे त्यांच्या नोकऱ्या गेल्या होत्या. या प्रक्षुब्ध मनःस्थितीचा ट्रंपनी योग्यपणे उपयोग करून दुखरी नस पकडली होती. ते हिलरीला उमजलंच नाही. एक विचारवंत राजकारणी म्हणून बिल क्लिंटनची ख्याती आहे. त्यांच्या विधानात बरंचसं तथ्य होतं. हे कारण खरं समजलं तर हिलरी दोषी ठरते म्हणून तिच्या चाहत्यांनी ते उचलून धरलं नाही. पण जनतेच्या घशात कोंबल्या गेलेल्या कुठल्याच कारणांनी देणगीदारांचं समाधान झालं नाही. त्यांना प्रत्यक्ष हिलरीच्या तोंडातून खरं कारण ऐकायचं होतं. म्हणून त्यांनी न्यूयॉर्कमध्ये एक खास बैठक प्लाझा हॉटेलमध्ये बोलावली. ते सध्या कारावासाची हवा खात बसलेल्या सुब्रता रॉय यांच्या मालकीचं आहे हे महत्त्वाचं नव्हतं. महत्त्वाचं होतं ते हे की हिलरीला आपलं मौन सोडून देणगीदारांचं आमंत्रण स्वीकारणं भाग पडलं. दुसरं महत्त्वाचं म्हणजे आतापावेतो पत्रकारांना व चॅनलवाल्यांना मित्र समजणाऱ्या हिलरीनं त्यांना बाद केलं होतं. त्यांना टाळण्यासाठी ती मागच्या दारानं आत गेली. तेव्हा एका दक्ष वार्ताहारानं तिच्या म्लान चेहेऱ्याचा फोटो घेण्याचा प्रयत्न केला. तोच तिनं वर्तमानपत्रात लपवून आपलं प्रसिद्धिपराङ्मुखतेचं व्रत सुरूच ठेवलं. पण शेवटी तिच्या भाषणाचा गौप्यस्फोट झालाच. तिनं अर्थातच आपण पराभवाला कारणीभूत आहोत हे कबूल केलं नाही. त्याऐवजी तिनं अतिरिक्त दोन कारणं पुढे ढकलली.

एक म्हणजे केंद्रीय अन्वेषण विभागाचे (FBI) संचालक जेम्स कोमींवर खडे फोडले. सहा फूट पाच इंच उंच असलेल्या कोमींना हिलरीनं परराष्ट्रमंत्री असताना केलेला संवेदनशील पत्र व्यवहार ह्यूमा अॅबेडीन या सहाय्यिकेच्या नवऱ्याच्या संगणकावर सापडला. त्याची वाच्यता निवडणुकीच्या अगोदर ११ दिवस झाली. त्यामुळे जनमत कलुषित झालं असा हिलरीनं दावा केला. हे लफडं गेल्या दीड वर्षांपासून चिघळत असल्यामुळे जनता त्याला निसंज्ञ झाली होती. जनमानसात त्याचं कटुत्व अगोदरच भिनलं होतं, पण निवडणुकीच्या अगोदर दोन दिवस कोमींनी या पत्रव्यवहारात काहीही नवीन नाही असं जाहीर करून हा प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न केला. खरं म्हणजे कोमींनी चौकशी करण्यापूर्वीच हिलरी दुतोंडी, अविश्वासू व सत्तालालसाप्रिय आहे असा जनमानस झाला होता. जवळजवळ ८० टक्के जनता या मताची होती. त्यामुळे स्वायत्त FBI च्या संचालकावर खापर फोडणं मुळीच संयुक्तिक नव्हतं.

त्याच वेळी हिलरीनं दुसरं एक पिल्लू सोडलं. बाह्यशक्तींनी म्हणजे मुख्यतः रशियानं, डेमॉक्रॅट पक्षाचं सेवायंत्र (Server) फोडून हानिकारक माहिती विकलीकच्या मार्फत प्रसिद्ध केली. ते कारण ट्रंपनी धुडकावून दिलं. अंदरकी बात जगाला कळल्यामुळे

डेमॉक्रॅट पक्ष किती असभ्य, अनैतिक व दुतोंडीपणानं वागत होता हे उजेडात आलं. ते पाहून जनतेला उबग आली. म्हणजे तिनं चोरी करणाऱ्याला दोषी न ठरवता ती उघडकीस आणणाऱ्यांवर आग पाखडली. रशिया हॅक करीत आहे हे ओबामांना एका वर्षापासून ठाऊक होतं. ही माहिती हिलरीला असणारच. मग तिनं हॅकींग सुरू राहू नये म्हणून उपलब्ध असलेली यंत्रणा का वापरली नाही असाही प्रश्न काही तज्ज्ञ विचारू लागले. पण हिलरीला अधिकृतपणाचा पाया मिळावा म्हणून ओबामांनी आपली मुदत संपण्यापूर्वी तीन आठवडे अगोदर रशियाला लाक्षणिक शिक्षा ठोठावली. अल्पकाळात त्यांची सत्ता अस्तांकित होणार व रशियास्नेही ट्रंप गादीवर येणार म्हणून पुतीननं राजनैतिक प्रगल्भता दाखवली व ओबामांकडे दुर्लक्ष केलं.

खरं कारण आरशात आहे हे तिनं कधीच मान्य केलं नाही. त्याच्यासमोर उभं राहिलं असतं तर ते तिला चटकन कळलं असतं. तिला ते चांगलं ठाऊक असावं. पण ते जाहीर केलं तर त्याचे राजकीय प्रतिसाद असह्य होतील व जग आपल्याला कधीही क्षमा करणार नाही म्हणून तिनं मौन धरलं.

आता हिलरी कुठलीही निवडणूक लढेल असं वाटत नाही. एक म्हणजे तिचं वय. भारतात राजकारणी निवडणुकीसाठी एकदा उभा राहिला की आडवा होईपर्यंत थांबत नाही. अमेरिकेत एकदा अपयशाचा कलंक लागला की तो कायमचा लागला जातो. जनता इथे फक्त यशाचा आदर करते. त्यामुळे पराभूत राजकारण्यांना देणगीदार उचलून धरत नाही.

याशिवाय इतिहासही हिलरीच्या बाजूनं नव्हता. अमेरिकेन लोकांना अध्यक्षपदाच्या प्रत्येकी चार वर्षांच्या दोन मुदती संपल्या की त्या पक्षाचा कंटाळा येतो. शिवाय कुठलाही पक्ष जास्त काळ सत्तेवर असला की तो उन्मत्त, जनविन्मुख व भ्रष्टाचार प्रवण होतो असं इतिहास सांगतो. त्यामुळे अमेरिकन लोक नवीन पक्षाला निवडून देण्याचे प्रयत्न करतात. या प्रथेला हिलरी मोडीत आणू शकली नाही.

**इलेक्टोरल कॉलेज**

भारताप्रमाणे अमेरिकेतही राष्ट्राध्यक्ष जनतेच्या बहुमतानं निवडून येत नाही. ते अप्रत्यक्षपणे पदावर येतात. त्यासाठी या देशात घटनाकारांनी इलेक्टोरल कॉलेजची संकल्पना सुमारे २५० वर्षांपूर्वी अस्तित्वात आणली. हे कॉलेज म्हणजे शैक्षणिक संस्था नसून प्रत्येक राज्यातून नियुक्त केलेल्या ५३८ सभासदांचा समूह. ५० राज्यांतून निवडून आलेल्या लोकसभा प्रतिनिधींची व दोन सिनेटर्सची बेरीज केली तर ५३५ होते. परंतु यात केंद्रशासीत वॉशिंगटन, डी.सी. या राजधानीच्या अतिरिक्त तीन जागांची भर पडते. हे सभासद निवडून आलेले नसून त्यांची नियुक्ती करण्यात येते. ज्या उमेदवाराला त्या राज्यातील बहुमत मिळतं त्यांना तिथले सर्व सभासद मतं देतात. कॅलिफोर्निया हे सर्वाधिक मोठं राज्य. त्याची लोकसंख्या ३९ दशलक्ष म्हणून त्या राज्याला ५५ मतं आहेत. ती सर्व हिलरीला गेली. या उलट मेन (Maine) या सुपारीएवढ्या प्रांताला फक्त एकच मत आहे. कॅलिफोर्नियाशिवाय न्यूयॉर्क व इलिनॉय हे प्रांत डेमॉक्रॅट पक्षाचे बालेकिल्ले समजण्यात येतात. ते हिलरीला मिळणार याची शाश्वती असल्यामुळे हिलरीनं तिथे फारसा प्रचार केला नाही. ट्रंपनीही ती राज्यं टाळली.

हॉलीवूड व सिलिकॉन व्हॅलीमध्ये उदारमतवाद्यांचं पेव फुटलं आहे. तिथे पैशांच्या खाणी असल्यामुळे या लोकांची दाढी धरण्यास हिलरीनं तिथे खूप खेपा मारल्या. त्या प्रचारासाठी नसून देणगीदारांकडून दोन्ही हातांनी पैसे सावरण्यासाठी होत्या. अर्थातच तिथे ट्रंपची डाळ शिजली नाही. हिलरीला एका प्रांताच्या योगदानामुळे निवडणुकीत बहुमत मिळालं, पण इलेक्ट्रोरल कॉलेजमध्ये बहुसंख्यांक सभासदांना ट्रंपच्या बाजूला मतं द्यावी लागली कारण त्यांना निरनिराळ्या प्रांतातील एकूण २६०० जिल्ह्यांत मताधिक्य लाभलं. हिलरीनं ५०० हून कमी जिल्हे काबीज केले होते. निव्वळ कॅलिफोर्नियात कल्पनेबाहेर मतं मिळवून ती बहुतमांची मानकरी झाली होती. काही निवडक राज्यांचा निवडणुकीवर अवाजवी प्रभाव पडू नये म्हणून इलेक्टोरल कॉलेज जन्माला आलं. ते नसलं असतं तर दावेदारांनी फक्त चार-पाच मोजक्या मोठ्या राज्यांत जाहिराती करून प्रचार केला असता व उर्वरित प्रांतांना डावललं असतं. इलेक्टोरल कॉलेजमध्ये असा अप्रातिनिधिक दावेदार अध्यक्ष म्हणून निवडून येत नाही. म्हणून एका मतासाठी ट्रंप मेनमध्ये चारदा गेले होते.

पण आपला नेता बहुमत मिळवूनही हरला म्हणून डाव्यांनी मोर्चे तर काढलेच पण 'इलेक्टोरल कॉलेजला समाधी द्या असा हट्ट धरला. अडीचशे वर्षांपासून कार्यरत असलेल्या व्यवस्थेत बदल करण्यासाठी राज्यघटना बदलावी लागते. ही सुधारणा करणं जवळजवळ अशक्य. भारताच्या ६५ वर्षीय राज्यघटनेत जेवढ्या सुधारणा झाल्या त्यापेक्षा कितीतरी कमी २५० वर्षांच्या अमेरिकन संविधानात झाल्या हे विशेष कारण ती प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची, वेळखाऊ व कष्टाची आहे.

असं असूनही डाव्यांनी असा बालिश हट्ट का धरला? कारण ट्रंपच्या विजयाचं त्यांना निर्वैधीकरण (delegitimization) करायचं होतं. या निवडणुकीमुळे अमेरिकेचं ध्रुवीकरण तर झालंच, पण डाव्या व उजव्यात दरी निर्माण झाली. ती बुजवण्यासाठी ट्रंपना आपलं बाटाघाटी करण्याचं चातुर्य वापरून देश एकत्र करावा लागेल. अशा साधारणपणे विकसनशील देशांना भेडसावणाऱ्या प्रश्नांना आता एकमेव महासत्ताक असलेल्या राष्ट्राला तोंड द्यावं लागत आहे.

– डॉ. अनंत पां. लाभसेटवार (पीएच्.डी.)

latalabh@aol.com

(लेखक फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी, कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं चेअरमन ऑफ दी बोर्ड होते.)

**अस्वस्थ समाजाचा जाहीरनामा...**

तसलिमा नासरीन बांगलादेशी कादंबरीकार, स्तंभलेखक, कवी आणि स्त्रीवादाच्या ठाम पुरस्कर्त्या. 'द्विखंडित' हे नासरीन यांच्या आत्मकथन मालिकेतील तिसरं पुस्तक. 'आमार मेयेबेला' आणि 'उथाण वारा'नंतरचा हा भाग.


नासरिन यांनी १९९४ मध्ये बांगलादेश सोडलं. मूलतत्ववादाला कडाडून विरोध आणि मानवतावादाच्या पुरस्कारानं तसलिमा यांचं नाव जागतिक पातळीवर गाजलं पण या प्रसिद्धीच्या मागे तीव्र संघर्षाची पार्श्वभूमी आहे. जिचा प्रत्यय द्विखंडित वाचताना येतो. या आत्मकथनात नासरिन यांच्या सामाजिक जीवनासोबत कौटुंबिक भोवताल आणि मित्रपरिवाराच्या गोष्टीही भेटतात. शिप्रासारख्या मैत्रिणींचं जगणं असो की सुहृदयचं आयुष्य असो, त्यांच्या जीवनाची मांडणी करतानाही नासरिना बांगलादेशातील जीवनाचे निरनिराळे पैलू मांडतात. स्वतःच्या आयुष्याचा आलेख मांडताना त्यांचं समाजभान कुठेही हरवत नाही.

बांगलादेशातील समाजजीवनाचं वास्तव दर्शन द्विखंडितच्या पानापानातून स्पष्ट होतं. पहिल्याच प्रकरणात इथल्या कुटुंब नियोजनाच्या प्रक्रियेचं अस्वस्थ करणारं चित्रण दिसतं. यात कुटुंब नियोजनाविषयीची इस्लाममधली मानसिकता स्पष्ट होतेच पण गरिबीच्या शहारे आणणाऱ्या व्यथाही दिसतात. निव्वळ थोड्या चिल्लर पैशासाठी आपलं मातृत्व पणाला लावणाऱ्या बायकांचं चित्रण हेलावून सोडते. त्या लिहितात, 'एक हलक्या दर्जाची सुती साडी आणि एकशेवीस रुपयांसाठी त्यांची आयुष्यभर निःसंतान राहण्याची तयारी असते. मला समजली माझ्या देशाची गरिबी. मी शहारले. मी रडले.'

जीवनातल्या छोट्या छोट्या गोष्टींचं गहिरं आकलनही तसलिमा मांडतात. त्यांच्या आयुष्यातली संवेदनशील माणसं आणि त्यांचा मनोव्यापारही प्रत्ययाला येतो. नासरिन यांच्या देहात मुरलेली कवितेवरची श्रद्धा तुला करु शकत नाही स्पर्श' सारख्या प्रकरणात तीव्रतेनं व्यक्त होते. रुद्रच्या कवितांचे दाखले देताना नासरिन स्वतःच्या भावनांनाही नकळत वाट मोकळी करुन देतात. पण तसलिमांमधली कवयित्रीही यातल्या शब्दा-शब्दातून आपणास भेटते. त्यांच्या गद्यलेखनाच्या कथनशैलीतही कवितेचा प्रवाह अनुभवास येतो. रुद्रविषयी लिहिताना त्या स्वतःच्या आयुष्याकडे तटस्थपणे पाहतात. ते निरीक्षण त्या तितक्याच काव्यात्म पद्धतीनं रेखाटतात.

त्या म्हणतात, 'रुद्रबरोबरच्या सुंदर सहजीवनाचं जे रम्य स्वप्न मी पाहिलं होतं, त्या स्वप्नाची राख माझ्या सर्वांगाला चिकटून राहिली होती. रुद्रबरोबर जीवन व्यतीत करणं शक्य नाही हे मला समजलं होतं, आम्ही आता एकमेकांकडे पाठ करून उभे आहोत हे मला उमजलं होतं. आता ती सारी राख, धूळ, काजळी धुऊन टाकून स्वच्छ व्हायला हवं हेसुद्धा कळत होतं. तरीही काळ जातच राहिला. दिवस भकास उन्हात भाजत राहिले, जळत राहिले, रात्री अंधारात नागिणीसारख्या फुत्कारत राहिल्या आणि मी स्वतःला घेऊन अंगणातल्या अडगळीसारखी बसून राहिले. या जीवनाला घेऊन नक्की कुठं जावं, कुठं गेल्यावर नाही-नाही' म्हणणारा भणाण वारा माझ्या दिशेनं वेड्यासारखा झपाटत येणार नाही, हे काही समजत नव्हतं. जीवन कधी फुलासारखं, तर कधी दगडासारखं वाटे. हे जीवन कधी माझ्या मानेवर येऊन बसलं मला समजलंच नाही. माझी मान, पाठ या जीवनाच्याच भारामुळे वाकून गेली. या जीवनाला मी नीट ओळखत नव्हते, हे जीवन माझंच होतं; पण माझं नव्हतं. यात जे काही पाणी होतं ते मी अनेक वर्षांपासून दुसऱ्याच्या ओंजळीत ओतून दिलं, स्वतःच्या तहानेचा विचार क्षणभरही माझ्या मनात आला नाही.

मेहता पब्लिशिंग हाऊस



द्विखंडित वाचताना एका स्त्रीचा व्यक्ती ते समाजजीवन असा पटच उलगडत जातो. तीव्र संवेदनशीलता, तितकचं गहिरं समाजभान यात प्रतिबिंबित होतं. देश, समाज आणि स्वतःचं जगणं यांची सांगड घालताना गोंधळणाऱ्या प्रत्येकानं हे पुस्तक वाचायला हवं. तसलिमांच्या आयुष्यातील अनेक घटना या पुस्तकात साहित्यरुपात अवतरतात. या घटना निव्वळ एका स्त्रीच्या आयुष्यातील सर्वसामान्य घटना नाहीत. तर महिलांबाबत राबवण्यात येणारी धोरणं, त्यांच्या सुरक्षिततेविषयीची अनास्था अशा अनेक अनुषंगिक संदर्भातून मांडण्यात आलेला तो एका सामाजिक व्यवस्थेच्या निर्दयीपणाचा दस्तावेज वाटतो.

द्विखंडितमधील प्रकरणाची नावंही तसलिमांच्या वादळी जीवनाची जाणीव देतात. 'पारलैकिक गाजर', आम्ही अशाच वाहत जातो', 'गोल्लाछूटचा खेळ', पासपोर्ट जप्त', मानवरुपी सैतान'आणि फतवा'सारखी प्रकरणे नासरीन यांनी अनुभवलेल्या संघर्षाचं इत्यंभूत चित्रण करतात. हे चित्रण अंगावर शहारे आणतं. अस्वस्थ करतं. अंतर्मुख करतं. आणि तथाकथित सामाजिक जडणघडणीबाबत नवे प्रश्नही उपस्थित करतं.


या पुस्तकाच्या निमित्ताने मराठी वाचकांना स्त्रीवादी साहित्याच्या नव्या धाटणीचाही परिचय होईल, असा अनुवाद विलास गीते यांनी केला आहे. जागतिक पातळीवरील स्त्रीवादी साहित्यातील महत्त्वाचा दस्तावेज असणारे हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने मराठीत अनुवादित करुन मराठी वाचकांना मोठा ठेवा दिला आहे.

एका मध्यमवर्गीय घरातील एका साधारण युवतीने कशा प्रकारे अनेक अडचणींना, संकटांना तोंड देत आपल्या आत्मशक्तीचा शोध लावला हे 'द्विखंडित' या पुस्तकात दिसते, हीच या पुस्तकाबाबतची महत्त्वाची गोष्ट आहे. या पुस्तकाचे ऐतिहासिक आणि सामाजिक मूल्य खूप आहे. केवळ विषयाच्या महत्त्वामुळेच नव्हे, तर प्रसादगुणानेही आत्मकथेच्या या भागाला आकर्षक आणि वाचनीय केले आहे... 'द्विखंडित' एकाच वेळी साहित्य, एका असामान्य महिलेची कहाणी व एक देश आणि समाज यांच्यामधल्या वादळाची कहाणी आहे.

**द्विखंडित**
**मूळ लेखक - तसलिमा नासरीन, अनुवाद - विलास गीते**
**पृष्ठसंख्या- ५१६, किंमत - ५५०/- रुपये**
**'ग्रंथाली' सभासदांना सवलतीत ४५० रुपये**

# ग्रंथपान

चांगदेव काळे
संपर्क : ९८६९२०७४०३




अलीकडे पोलीस खात्यातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांची चरित्रे प्रकाशित झाली आहेत, होत आहेत, ही बाब आनंदाची म्हणावी लागेल. त्यांच्यापैकी एक आहेत यशवंत व्हटकर, पोलीस अधिकारी. त्यांच्या या सेवेतील पहिल्या एका तपाच्या कारकिर्दीविषयीचे लेखन ते घेऊन आले आहेत, 'गुन्हेगारांच्या मागावर' या नावाने. त्याला काही मर्यादा असणे स्वाभाविक ठरते. परंतु जे समोर ठेवले आहे, ते डोळ्यांत अंजन घालणारे अस्सल आहे, हे निश्चित.

पोलीस अधिकारी म्हणून 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे घोषवाक्य आचरणात आणण्यासाठी प्रत्यक्ष 'ड्युटी'ला सुरुवात होते ती मुंबईतील धारावी पोलीस स्टेशनहाऊसपासून. अंगात असलेली रग, ग्रामीण भागातून सोबत आलेले माणूसपण आणि आपले कर्तव्य चोखपणे पार पाडण्याचा प्रामाणिक ध्यास, यांचे दर्शन या तपाच्या पहिल्या कारकिर्दीत दिसून येते. धारावीच्या इथल्या गुंडापुंडाचा बंदोबस्त करणे, नंदिनी रामप्रसाद गुप्ता या उत्तरप्रदेशातून मुंबईत पळून आलेल्या तरुणीला तिच्या गावी परत पाठविण्यासाठी केलेली धडपड, हरवलेल्या इसमाचा जवळजवळ बंद झालेला तपास परत चालू करून निकाली काढणारे दुराईराजचे प्रकरण, चंदनाचे जीवन पुन्हा सावरले जावे म्हणून केलेली मदत, खुनाचा आरोप असलेल्या खंडणी–बहाद्दर रुपा नेपाळीच्या आवळलेल्या मुसक्या, गँगवॉरवाल्यांचे आश्रयस्थान असलेल्या महाबळ शेट्टीच्या गडाला दिलेला धक्का, बँक रॉबरी आणि उषा कडावूल प्रकरण, बनावट पासपोर्ट आणि व्हिसा गँग व त्यांचा मद्रास छापखाना उध्वस्त करण्याचे प्रकरण, नुसत्या फोटोवरून आंतरराष्ट्रीय गुन्हेगार असलेल्या मनमीतला मुंबईत जेरबंद करणे, खैरू–सायरुन्नीसा प्रकरण शोधून काढणे, बाबरी मशीद पाडल्यानंतर उसळलेल्या जातीय दंगलीत कुर्ला भागात दाखविलेले अतुलनीय साहस, अशा कितीतरी प्रकरणी यशवंत व्हटकर यांनी आपल्या कौशल्याचा, साहसाचा आणि माणूसपणाचा परिचय पोलिसखात्याला, वरिष्ठांना करून दिला. ज्यासाठी रोख बक्षिसापासून ते राष्ट्रपती पुरस्कारासाठी शिफारस करण्यापर्यंतची अनेक पारितोषिके सन्मानपूर्वक त्यांच्याकडे आली. ज्यामुळे केलेल्या कामाचे समाधान लाभले. पदोन्नती झाली. वेगवेगळ्या जबाबदाऱ्या चालत आल्या.

पोलिसखाते केलेल्या चांगल्या कामगिरीसाठी नक्कीच शाबासकी देते, परंतु या खात्याचा करडा रंगही लक्षात घेण्यासारखा आहे. केलेल्या कामात हयगय, निष्काळजीपणा, स्टेशनप्रमुख म्हणून असलेली जबाबदारी, दुसऱ्यावर अवलंबून राहिल्याने ओढवलेली आपत्ती, आरोपीने केलेले खोटे आरोप, कैदी हातावर तुरी देऊन पळून जाणे, पोलिसकस्टडीत झालेले मृत्यू, महिला आरोपीने उडविलेले चारित्र्यावरील शिंतोडे, अशा वेळी वरिष्ठ पाठीशी घालतीलच याची शक्यता गृहीत धरता येत नाही. त्यातच वरिष्ठांची मर्जी हा इथला सगळ्यात नाजूक भाग. या चक्रातून व्हटकरांची सुटका झालेली नाही, आणि व्हटकरांनी ती लपविलेली नाही किंवा तिथे आपली बाजू सावरून सांगण्याचा प्रयत्न केलेला नाही. आलेले सत्य स्वीकारले, ते तसेच वाचकांसमोर ठेवले. कर्तव्यनिष्ठ अधिकारी अशा प्रकरणात शिक्षेला सामोरा जातो, तेव्हा होणाऱ्या यातना कोठडीतील छळापेक्षा भयंकर असतात. त्या त्यांनी प्रामाणिकपणे मांडल्या आहेत.

यशवंत व्हटकर यांना लाभलेले वरिष्ठ हे त्या काळात काळावर आपला ठसा उमटवलेले असे आहेत. अरविंद इनामदार, मीरा बोरवणकर, डी शिवानंद, वाय सी पवार, रामदास कामत, जयंत शास्त्री, पोपट आवळे, वालीशेट्टी, यांच्याशिवाय ज्यांच्यासोबत काम केले ते सहकारी, त्यांची कामाची पद्धत, स्वभाव, त्यांच्यातले आंबट–गोड यांचे वर्णन व्हटकरांनी उत्तम लेखकाप्रमाणे सकसपणे केले आहे. पोलिसस्टेशनचे म्हणून काही शब्द रूळलेले असतात.


बीट, सत्यशोधक, स्टेशनडायरी, बाबल्या, धर्मकाटा, रिमांड, पेट्रोलिंग, आरोपांसाठी लावायची कलमे यांचा परिचय यातून करून दिलेला आहे.

व्हटकरांनी केलेले लेखन हे त्यांच्या एका तपाच्या कामगिरीविषयीचे आहे. त्यात वैयक्तिक जीवन, कुटुंब यांचा आलेला उल्लेख हा त्रोटक आणि आवश्यकतेपुरताच आलेला आहे. त्यामुळे हे लेखन एका पोलीस अधिकाऱ्याची डायरी म्हणता येईल असे आहे परंतु त्यात पोलिसी कोरडेपणा नाही. तिथल्या भाषेचा परिणाम तिच्यावर नाही. प्रत्यक्ष फिल्डमध्ये काम करीत असल्याने आपल्या भोवती दिसणारे जग, तिथले वातावरण, माणसे, त्यांच्या प्रवृत्ती अशा सर्व तपशिलाचा ते वेध घेतात. महत्त्वाचे म्हणजे करड्या गणवेशात असून, कामाची पद्धती करडी ठेवूनही माणूसपणाला कुठे गालबोट लागलेले नाही. त्यामुळे एक पोलीस अधिकारी किती निष्ठेने आपली जबाबदारी, कर्तव्य पार पाडतो याचे वर्णन मनाला भावणारे ठरले आहे. अधिकारी आणि अधिकारातला माणूस याचे उत्तम दर्शन यातून होते.

गिरीश कुलकर्णी यांनी मुखपृष्ठ साकारले आहे. गुन्हेगाराच्या हाताचे ठसे हे माग घेण्यास पुरेसे ठरतात. तेच ठसे मुखपृष्ठावर ठेवून मागे गडद रंगाची शेड दिलेली आहे. शिवाय पोलीस म्हटले की बेड्या हा त्यांचा ट्रेडमार्क, त्याही तिथे दाखविलेल्या आहेत. त्यामुळे शीर्षकाशी साम्य साधले गेले आहे.

**मूल्य १५० रु. • सवलतीत ९० रु.**

## ग्रंथपान




''आणीबाणीच्या परिस्थितीत माझे समग्र चेतातंत्र कामावर केंद्रित करण्याची मला सवय आहे. म्हणूच आता फार काही करणे जमणार नाही, हा नकारात्मक विचार मनात नव्हता. 'काय करता येईल', याचा शोध वेगाने घ्यायला हवा, असे मला वाटले. याचवेळी नव्हे तर अटीतटीच्या प्रत्येक क्षणी मन आणि बुद्धीचा कौल घेत, विचार करुन तो वेगाने अंमलात आणण्याची मला सवय आहे. गॉड हेल्प्स देम हू हेल्प देमसेल्व्हज् यावर माझी नितांत श्रद्धा आहे. कदाचित म्हणूनच मला विमान उतरवणे जमले असेल.''

स्मिता भागवत यांचे सफरनामा हे नवे पुस्तक समोर आहे. त्यांची 'रंग दे बसंती', 'सावन घन बरसे', 'पुत्र मानवाचा' यासारखी पुस्तके यापूर्वी वाचलेली होती. वास्तव, इतिहास यांची साक्ष ठेवून त्यांचे लेखन सुरू आहे. गुजरातीइतकीच मराठी भाषेची लेक असल्याने दोन्ही भाषेत समृद्ध असे लेखन त्यांच्या हातून झाले आहे. शिवाय हिंदी व इंग्रजीचा लडिवाळ जिव्हाळा असल्याने, त्या भाषांतूनही त्यांनी लेखन केलेले आहे. तेही सकसपणे, हे त्यांना मिळालेल्या पुरस्कारांनी सिद्ध केले आहे. तोच सकसपणा 'सफरनामा' या नव्या पुस्तकाला लाभलेला आहे, याची खात्री पुस्तक वाचून झाल्यावर पटते.

प्रवासवर्णन हा गाभा असलेले हे पुस्तक, केवळ प्रवासाचे वर्णन करीत नाही. स्थळ, परिसर, मार्ग, निसर्ग जो ओघाने नजरेसमोर येतो म्हणून त्यांची केवळ शब्दबंबाळ भौगोलिक वर्णने यात नाहीत. भौगोलिकतेच्या सोबत आणखी त्या पलीकडे जाऊन प्रवासवर्णन करता येते. अनुभव, घटना, आख्यायिका, चमत्कार, गोष्टी, इतिहास यांचाही यात वेध घेता येतो, त्यांचा समावेश करता येतो. तो वेध या पुस्तकात लेखिकेने घेतला आहे. याचा प्रत्यय प्रत्येक लेखातून येतो.

'किमया निसर्गाची' या लेखात हरियाणातील 'ज्वालामुखी' या गावातील याच नावाच्या मंदिराचे वर्णन आहे. ज्वालामुखी सती पार्वतीचे नवलप्रद मंदिर! ज्या मंदिरात देवीच्या मूर्ती ऐवजी धरणीतून प्रकटलेल्या स्वयंसिद्ध अग्निशिखा प्रज्ज्वलित आहेत, निसर्गतः. अनेक शतकापासून या ज्वाला प्रजेच्या श्रद्धा व कुतूहलाचा विषय ठरल्या आहेत. अकबर बादशहा आणि ध्यानू यांची आख्यायिका या लेखात आलेली आहे. या मंदिराप्रमाणेच गुवाहटीच्या कामाख्यादेवीच्या मंदिराचे वर्णन आहे. 'गुपिते नायगारा पोटातील...' या लेखात दि. ९ जुलै १९६० रोजी नायगारा या विख्यात धबधब्यात घडलेल्या अद्भुत, विस्मयकारी आणि अचाट साहसाच्या घटनांची नोंद आहे. अमेरिका आणि कॅनडा या दोन्ही देशात 'ब्रायडल व्हेल फॉल' आणि 'हॉर्स शू शेप फॉल' या नावांनी पसरलेल्या या धबधब्याचे कॅनडातले रूप रौद्रभीषण आहे. या धबधब्याने दाखविलेले रूप म्हणजे अचानक बोटीतील माणसांना हवेत फेकून देणे आणि साहसी वीरांनी त्यांना वाचवणे, ही एक घटना. तर १८४८ ला याच प्रपाताने तब्बल अडीच दिवस अदृश्य होण्याचा विक्रम केला होता. यातही विस्मयकारी आख्यायिकांचा समावेश आहे. 'देवदूतांचा बगीचा' हा लेख म्हणजे या दोन देशांतील बेटांवर पसरलेल्या बागेसंबधातील आख्यायिका, व सत्य यांच्या चित्तरकथा आहेत. ज्या वाचताना मन थक्क होते. 'अजब नगराची गजब कहाणी' या लेखात फ्लोरिडा राज्याच्या ईशान्य भागात डेटोना बीचनजिक स्प्रूस क्रिक हे छोटेखानी नगर आहे. येथे मोटारगाडी बाळगावी तसे बहुतेकांकडे स्वतःचे विमान आहे. म्हणून कौतुकाने त्यास एअरपार्क वा फ्लाय कम्युनिटी असेही म्हणतात. या विमानांना पार्क करण्यासाठी घराजवळ स्वतंत्र सोय केलेली असते. यांच्या वर्णनाच्या सोबत त्यांचा इतिहासही यात दिलेला आहे. उत्तर अमेरिकेत पहिले आंतरराष्ट्रीय शिवानंद योग आणि वेदांत केंद्राची निर्मिती व्हॅलमोर येथेच का झाली, याचे वर्णन व इतिहास 'कॅनडातील पहिला योगाश्रम. एक आक्रित' या लेखात आलेले आहे.

फ्रॅंकफर्ट ते टोरांटो या प्रवासात जर्मनीत विमानप्रवासाच्या दरम्यान अनुभवाला हिटलरशाही वृत्ती आणि त्याचवेळी तत्परतेने दिसलेली सहृदयता याचा अनुभव आहे. न्यूयॉर्क-टोरान्टो प्रवासात विमान बिघडले असता कशाप्रकारचा अनुभव येऊ शकतो, याचे वर्णन आहे. कुमाउँ रेल्वे एक्सप्रेसने प्रवास करीत असताना आमदार-खासदारांची मुले मौज म्हणून प्रवाशांना कशी जीव मुठीत धरून प्रवास करायला लावतात, याचा अनुभव आहे. डलहौसीला जाण्यासाठी बसने प्रवास करीत असताना अचानक बसवर डोंगरावरून पाऊस-वाऱ्याच्यासोबत दगड -मातीचा वर्षाव होऊ लागल्यानंतर काय अवस्था होते, याचा अनुभव आहे. गुजरातमधील कायण येथे हिंदूंचे अपूर्ण राहिलेले शिवाचे मंदिर करीमभाई मोमीन यांनी कसे पूर्ण केले, त्याचे वर्णन आहे. आणि ब्रम्हदेवाच्या पुष्कर येथे सत्याची परीक्षा पाहणारा तरूण हा राजहंस कसा, याचे वर्णन आहे.

सफरनामा हा डोळसपणे केला तर अनुभव, घटना, माणसे, नवीन माहिती यांना तोटा नाही. फक्त त्यासाठी हवी चातुर्य, जिज्ञासा, कुतूहल, आस, अभ्यास या गुणांची जोड. ती असली तर त्या संधीचे सोने होते. इतरांना आनंद वाटता येतो. लेखिकेकडे असलेली ही गुणांची दृष्टी त्यांच्या लेखनातून पदोपदी दिसून येते. आवश्यक तिथे फोटो दिल्याने वर्णनाला साज चढला आहे.

सफरनामा म्हणून लेखिकेने ज्या ज्या ठिकाणी सफर केली आहे, तेथील वैशिष्ट्ये दृगोचर करणारी दृश्ये, फोटो यांची उत्सुकता वाचकाला लागलेली असते. शब्ददेह लाभलेली वर्णने नजरेसमोर तरळताना या प्रतिमादेही वर्णनांचा आस्वाद नक्कीच आनंददायी असतो. ते भान सतीश भावसार यांनी अचूकपणे सांभाळले आहे. त्यामुळे मुखपृष्ठाला लोभसपणा प्राप्त झाला आहे.


**मूल्य १६० रु. • सवलतीत ११० रु.**

# ग्रंथपान

**प्रॉमिसलँड**

**मूळ लेखक : अविनाश बागल**

**अनुवाद : जी.बी. देशमुख**




''महत्त्वाकांक्षासुद्धा एक अजब चीज असते. आधी तुम्हाला ती उचकावते, डिवचते आणि तुम्हास केवळ पळायलाच नव्हे तर बेफाम वेगाने दौडायला लावते. मग यश लवकर हाती येते आणि वारंवार येते. नंतर तुम्ही थोडा दम घ्यायला थांबता आणि सगळे काही स्थिर होताना दिसते. तुमच्या लक्षात येते की तुम्ही पुढील यश मिळविण्यासाठी पुन्हा जोरदार मेहनत करू लागला आहात आणि मग एक असा मध्यबिंदू येतो जेथे तुम्ही स्वतःलाच प्रश्न विचारून बसता, इतक्या उरफोडीची खरंच गरज आहे?''

'प्रॉमिसलँड' ही आहे एका महत्त्वाकांक्षा असलेल्या यशस्वी माणसाची कहाणी, डॉ. अविनाश बागल यांची. प्रॉमिसलँडवर पाऊल ठेवायचे तर अगोदर मनाचा महत्त्वाकांक्षेने ताबा घेतलेला असणे महत्त्वाचे. नुसती महत्त्वाकांक्षा असून चालत नाही, तिला जोड असावी लागते जिद्दीची, पराकाष्ठेची, कठोर परिश्रमाची, हार न पत्कारण्याची, परिस्थितीला शरण न जाता तिच्यावर मात करण्याची आणि आपल्याला कुठल्या परिघावर विराजमान व्हायचे आहे त्याचे भान. तरच महत्त्वाकांक्षेला अर्थ प्राप्त होऊ शकतो. तरच प्रॉमिसलँडवर पाय ठेवल्याचे सार्थक होऊ शकते, आणि प्रॉमिसलँडलाही उपकृत झाल्याचा आनंद मिळू शकतो. या सगळ्यांचे चित्रण शब्दरूपाने आपल्यासमोर मांडले आहे डॉ. अविनाश बागल यांनी. त्याचा अनुवाद केला आहे जी.बी. देशमुख यांनी. परंतु गंमत अशी की, मूळ लेखकाने लिहिलेली संहिता, कोणत्या भाषेत होती, वा कुठे प्रकाशित झाली याचा तपशील काही यात आलेला नाही. कदाचित ती इंग्रजीत असण्याची शक्यता आहे. अमेरिकेसारख्या देशात यशस्वी ठरलेल्या व्यावसायिकाचे माध्यम हेच असणे अपेक्षित धरायला हरकत नसावी.

कोल्हापूरसारख्या शहरातून अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी गेलेल्या डॉ. बागल यांना शिक्षण पूर्ण झाल्यानंतर खरं तर भारतात परत येण्याची इच्छा होती. परंतु जमले नाही. हे न जमणे कोळ्याच्या जाळ्यासारखे नव्हते. एकेका संधीला सोन्याच्या वास्तवात गुंफण्याची कला अंगी असल्याने, प्रगतीचे इमले उंचावत गेले, स्तरावर स्तर रचल्यासारखे! आणि मग निवृत्तीपर्यंत मागे वळून पाहणे झालेच नाही. सिव्हील इंजिनिअर असलेल्या तरुणाच्या ठायी ही कला असणे स्वाभाविक म्हणायला हवे. त्या अर्थाने ही एका यशस्वी व्यावसायिकाची कथा म्हणता येईल, जिला ते स्वतः नाव देतात, 'एका परदेशस्थाची कथा.'

अमेरिका ही डॉ. बागल यांची प्रॉमिसलँड. इथे स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी होतकरूंच्या वाट्याला येणारी कामे त्यांनी कुठलाही कमीपणा न मानता पार पाडली. लॅबची साफसफाई, सभागृहाच्या खुर्च्या लावणे, मित्रांच्या खोलीवर भांडी घासणे, स्वतःच्या शिक्षणाच्या कक्षेत न बसणारी कामे करणे, ही कामे म्हणजे महत्त्वाकांक्षा असलेल्या तरुणाची कसोटी पाहणारी परीक्षा केंद्रे! बागलांनी या कसोट्या लीलया पार केल्या आणि अवघ्या आठ महिन्यात स्वतःच्या कारने प्रवास करण्याइतपत मजल मारली. पोलाक स्टील या कंपनीत कारकीर्दीला सुरुवात केली. पुढे आयटीटी, लिट्टन, एमसीआर, केएमजी, आबीएम, पीडब्ल्यूएच , केएसए यासारख्या नामांकित कंपन्यांनी त्यांना आपल्या व्यवसायाशी जोडून घेतले, संचालक, सल्लागार, भागीदार म्हणून. अमेरिकेपाठोपाठ भारत, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, असा मोठ्ठा पल्ला त्यांच्या व्यवसायाचा भाग झाला. पुढे स्वतःची कंपनी काढली, 'साई' नावाची. एक पाय जमिनीवर, दुसरा पाय विमानात इतका व्यस्तपणा. तरीही आपल्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ दिलेले नाही. संगणक विषयात पीएच.डी. मिळविली. अर्थातच, पुढील सगळा व्यावसायिक प्रवास हा संगणकाशी जोडला गेला. स्ट्रक्चरल इंजिनीअरची पदवी घ्यायला गेलेल्या तरुणाचे हे यश नक्कीच डोळे दिपवणारे म्हणावे लागेल. याविषयी लेखक लिहितात, ''वीस वर्षांपूर्वी मी दोनशे रुपये (चाळीस डॉलर) एकत्र करण्यासाठी धडपडत होतो, कशासाठी तर अमेरिकेला जाण्यासाठी जहाजाचे तिकीट मिळविण्यासाठी. आणि आता तोच मी होतो, एका अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनीचा विभाग संचालक, अमेरिकेहून हवेत उडत भारतात येणारा.''

आपले शिक्षण, आपला व्यवसाय एवढेच त्यांनी स्वतःला मर्यादेत ठेवले नाही. पत्नी, भाऊ, मुले यांच्या शिक्षणाकडे, त्यांच्या भवितव्याकडे तितकेच आत्मीयतेने पाहिले. आपल्या बरोबरीने त्यांच्या यशस्वितेला प्राधान्य दिले. काहीवेळा ओढाताण झाली, तरी दुर्लक्ष होऊ दिलेले नाही. यशाबरोबर अपयश आले, अपघात झाला, यांचीही वर्णने यात प्रांजळपणे आलेली आहेत.

प्रत्येक क्षेत्राची स्वतःची ओळख असते, शिस्त असते. तिथे असलेल्या अधिकाऱ्यांचे वेगळेपण असते, त्यात स्पर्धा, चढउतार असतात, अधिक पैसा मिळवण्यासाठी कंपन्या बदलण्याची प्रवृत्ती असते, या सगळ्यांचे तपशील लेखकाच्या प्रवासासोबत आलेले आहेत. त्यांना भेटलेल्या अनेक व्यक्ती आहेत, त्या वाचताना जाणवते, जगात चांगली माणसेही आहेत, जी परकेपणाची भावना न दाखविता गुणांची कदर करतात. एकूण लेखन प्रेरक, स्फूर्तिदायक आणि गुणांची कदर करावी असे आहे.


प्रॉमिसलँडकडे सुरू झालेला प्रवास हा जहाजावरून झाला, एस.एस. स्ट्रॅथेनेर नावाच्या. हे एक जुने जहाज होते. आणि सुरू झालेला प्रवास हा देखील पंच्यावण्ण वर्षांपूर्वीचा. त्यावेळचे ते जहाज, शहराची आकृती, समुद्र हे जुन्या काळच्या ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाईट फोटोत कसे दिसेल, याचा प्रत्यय यावा, असे मुखपृष्ठ या पुस्तकाला लाभले आहे. 'ग्रंथाली'च्या संगणक विभागाची ही कल्पकता अप्रतिमच म्हणायला हवी!

**मूल्य १८० रु. ● सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**ना पूर्व ना पश्चिम**

**डॉ. बाळ फोंडके**




''पर्यटनातून स्थलदर्शनाचा आनंद जरी मिळत असला तरी मनुजा चातुर्या येण्यासाठी अधिक काहीतरी देणं आवश्यक असतं. पॅरिसच्या लूव्ह म्युझियमला भेट देऊन तिथल्या मोनालिसाचं दर्शन घेतल्यानंतर त्या चित्राकृतीचा इतिहास किंवा त्या चित्रशैलीची व्यवच्छेदक लक्षणं सांगितली गेली तर वाचकांच्या चित्रकलेच्या ज्ञानात अधिकच भर पडणार नाही का? ही ज्ञानलालसा काही वाचकांमध्ये असू शकते पण नसली तरी ती रूजवण्याचं काम सहजगत्या होण्यासारखं असतं. हसतखेळत ज्ञानदान करण्याची प्रवृत्ती वृद्धिंगत होण्याच्या आजच्या जमान्याची ती मागणीच आहे.''

पर्यटनाचा आनंद आणि त्याचे वर्णन या दोहोंची सांगड घालताना कोणता दृष्टिकोन बाळगायला हवा, त्याची अनुभूती वाचकांच्या ठायी यावी, याची प्रचीती देणारे पुस्तक म्हणजे 'ना पूर्व ना पश्चिम.' डॉ. बाळ फोंडके यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेले. डॉ. फोंडके हे वैज्ञानिक आहेत, तसेच सिद्धहस्त विज्ञान लेखक आहेत. आतापर्यंत त्यांची ६५ हून अधिक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्याच परंपरेला साजेसे हे नवेकोरे पुस्तक, पर्यटनानंद देणारे. संशोधन परिषदा, प्रशिक्षण या निमित्ताने जगभर प्रवास केलेल्या डॉ. फोंडके यांनी नोंद करावी अशी प्रवासवर्णने लिहिली, ती नियतकालिकांमधून प्रकाशित झाली आहेत. ती वाचलेली असतील तर नक्कीच आठवणींत रुंजी घालत असतील. त्याच लेखांचा हा संग्रह आहे. त्यामुळे एकत्रित अनुभव वाचकांच्या समोर उलगडत जातो आणि वाचकालाही उमगत जाते की पर्यटन करताना समोर दिसते त्याचा चक्षुआनंद घ्यायचाच, परंतु त्याबरोबर या स्थळाचा इतिहास, हेतू, पार्श्वभूमी, शास्त्र, असे अनेक पदर असू शकतात, त्यांचाही शोध घ्यायला हवा. आनंदाची पातळी उंचावण्यात त्याचे महत्त्व अधिक आहे. जसे मोनालिसाच्या चित्राबाबत त्यांनी नमूद केले आहे.

एकूण १४ लेखांचा समावेश या पुस्तकात आहे. पहिलाच लेख आपल्याला न्यूझीलंडच्या सफरीवर घेऊन जातो. सुंदर या शब्दाचा नितळपणा, सौंदर्य आणि अद्भुतता काय असते, ती इथे अनुभवता येते. अंटार्क्टिका न पाहता तिचे प्रत्यक्ष दर्शन इथे घडवू शकेल असा देश. नायगारा या अमेरिकन धबधब्याला मान खाली घालायला लावणारा बॉवेन धबधबा इथे आहे. निसर्ग तर मुक्त हस्ताने उधळण करीत असलेला. जोडून आहे दुसरा देश, ऑस्ट्रेलिया. तोही तसाच सुंदर. या देशांनंतर क्रमांक लागतो सिंगापूरचा. आपणास ज्ञात असलेले सिंगापूर किती पुढारलेले आहे, १९६६ साली स्वतंत्र झाल्यांनतर त्याने आपल्या भौगालिक मर्यादांसह अनेक मर्यादांवर कशाप्रकारे मात करून जगात अव्वल स्थान पटकावले आहे, केवळ इमारती, या कसिनो उभे करून पर्यटकांना आकर्षित करणारे केंद्र नव्हे तर, यांच्यापलीकडे जाणारे सिंगापूर कसे आहे, ते या लेखांमुळे लक्षात येते. त्यातला न्यू वॉटर, पाण्याचा प्रयोग हा तर जगाच्या डोळ्यांतले पाणी काढणारा म्हणावा लागेल. जंगलसफारी दिवसा नाही, रात्री करायची असते, हे सूत्र पटवून देणारा हा देश आहे. यासंबधी लेखक लिहितात, 'नियमांचं काटेकोर पालन करत शिस्तबद्ध वागणूक या एकमेव भांडवलावर तिसऱ्या जगातून त्या देशानं पहिल्या जगात झेप घेतली.'

उल्म हे अल्बर्ट आईनस्टाईनचे जन्मगाव. त्याचं खरं नाव उल्म-आम्-डोना. हे गाव गणितज्ञांची परंपरा लाभलेलं गाव. त्याची म्हण अशी, 'उल्मनीझे सुन्ट मातेमाटिनी' म्हणजे 'उल्मवासी हे गणितीच असतात.' त्या गावाची सफर लेखकाने घडवली आहे. तीच तऱ्हा विज्ञानकथेचं जन्मस्थळाची. बुर्ग फ्रँकेन्स्टाईनची. त्याच्या निर्मितीची कथा आहे. जी लेखकाला तिथे भेट दिल्यामुळे हाती आली. तिथल्या गढीवरचं वातावरणच मुळी भयप्रद असतं. दुपारी तीन-चार वाजताच अंधाराचं साम्राज्य पसरतं. हे स्थळ पाहण्याचं समाधान काही वेगळंच. ग्रीनिच हे एक ठिकाण असे आहे की, एक पाय पूर्व खंडात तर दुसरा पाय उश्चिम खंडात . असे दोन भाग करणारी रेषा म्हणजे मेरिडियन रेषा, तिला भेट देण्यासाठी लोक आवर्जून जातात. तिच्या विषयीची माहिती देताना तिची निर्मिती, त्यामागची कथा, असा सारा तपशील मनोरंजकपणे 'ना पूर्व ना पश्चिम' या लेखात आलेला आहे.

भोपाळजवळील भीमबेटका हा सत्तर गुहा असलेला जंगल-डोंगराने व्याप्त असा आदिप्रदेश. ज्याचा संबंध पांडवांच्या अज्ञातवासाशी जोडला गेलेला आहे. तो पाहताना सापडलेला इतिहास थक्क करणारा आहे. तसेच अमेरिकेत असताना पानगळ अनुभवास आली. त्यावरून निसर्गात जी रंगांची उधळण होते, त्याची कारणमीमांसा वाचतानाही आपण थक्क होत जातो. नुसत्या ठळक गोष्टी वा घटनांची नोंद नाही, तर समुद्र, डोंगर, संध्याकाळ, रेस्टॉरंट, गुलाब, पेंग्विन, प्रवाळ, कोरल, बिअर, अंजीर, दुरियान, ड्रॅगनफ्रूट, जिवंत म्युझियम, पाने, झाडे, फुले, पक्षी, पशू यांची आपणस अज्ञात असलेली कितीतरी माहिती तपशीलवारपणे यात दिलेली आहे. विज्ञानकथेशी नाते असलेल्या त्यांनी जे सुंदर जग वाचकांच्या समोर ठेवले आहे, ते खरोखरच अनोखे आहे. विज्ञानाच्या विविध पैलूंशी नाते सांगणारे आहे. अर्थात त्यासाठी त्यांना सहकार्य लाभले. त्यांच्या नावांचा लेखकाने कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. हे लेखन वाचत असताना कुठेही क्लिष्टता आड येत नाही, उलट अनेक प्रसंगी विनोदांची मनोरंजक पेरणी करणारी वाक्ये भेटत जातात. 'जंगलसफारीचा भन्नाट अनुभव आल्यानंतर सफारी सूट घालायचे टाळू लागणे', 'न्यू वॉटर प्यायल्यानंतरचे चेहरे', भन्नाटच. त्यांनी केलेली वर्णने वाचताना सारी दृश्ये नजरेसमोर जशीच्या तशी उभी राहतात. तरीही सोबत रंगीत फोटो दिलेले आहेत. त्यामुळे वर्णनाच्या सौंदर्यात अधिक भर पडली आहे. सतीश भावसारांनी पर्यटक आणि होकायंत्र यांचा सुरेख मेळ मुखपृष्ठावर घातला आहे, जो शीर्षकाशी नाते जोडणारा आहे.

**मूल्य २५० रु. • सवलतीत १५० रु.**

द्वारा बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली क्र. ९, तळमजला, जे.के. सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ । दूरध्वनी : २४३०६६२४, २४२१६०५० । Email - granthaliruchee@gmail.com



मूल्य ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

## तरीही शेषप्रश्न : छाया दातार

छाया दातार यांचा एक अभ्यासक आणि एक कार्यकर्त्या अशा दोन्ही भूमिकांमधून स्त्रियांच्या चळवळीत सातत्याने आणि महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. त्यांच्याच शब्दात ही एक डॉक्यूनॉव्हेल आहे. त्यातला काही भाग आत्मचरित्रासारखा वाटला तरीही लेखिकेचे हे आत्मचरित्र नाही. त्याला स्त्री–चळवळीच्या प्रवाहाचे चरित्र म्हणता येईल. त्यात चळवळीचा केवळ दस्तावेज नाही तर त्याच्या बरोबरीने चळवळीतल्या अनेक चर्चा, मतभेद आणि जिवंत अनुभवाची चित्रे आहेत. केरळात अनेकदा प्रवास करताना पाण्याच्या प्रवाहाची सोबत घेत आपण काठाकाठाने प्रवास करतो. तसा हे लेखन वाचताना अनुभव येतो. पाण्याचे प्रवाहीपण, त्यावरचे तरंग, भोवरे आणि भवतालाचे प्रतिबिंब हे सारे या प्रवाहचरित्रातून भेटत राहते.

**– विद्या बाळ**


## यश म्हणजे काय? : शिल्पा खेर

यश म्हणजे काय? या प्रश्नाचा वेध घेण्याचा एका वेगळ्या प्रकारचा प्रयत्न या पुस्तकात केलेला आहे. समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रतिथयश मंडळींच्या मुलांनी घेतलेल्या मुलाखती व त्या अनुषंगाने त्यांची आपसातील चर्चा, अशा स्वरूपात या प्रश्नाच्या उत्तराची उकल तरुण मंडळींपुढे मांडण्याचे काम मोठ्या समर्थपणे त्यांनी केले आहे. केवळ पैसा आणि प्रसिद्धी पुरत्या यशाच्या कल्पना मर्यादित न ठेवता त्या पलीकडेही खूप मोठे दालन उघडे असल्याचे मान्यवरांच्या अनुभव व कर्तृत्वाच्या माध्यमातून त्यांनी मोठ्या वस्तुनिष्ठपणे मांडले आहे. प्रगल्भ विचार करण्याची क्षमता असलेल्या पण आजच्या भौतिकयुगाचा पगडा असलेल्या आजच्या तरुण वर्गाला हे विवेचन नव्याने विचार करण्यास प्रवृत्त करेल अशी आशा वाटते.

**– डॉ. अनिल काकोडकर**




मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये




## 'मराठी भाषा दिना'निमित्त विश्वकोशाचे २० खंड

**भेटकार्ड स्मृतिशलाका स्वरूपात... (व्हिजिटिंग कार्ड पेनड्राईव्ह)**

या पेनड्राईव्ह मधील विश्वकोशाचे ॲप्लिकेशन विन्डोज बेस कॉम्प्युटरवर, लॅपटॉपवर इन्स्टॉल करून युनिकोड फॉंट स्वरूपात वाचता येईल. खंडामधील संपूर्ण सूची, विविध नोंदी, विषयवार नोंदी शोधण्याच्या विविध सुविधा यात उपलब्ध आहेत. **पेनड्राईव्ह ८०० रुपयांत, टपालखर्च ५० रुपये.**

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2016-2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




**'वर्ल्ड हेल्थ डे'च्या निमित्ताने करा दृढ निश्चय हृदयस्वास्थ्याचा!**

चालताना दम लागणे, पायावर सूज, उच्च रक्तदाब, मधुमेह किंवा थकवा जाणवत असेल तर आपली व आपल्या जवळच्या व्यक्तींची **'कार्डिॲक रिस्क असेसमेंट'** करुन घ्या, अगदी नाममात्र शुल्कात आणि लाइफ **जगा बिनधास्त!**

कार्डिॲक रिस्क असेसमेंट अंतर्गत: **इ सी जी, ब्लडप्रेशर, आर बी एस (रँडम ब्लड शुगर) एस पी ओ 2, बी एम आय** फक्त ₹150*

सोबत एक्सपर्ट डॉक्टर्सचे कन्सल्टेशन आणि डाएट चार्ट

*ही ऑफर मर्यादित कालावधी करिता

**हृदयविकारांवरील विनाशस्त्रक्रिया आयुर्वेदिक उपचारांसाठी**
**संपूर्ण महाराष्ट्रभर सुसज्ज १२० हार्ट केअर क्लिनिक्स्, माधवबाग™**

• मुंबई • पुणे • नाशिक • अहमदनगर • जळगाव • औरंगाबाद • लातूर • परभणी • नांदेड • नागपूर • वर्धा • अमरावती • अकोला • चंद्रपूर • यवतमाळ • सोलापूर • सातारा • सांगली • कोल्हापूर • रत्नागिरी • चिपळूण • कणकवली • कुडाळ • बेळगाव • मडगाव • पणजी

नाव नोंदणी आवश्यक,
अधिक माहितीसाठी आजच मिस कॉल द्या
**022-33494950**

माधवबाग™

'हृदयस्पर्शी माधवबाग' हे पुस्तक माधवबागच्या सर्व क्लिनिक्समध्ये उपलब्ध त्यासाठी आजच पैसे भरुन नोंदणी करा.
मिस्डकॉल नं. ०२२-३९९७१९१९

YouTube /Madhavbaug www.madhavbaug.org 120 क्लिनिक्स् • 2 हॉस्पिटल्स्

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.